While the author in adopt an online open eye template creation bye extracting the template every time the eye pair is lost (this code happen because of lightning condition changes or movement in the case of a mobile device), eye phone dose not really on the same strategy. The reduced computation speed compared to a desktop machine and the restricted battery requirements imposed by the N810 dictate a different approach. Eye phone creates a template of a user's open eye once at the beginning when a person uses a system for the first time using eye detection algorithm described above. The template is saved in the persistent memory of the device and fetched eye phone is invoked by taking the simple approach, we drastically reduce the runtime inference delay of eyephone, the application memory and foot print, and the battery drain. The down side of this template creation approach is that a template created in creation lighting conditions might not be perfectly suitable for other environments.




**Eye Tracking**

The eye tracking algorithm is based on template matching. The template matching function calculates a correlations core between the open eye template, created the first time the application is used, and a search window. In order to reduce the computation time of the time template matching function and save resources, the search window is limited to a region which is twice the size of box enclosing the eye. These regions are shown in figure.

**Blink Detection**

To detect blinks we apply a thresholding (beginning) technique for the normalized correlation coefficient returned by the template matching function as suggested in. However, our algorithm differs from the one proposed in. In the authors introduced single threshold T and the eye is deemed to be open if the correlation score is greater than T, and closedvoice versa. In the eyephone system, we have to situation to dill with:-

- The quality of the camera is not the same as a good USB camera,
- The phone's camera is closer to the person phase then is the case of using a desktop and USB camera.

  Because of this latter situation the camera can pick up iris movement, i.e. the interior of the eye due to eye ball rotation. In particular, when the iris is turned towards the corner of eye, Upwards or downwards a blink is inferred even if the eye remains open. This occurs because in this case the majority of eye ball surface turns white which is confused with the color of the screen.

## Application-:

**Eye Menu**

An example of eyephone application is EyeMenu as shown in fig. Eyemenu is way to shortcut the access to some of the phones functions the set of applications in the menu can be customized bye the user. The idea is the following: the position of the person eye is mapped to one of the nine buttons. A button is highlighted when eyephone detects the eye in the position mapped to the button. If the user's blinks there eye, the application associated with the button is launched. Driving the mobile phone user interface with the eyes can be used as a way to facilitate the interaction with mobile phones or in support of people with disabilities.




## Conclusion-:

In this paper, we have focused on developing a HPI technology solely using one of the phone's growing numbers of on board sensors, i.e. the front-facing camera. We presented the implementation and evaluation of the eyephone prototype. Theeyephone relies on eye tracking and blink detection to drive a mobile phone user interface and activate different applications or functions on the phone. Although preliminary, our results indicate that eyephone is a promising approach to driving mobile applications in a hand free manner

## References-:


1. Apple iPhone. http://www.apple.com/iphone.
2. Nokia Series. http://europe.nokia.com/nseries/.
3. HTC. http://www.htc.com/www/product.
4. eyesight. http://www.eyesight-tech.com/.
5. DoCoMo eye control. http://tinyurl.com/ycza2jd.
6. EyePhone demo video.
   http://sensorlab.cs.dartmouth.edu/eyephone/demo.m4v.
   https://www.youtube.com/watch?v=Be1yUOOro4k

7. Yenawine, P. (1997). "Thoughts on Visual Literacy." In J. Flood, S.B. Heath, &D. Lapp (eds.), Handbook of Research and Teaching Literacy through the Communicative and Visual Arts. Consulted January 20, 2012. Available at:
   http://www.vtshome.org/system/resources/0000/0005/Thoughts_Visual_Literacy.pdf

8. S. Agrawal, I. Constandache, S. Gaonkar, and R.R.Choudhury. PhonePoint Pen: Using Mobile Phones to Write in Air. In MobiHeld `09, pages 1{6. ACM, 2009.
9. E. Miluzzo, C.T. Cornelius, A. Ramaswamy,T. Choudhury, Z. Liu, A.T. Campbell. Darwin Phones: The Evolution of Sensing and Inference on Mobile Phones. In Eighth International ACM Conference on Mobile Systems, Applications, and Services (MobiSys'10), San Francisco, CA, USA, June 15-18, 2010.
10. International Journal of Computer Science and Information Technology Research ISSN 2348-120X (online)


❖❖❖

# किडलेली माणसे : मध्यमवर्गीय संस्कृतीचे उपरोधिक चित्रण

प्रा.डॉ. मीना म. जुनघरे
मराठी विभाग प्रमुख
शिवशक्ती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बाभूळगाव, जि. यवतमाळ

कथा सांगणे व ऐकणे ही माणसाची फार पुरातन काळापासूनची आवडती बाब आहे. कथा हा वाङ्मय प्रकार परंपरेने चालत आलेला आहे. कहाणी, स्फुट गोष्टी, संपूर्ण गोष्ट अशी कथेची प्रारंभीची रूपे होती. वाचकांचे रंजन करता— करता त्याला जीवन बोधाच्या चार गोष्टी पटवून देणे हे कथेचे प्रयोजन होते. दुसऱ्या महायुध्दानंतर कथेमध्ये अमुलाग्र बदल झाला. नवकथेमध्ये प्रतिक—प्रतिमांचा वापर होऊ लागला. ती सांगण्यापेक्षा अधिक सुचवू लागली. व्यक्तीच्या बाह्य जीवनदर्शनापेक्षा अंर्तमनातील कोलाहलाकडे तिचे लक्ष वेधले गेले. त्यामुळे स्वरूपही बदलले. १९४० नंतर नवकथेचे वारे वाहू लागले. कवितेत बा.सी. मर्ढेकर आणि कथेच्या क्षेत्रात गंगाधर गाडगीळ हे यानव्या युगाचे प्रवर्तक मानले जातात. मराठी कथेत युगप्रवर्तनच घडून आणले आहे. गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, व्यंकटेश मांडगुळकर, पु.भा. भावे यांनी मराठीत नवकथेचा प्रवाह आणला. वाङ्मयात जेव्हा नवे वाङ्मयीन प्रवाह जन्माला येतात तेव्हा समकालीन जीवनात तशीच काही उलथापालथ झालेली असते. दुसऱ्या महायुध्दाच्या काळात मानवी जिवनाचे उद्ध्वस्त चित्र पहायला मिळाले होते. त्यामुळे जगात एक असुरक्षिततेची, भयाकुलतेची व निराशेचे वातावरण निर्माण झाले होते. माणसाची परमेश्वरावराचीही श्रध्दा लोप पावू लागली होती. एक प्रकारची अगतिता व मुल्यहिनता हा या युगाचा गुणधर्म होऊपाहात होता.

या सगळ्याचा परिणाम साहित्यविश्वावर झाला. साहित्यात व्यक्तीचे व समाजाचे चित्रण करण्याची नवी रित पुढे आली. आंतरिक वास्तवावर भर देणारी अतिवास्तववादी लेखनशैली पुढे आली. संज्ञा प्रवाहासारख्या तंत्राचा वापर होऊ लागला. व्यक्तीच्या मनोविश्लेषणा बरोबरच सामुहिकतेचे मानसशास्त्रही लक्षात घेतले जाऊ लागले. यातूनच कथेचे विषय बदलले व तिच लेखनतंत्रही बदलले. गंगाधर गाडगीळांची कथा ही या बदलत्या प्रवाहाचे प्रारंभरूप होती. त्यामुळे नवकथेची सर्व वैशिष्ट्ये त्यांच्या कथांतून आपल्याला पहायला मिळतात. ‘किडलेली माणसे’ या कथेतून आपण नवकथेचा आशय, कथाविषय झाला. त्यासाठी गाडगीळांनी नवे तंत्र वापरले.

## मध्यमवर्गीय संस्कृतीचे उपरोधिक चित्रण :—

ही कथा वाचल्यानंतर आपल्या लक्षात येते की, या कथेत गोष्ट अशी नाहीच. यात नायक नाही. घारत अण्णा, बंडोपंत, मालतीबाई, दामू अशा सगळ्यांची गोष्ट आहे. ही गोष्ट खुटमुळ्यांच्या चाळीची आहे. या चाळीचे जीवनदर्शन घडावे म्हणून लेखकाने मुद्दाम रविवारचा दिवस निवडलेला आहे आणि वेळ दुपारची घेतलेली आहे. यावेळी चाळीतील सगळी माणसे घरीच असतात. ती स्वस्थपणे रविवारची सुटी घालवित असतात. मध्यमवर्गीय माणसे आपापल्या सुखदु:खात इतकी मग्न असतात की त्यांना आजुबाजुला काय घडामोडी घडतायेत याचे फारसे सोयरसुतक नसते. गाडगीळांनी आपल्या कथेसाठी निवडलेला कालखंड हा हिंदू—मुस्लिम जातीय दंगली भडकल्या होत्या त्या वेळचा आहे. म्हणून कथेच्या प्रारंभीच मुंबईत जातीय दंगली भडकल्या होत्या त्या वेळचा आहे. म्हणून कथेच्या प्रारंभीच मुंबईत जातीय दंगली भडकल्या होत्या परंतु खुटमुळ्यांच्या चाळीत त्याचा मागमूसही नव्हता. सर्वत्र माळा सामसूम होती असे वर्णन आहे. मध्यमवर्गीय संस्कृतीचे औपचारिक दर्शन घडविणे हे या कथेचे मुख्य प्रयोजन आहे. कोणत्याही संस्कृतीचा इतिहास, वीरपुरूषांचा वारसा, पुराण—कथांची वा वीरकथांची परंपरा, जीवनातले आदर्शव मानदंड याविषयीचे संकेत, स्त्री—पुरूषांचे जीवनादर्शन संसारधर्म, धर्मकृत्ये, सामाजिक सण—उत्सव यातून या संस्कृतीचा पोत आपल्याला कळतो. गाडगीळांनी खुटमुळ्यांच्या चाळीतील मध्यमवर्गीय संस्कृतीचे दर्शन या निकषांच्या आधारानेच घडविले आहे. पण हे सरधोपटपणे सांगितलेले नाही. काहीसे मिष्किलपणे व उपरोधिकपणे त्यांनी हे दर्शन घडविले आहे. खुटमुळ्यांची चाळ म्हणजे संस्कृतीचा सुपीक मळा आहे, अशी उपरोधिक सुरूवात करून त्यांनी या चाळीचे वर्णन केले आहे. त्यातून संस्कृतीचे मानदंड व खुटमुळ्यांच्या चाळीतील वर्तमान वास्तवाचे क्षुद्रपण यांचा एक अंतर्विरोध गाडगगीळांनी फार उत्तमपणे रेखाटला आहे.

या कथेला गोष्ट अशी नाही. आरंभ, मध्य, अंत अशा तंत्रात ती बसत नाही. तरीही कथेच्या प्रारंभापासून शेवटपर्यंत या कथेचा प्रवास होतो. कथेचा प्रारंभ अंतरविरोधात्मक आहे. या कथेत 'घटना' म्हणून एकच घडली आहे. ती जाती तणावाच्या पार्श्वभुमीवर शहरात होणाऱ्या लुटीची खुटमुळ्यांच्या चाळीच्या समोरचे चपलांचे दुकान फोडून लुटले जाते ही एकमेव घटना या कथेत आहे. परंतु ही घटना घडत असताना छायाचित्रकाराने टिपून घ्यावीत तशी क्षणचित्रे गाडगिळांनी टिपली आहेत. आणि एखाद्या अनुबोधपटाप्रमाणे त्या चाळकऱ्यांचा जीवनपट आपल्या समोर उलगडू लागतो. मवाल्यांनी दुकान फोडले या एका घटनेशी या सगळ्या व्यक्तींच्या कृती–उक्ती जोडलेल्या आहेत उदा. 'मवाली दुकान फोडतो' हे पाहून दामूला विजयी आनंद होतो. आईसफ्रुट खाल्ल्याइतका आनंद होतो असे वर्णन करून या आनंदाचे क्षुद्रपण गाडगीळ वर्णन करतात. मध्यमवर्गीयांच्या हयातीत ती घटना ठरते आणि जिथून ते दृश्य चांगले दिसेल तिथून ते पाहण्याकरिता ढकलाढकली, मारामारी सुरू होते. घारतआण्णांची आडदांड पोरे, माधवरावांचा बुजरा श्याम, मुलांवर खेळसणार घारतअण्णा श्यामरावांच्या बगलेतून मान काढून दृश्य पाहण्यासाठी अतुर झालेले ऐनापुरे, मवाळ वृत्तीचे, दयाबुध्दीचे श्यामराव आणि त्यांच्यावर तोंडसुख घेत, मुसलमानांना शिव्या देत हिंदुत्वाचा अभिमान मिरविणारे, परंतु स्वत:ची अधिकारलालसा अशा विकृत मार्गाने शमविणारे ऐनापुरे अशी एकामागून एक व्यक्तीचित्रे लेखक उभी करत जातो.

त्यानंतर कथानकाला वेग येतो. तो रस्त्यावरच्या भैयाने सहजपणे चार–दोन बुटाच्या जोड्या खाकोटीला मारण्याच्याप्रसंगाने मध्यमवर्गीय चाळकरी प्रेक्षकांच्या कृतीच्या रूपाने प्रत्यक्षात येते आणि त्यानंतर जी लुटालुट होते त्यात ही नैतिक, सुसंस्कृत चाळही सामील होते. मध्यमवर्गीयांचा भेकडपणा अधोरेखीत होऊन कथा संपते. हा कथेचा विकास लक्षात घेता या कथेत रविवारची दुपार एवढा दोन–चार तासांचा काळा खुटमुळ्यांची चाळ एवढे एकमेव स्थळ आणि लुटीचा प्रसंग ही एकमेव घटना असा सगळा आटोपशीर भाग आहे. स्थळ, काळ, प्रसंग याचे ऐक्य हे या कथेचे वैशिष्ट्य आहे. कथेचा प्रारंभ मध्यमवर्गीय संस्कृतीचा फोलपणा उपरोधिक चित्रणातून होतो आणि कथेचा शेवट मध्यमवर्गीयांच्या भेकड कृतीच्या दर्शनाने होतो. मधल्या सगळ्या भागात किडलेपणाच्या सगळ्या बाजू फक्त दाखविल्या आहेत. त्यामुळे एकात्म संस्कार साधला जातो. त्यामुळे कथा अतिशय बंधेसुद झाली आहे.

कथेची निवेदनशैली :–

गंगाधर गाडगीळ यांनी 'किडलेली माणसे' या कथेसाठी त्रयस्थ निवेदनपध्दती वापरली असून, घडणाऱ्या घटनांचे दर्शनात्मक चित्रण केले आहे. एखाद्या छायाचित्रकाराने टिपून घ्यावेत तशा व्यक्तीच्या हालचाली, लकबी, गाडगीळांनी नोंदविल्या आहेत. व्यक्ती–व्यक्तीतील संबंधांचे चित्रण करण्यासाठीही त्यांनी दर्शनात्मक चित्रणशैलीचाच उपयोग केला आहे. नटव्या मालतीबाईना धक्का देऊन जाणारे तिरळे बंडोपंत यांचे दृश्य रेखाटून नंतर त्या दोघांच्या मनातल्या विकृतीवर त्रयस्थपणे भाष्य केले आहे. चड्डीवर ओढीत जाणारा व बंद दाराच्या फटीतून डोकावणारा दामू, खुर्चीवर उभे राहून लुटीची गंमत पाहत बायकोला त्याची कॉमेंट्री सांगणारा मनोहर, बगलेतून मान काढून पाहणारे ऐनापुरे ही सगळी दर्शनात्मक चित्रणशैलीची उदाहरणे आहेत.

उपरोधिक शैली हे गाडगीळांच्या निवेदनशैलीचे दुसरे वैशिष्ट्ये. खुटमुळ्यांची चाळ म्हणजे नोकारीबहादुर लोकांची वस्ती. साहेबाची मर्जी आणि पगारवाढ हे तेथील पुरूषांच्या जिवितांचे केंद्रबिंदू होते, असे उपरोधिक चिमटे घेणारी भाषा या कादंबरीत जागोजागी भेटते. या उपरोधामुळे वास्तवाचे दर्शन अधिक प्रखरपणे व्हायला मदत होते. मध्यमवर्गीयांच्या पोडवळपणाची अतिशय भेदक जाणीव झालेल्या कथालेखकाचा मुळभावही त्यातून व्यक्त होतो. अशा माणसांविषयीची हळहळ, खंत ही अशी उपारोधातून बाहेर येते. अप्रत्यक्षपणे गाडगीळांचा जीवनाविषयक दृष्टीकोण त्यातून प्रकट होतो.

## सारांश :–

एखादी लकब, एखादी कृती किंवा विश्लेषण यातून लेखक संबंध व्यक्तीचित्र उभे करतात. हा त्यांच्या निवेदनशैलीचा मुख्य विशेष आहे. सुक्ष्म निरीक्षण हे गाडगीळांच्या निवेदनाचे आणखी एक वैशिष्ट्य हिंदूच्या मनात दडलेला मुसलमानांच्या विषयीचा व्देष 'मुसंड्या' या शब्दप्रयोगातून व्यक्त होतो. राजकारणावर चर्चा करण्याची हौस, चारात चार रुपये वाढ कशी होईल असे राजकारण सांगा म्हणणारी प्रातिनिधीक मध्यमवर्गीय कृती, आपण कुणाकडे वाकडी नजर करून पाहत नाही असे दाखविणे, तेच ते करीत राहणे असे अनेक मानवी स्वभावाचे बारकावे लेखकाने टिपले आहेत. त्यामुळे ही लेखनशैली जशी दर्शनात्मक आहे तशीच वास्तवभेदकही

आहे. 'किडलेली माणसे' ही एक नवकथा आहे. पारंपरिक अर्थाने या कथेत गोष्ट अशी नाही. ती कुणा एका व्यक्तीची कथा नाही. मध्यमवर्गीय संस्कृतीचे – चाळ संस्कृतीचे दर्शन घडविणारी ती कथा आहे.

कुठल्याही प्रकारचे उद्‌बोधन करणे हे तिचे प्रयोजन नसून तटस्थपणे महानगरीय संस्कृतीच्या चाळकरी मध्यमवर्गीयांच्या जीवनाचा छेद घेणे हेच तिचे प्रयोजन आहे. लेखकाने त्रयस्थ निवेदनपध्दतीने आणि छायाचित्रकारासारखे दृश्ये टिपली आहेत. त्या दृश्यांचा सलग पट उलगडीत नेला आहे. त्यामुळे ही कथा आपण वाचतो किंवा ऐकतो यापेक्षा आपण ती कथा पाहतो असा अनुभव येतो. या कथेत मध्यमवर्गीयांचे जीवन क्षुद्र, किडलेले आहे. संस्कृतीच्या वेष्टनाखाली दडलेले हे पोकळपण व्यक्तकरण्यासाठी लेखक उपरोधिक शैलीचा उपयोग करतो. मध्यमवर्गीयांचे क्षुद्र वास्तवाचे विरोधाचित्र उभे करून लेखक सर्वप्रथम दंगलीत लुटल्या जाणाऱ्या दुकानांच्या प्रसंगाच्या निमित्ताने या चाळकऱ्यांच्या प्रत्येक कृतीचे बारीकसारीक वर्णन करून किडलेपणाचे प्रात्यक्षिकच वाचकांसमोर ठेवतो. भोवतीचे वास्तव हाच या नवकथेचा विषय आहे. त्यासाठी लेखकाने पारंपरिक कथेचे रचनातंत्राचे संकेत झुगारून दिले आहेत. कुठल्याही प्रकारची भावविवशता कथेत नाही. निवेदन अलंकारिक नसून वास्तवदर्शी आहे. त्याला उपरोधाची धार आहे. माणसे एकत्र राहतात पण दिसतात तशी नाहीत. वरून सुबक वाटणारी माणसे आतून किडलेली आहेत. हे किडलेपण या कथेने उलगडून दाखविले आहे.

## संदर्भ ग्रंथ :–


१. मराठी कथा – संपादक श्री.पु. भागवत
२. गाडगीळांची कथा – संपादक श्री.पु. भागवत
३. सहा कथाकार – संपादक डॉ. भालचंद्र फडके
४. मानसचित्रे – गंगाधर गाडगीळ
५. तलावातले चांदणे – गंगाधर गाडगीळ
६. खडक आणि पाणी – गंगाधर गाडगीळ


❖❖❖

# ग्रामसंस्कृतीच्या परिवर्तनाचा आलेख : “गावशिव”

प्रा. रेखा व्ही. इंगोले
मराठी विभाग प्रमुख
मा.सु.पा.कला,विज्ञान व कै.पां.ठा.वाणिज्य महाविद्यालय, मानोरा, जि.वाशिम
e-mail ID – rekhaingole09@gmail.com मो.नं.९४०४५४७२७१

## प्रस्तावना :

आपल्या स्वतंत्र प्रतिभा आणि प्रज्ञेने मराठी कवितेला सधन आणि श्रीमंत करणाऱ्या कविंमध्ये कविवर्य विठ्ठल वाघ यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. मराठी ग्रामीण कवितेत १९९० नंतरच्या काळात लक्षणीय बदल घडून आले. नव्या दमाचे अनेक कवि या काळात ग्राम वास्तवाचे चित्रण करीत होते. याच काळात कविवर्य विठ्ठल वाघ यांचीही कविता सर्वार्थाने बदलून गेली. स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रामीण जनतेचा झालेला भ्रमनिराष, दुष्काळ,पाणिटंचाई, सिंचनाची कमतरता जमिनीचे तुकडीकरण, शेतमालाच्या भावांचा प्रश्न, शेतीवरचा वाढलेला खर्च, शासकिय ध्येय धोरणाची विफलता या सारखे अनेक प्रश्न या काळात निमार्ण झाले. शहरीकरणचा प्रभाव, आधुनिकतेचे वारे यामुळे चंगळवाद बोकाळला लोकांची जीवन शैली बदलू लागली. त्यामुळे पारंपरिक ग्रामसंस्कृतीत वेगाने बदल घडून येण्यास प्रारंभ झाला. खेडयातील तरूणांची बदलती मानसीकता, तुटलेपण बेरोजगारी अनेक प्रश्न निमार्ण करून गेली. जागतीकरण व खाजगीकरणयुक्त अर्थव्यवस्था यांचाही परिणाम खेडयांवर जाणवायला लागला. शेतमजूर व शेतकरी या व्यवस्थेत भरडून निघाले एकीकडे देश विकासाच्या मार्गावर अग्रेसर होत असतांना ग्रामीण परिसर मात्र अनेक समस्यांना ग्रासून गेला. त्यामुळे पूर्विच्या ग्रामसंस्कृतीमधील वैभव नष्ट होवून खेडयांना बकाल अवस्था येत राहीली. हजारो वर्षापासूनची लोकांचे पालन पोषण करणारी ही संस्कृती एका भिषण संकटात सापडली.

कवी विठ्ठल वाघ यांच्या ‘गावशिव’ या काव्य संग्रहातील त्यांची कविता काळानुरूप बदलली. ‘गाव–शिव’ या दोन शब्दात संपूर्ण ग्राम संस्कृती सामावलेली आहे. या संस्कृतीमध्ये शेतकऱ्यांचा कष्टकऱ्यांचा शेतीमातीशी कायम ऋणानुबंध असतो. त्यामुळे ग्राम संस्कृती अनेक घटक एकमेकांच्या मदतीशिवाय जीवन जगणे अशक्य असते. ‘गाव–शिव’ या काव्यसंग्रहामध्ये शेती, माती, निसर्ग, पशु–पक्षी, जनावरे, प्राणि तर यात आहेत, शिवाय शेतकरी, कष्टकरी, वर्गांची वेदना, संघर्ष, दु:ख, हर्ष या कवितेतून समर्थपणे व्यक्त झाली आहे. ग्रामीण रीतीभाती, सण, उत्सव, जत्रा अशा ग्राम संस्कृतीच्या अनेक घटकांचे वर्णन येथे येते.

विसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात ग्रामसंस्कृतीत अनेक समस्या निमार्ण झाल्या. त्यांची व्रिवता पूर्वीपेक्षा भीषण होती. शेती शिवारावर येणारी ही अस्मानी सुलतानी संकट माणसांना हादरवून टाकणारी ठरली. त्यात नशिबाचा चंद्र जणू छळून गेला असे कवीला वाटते.

“घाम जातो मातीत गेला दाम त्याला का मिळेना?
जीव तो राजा असावा तो भिकारी का कळेना
कीड काढा कापसाच्या चांदण्याला लागलेली”

शेतीमालाप्रमाणे लागलेली ही कीड म्हणजे, या माणसांवरची ही सारे अरिष्टे काढून टाकली पाहिजेत ही कवीची अपेक्षा आहे.

“मुळे पिकाची मातीत
आम्ही रुजवितो खोल.
जरा घामाची रक्ताची
त्यास पुरवितो ओल”

रांत्रदिवस आपल्या प्राणांच्या पलिकडे पीकाला जपणारा कुणबी सारे दु:ख, वेदना, निमूटपणे सहन करून साऱ्या रीतीभाती निभावीत पिकाकडे पाहून, मातीकडे पाहून सारे सुख मिळवीत असतो. पण दुसऱ्या बाजूला बापजाद्यांचा हा पिढीजात वारसा सांभाळता सांभाळता मात्र हाती काहीच शिल्लक उरत नाही. शेतातील घाम गाळणे रक्त ओकणे यातून काय साध्य होते तर

“नाही जुळले आकडे
नाही झाला गुणाकार

पीक होत गेल वंजा
बाकी राहिलं मातेरं”

ग्रामीण विकासाची धोरणे, यांत्रिकीकरण, पंचवार्षिक योजना, आधुनिकीकरणाची सावली ग्रामीण भागावर पडत गेली. गावागावात वाहतुकीची साधने निमार्ण झाली. रस्ते, पूल निमार्ण झाले. त्यामुळे ग्रामीण भाग शहरांशी जलद गतीने जोडली गेली. सार्वत्रिक शिक्षणाचा प्रचार व प्रसार झाला. गावातील मुले तालुक्याच्या ठिकाणी शिकू लागली. लोकांना थोडयाफार नोकऱ्या मिळाल्या पण जसजसा काळ पुढे सरकत गेला. तसा परिस्थितीत बदल होत गेला. वाढती लोकसंख्या, कुचकामी शिक्षण, यामुळे लोकांना नोकऱ्या मिळणे दुरापास्त झाल्या.त्यामुळे खेडयात शिकलेल्या मुलांची बेरोजगारी वाढत गेली. ज्या थोडया फार संधी होत्या, त्यात स्पर्धा वाढली. डोनेशन सुरू झाले. त्यामुळे तेथील तरूणांच्या मानसिकतेवर त्याचा परिणाम झाला. ही मुले शेतीपासून तुटत गेली.

“काम नाही धाम नाही डिग्री तशीच उपाशी
भाव नाही म्हणून जशी घरात पडते कपाशी”

या बदलत्या वातावरणामुळे ग्रामीण संस्कृतीवर विपरीत परिणाम होऊ लागले. गावाचे वैभव नष्ट होऊन गावाला वैराणपण येऊ लागले. दुसरीकडे गावात पंचायत राजसारख्या संस्था निर्माण झाल्या. सहकारी सोसायटया, दुग्ध संस्था, साखर कारखाने यामधील सत्तास्पर्धा वाढल्या खेडयात सत्तेसाठी जातीपातीचे राजकारण सुरू झाले. त्यामुळे गावातील पूर्वीचा एकोपा नाहीसा होऊ लागला. दारिद्रय, गरिबी वाढत गेली. या समकालीन ग्रामवास्तवालाही ही कविता तन्मयतेने मांडते.

“गावातल्या भव्य भिंती आता ढासळू लागल्या
लाज तुऱ्हाटया पऱ्हाटया त्यांची सांभाळू लागल्या”

गावातील पूर्वीचे वैभव नष्ट होत आहे. पूर्वीच्या मोठयामोठया वाडयावर आता तुऱ्हाटया, पऱ्हाटया यांचे कूळ आलेले आहेत, ही गावाला आलेली दुर्दशा ही कविता मांडत जाते. विजेचे पंप आल्याने भूर्गभातील पाण्याचा उपसा होऊ लागला. त्यामुळे विहिरी, तळी, तलाव आटायला लागले. यामुळे माणसाची हृदयही खोलखोल जाऊ लागली. गावातील पूर्वीचे धार्मिक व्यवहार कमी झाले. देवळे ओस पडू लागली. भक्तीभाव कमी झाला. त्यामुळे खेडयातील पूर्वीची भजने, सप्ताह, पारायणे कमी व्हायला लागली. याचा परिणाम गावावर वाईट झाला.

“कसा फूलायचा इथे सांगा सावत्याचा मळा?
दांडातल्या पाणीयाचा कुणी घोटलेला गळा”

हा प्रश्न कवीला पडतो. वाघांची कविता येथील ग्रामजीवनातील लोकांच्या दु:खाशी एकरूप होऊन प्रकटले. जनसामान्य लोकांविषयी त्यांना असलेली तळमळ, आत्मीयता त्यांच्या कवितेतून तेवढयाच समर्थपणे व्यक्त होते.

या काळात गावातला माणूस शहराकडे स्थलांतरीत होत गेला. त्यामुळे शहरातील झोपडपट्टयाची संख्या वाढली. १९९१ साली भारताने मिश्र अर्थव्यवस्थेचा त्याग करून खुल्या आर्थिक धोरणाचा स्वीकार केला. जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण यांची सर्व क्षेत्रात रेलचेल सुरू झाली. बहुराष्ट्रीय कंपन्या भारतात पाय रोवू लागल्या. शेतीच्या क्षेत्रातही उलथापालथ सुरू झाली. बियाणे, खते, किटकनाशके यांची भाववाढ झाली. सरकारचे आयात–निर्यात धोरणे पक्के नसल्याने त्यात चढउतार होत राहिला. पेटंटविषयक समस्या उद्‌भविल्या. भारतातील शेतीही जागतिक स्पर्धेत ओढल्या गेली. विकसित देशातील शेतकऱ्यांना ज्या सवलती, अनुदाने मिळत होती त्या तुलनेत भारतीय शेतकऱ्यांना मिळणारी अनुदाने व सवलती अगदी अत्यल्प होत्या. त्यामुळे, मागासलेली भारतीय शेती अधिक मागासल्या गेली. येथील ग्रामीण परिसरात गरिबी, दारिद्रय, उपासमार यांची तिव्रता वाढत गेली. ह्यासर्व चक्रव्यूहात सापडलेल्या भारतीय शेतीपुढे विशेष आर्थिक क्षेत्र (**SEZ**) च्या सारखी अनेक संकटे उभी राहिली. वडिलोपार्जित शेतीचा ताबा या कंपन्या घेऊ लागल्या. सामान्य माणसाच्या भावनांशी या कंपन्यांना काही फारसे घेणेदेणे नव्हते. त्यातही मोठया धरणामुळे जमीन अधिग्रहीत होऊ लागली. गावे विस्थापित होत राहिली.

“कारखानदारीसाठी सुपीक जमीन आता घेऊ लागले
बाजारबसवे माऊलीची बेभाव किंमत लादू लागले”

सुपीक जमिनीवर उद्योग उभारल्या जाऊ लागले. त्यामुळे, पारंपरिक ग्रामसंस्कृतीचा विनाश सुरू झाला. यात भरडल्या गेला येथील शेतकरी, शेतमजूर, स्त्रिया, कामगार यासोबत शेतीमातीतील सर्व घटक.

"खड्डयात गेली खेडी तरी शहरं होतील शांघाय
शोध घेता लेकराचा हरवलेली असेलं माय"

हजारो वर्षापासून नांदत असलेल्या व भारतीय संस्कृतीचा प्राण असलेल्या शेतीसंस्कृतीमधील हे परिवर्तन, ही कविता मांडत राहते.

'विशेष आर्थिक क्षेत्र' त्यासाठी शेतकऱ्यांच्या बळकावलेल्या जमिनी या ज्वलंत प्रश्नालाही ही कविता स्थान देते. श्रीमंत उद्योगपती, भांडवलदारांच्या विकासासाठी केल्या जाते, मात्र शेतीमातीवर पोट असणाऱ्या सामान्य भूमिपुत्राचे काय? हा कवीला प्रश्न पडतो–

"प्रस्थापितासाठी कुणी विस्थापित व्हायला हवे
भूमिपुत्रा तुच राजा असूनही माती व्हायला हवे"

ज्याच्या जीवनाची पूर्वीच माती झाली आहे, त्याच्या नशिबी हे काय? सर्व बाबींसाठी शेतकऱ्याचा का बळी दिल्या जातो? भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा हा मोठा दुष्परिणाम आहे. लोकांनी ज्या राज्यकर्त्यांना निवडून दिले असते, त्यांना शेतकऱ्याशी काही घेणे देणे राहत नाही. शेतकऱ्यांचे कैवारी म्हणून घेणारे हे राज्यकर्ते स्वार्थासाठी काय करतील याचा भरवसा नाही. लोकशाहीत सामान्य माणसाची होणारी ही दैन्यावस्था, त्याला जबाबदार शोषणाकर्त्यांचा समाचार ही कविता घेते–

"शासन कसलं दु:शासन तेच वामन होत असते
पाताळयंत्री सिंगुरात हकनाक बळी घेत असते."

मोठया मोठया उद्योग प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनी मातीमोल भावाने घेतल्या जातात. त्यांच्या मोबदल्यात त्याला मिळते बकालावस्थेचे जगणे. त्या पोशिंद्याच्या पाठीशी कुणी उभे राहत नाही. केवळ पैशाच्या मागे धावणाऱ्या या व्यवस्थेला पारंपरिक ऋणानुबंधाचे काहीही वाटत नाही. कवीला प्रश्न पडतो देशाच्या प्रगतीसाठी केवळ शेतकऱ्याने त्याग का करायचा?

"धरण बांधले जाते निर्वंश करूनी वस्ती
पाराच्या सोबत लोपे हनुमंताची मस्ती"

ग्रामसंस्कृतीचे हे बलिदान अनेक प्रश्न निर्माण करते. शेतीमातीची अशीच दुरावस्था सुरू राहिली तर गरीब विरूध्द श्रीमंत, ग्रामीण विरूध्द शहरी असा नवा संघर्ष कदाचित येथे उभा राहण्यास वेळ लागणार नाही, असे कवीला वाटते. जगण्यातले सारे माणुसकीचे संदर्भ संपले तर –

"जगण्यात राम नसेल तर, वाल्मिकीचा वाल्या होईल
आणि नवे महाभारत, कुरूक्षेत्री लढल्या जाईल.

'गावशिव' या काव्यसंग्रहातील अनेक कविता, स्त्रियांच्या प्रणयभावनेला आविष्कृत करतात. 'आशय', 'नाही म्हण तू', 'अमृताचे पाणी', 'थवा', 'काटे' या कविता यादृष्टीने महत्त्वपूर्ण ठरतात. 'वेदांत' या कवितेतून कवीच्या आशयगर्भ चिंतनशिलतेचा परिचय घडतो. पोथ्यापुराणातील फोलपणा, त्यात लोकांचे फसणे, चुकीच्या तत्त्वांना सांगून आजही जनतेला नाडविल्या जाते. या लोकांना खऱ्या ज्ञानाची उपदेश करताना कवी म्हणतो–

"अमृताचे खरे नाही
सत्य फक्त पाणी आहे
एवढे ज्याला कळले तोच
वेदांत्याहून ज्ञानी आहे"

## निष्कर्ष :–

हे सत्य सांगत असतांना वाघांची कविता तेवढीच आशावादी आहे. येथील ग्रामसंस्कृतीवर हजारो वर्षापासून अनेक आरिष्टे समर्थपणे तोंड देण्याची शक्ती देणारी ही कविता तेवढी आशयगर्भ आहे. वाघांचे बालपण खेडयात गेल्याने ग्रामीणतेची पाळेमुळे त्यांच्या कवितेत खोलवर रुजलेली आहेत. वऱ्हाडच्या ग्रामीण संस्कृतीच्या पाऊलखुणा अनेक कवितांमधून प्रकट होतात. ग्रामीण संस्कृतीतील शेती, माती, पिके, निसर्ग, गुरे, ढोरे, सण, उत्सव, जत्रा, रीतिरिवाज या सगळया माणसांशी असणारा ऋणानुबंध अनेक कवितांमधून व्यक्त होतो. येथील ग्रामीण भागातील लोकांवर असणारा वारकरी संप्रदायाचा प्रभाव त्या अनुषंगाने येणाऱ्या प्रतिमा, प्रतीके येथे लक्षणीय ठरतात.

## संदर्भ ग्रंथसूची :—

१) समकालीन ग्रामीण साहित्य डॉ.विठ्ठल वाघ गौरवग्रंथ, संपादक डॉ.श्रीकृष्ण काकडे, प्रा.सावसाहेब काळे
२) शिंदे डॉ. रणधिर, 'आमची ग्रामीण कविता वाङमय', प्रवृत्ती तत्वशोध
३) भोळे भा.ल. सप्टेंबर—ऑक्टोंबर २००० 'सत्तरीनंतरचे सामाजिक बदल आणि मराठी साहित्य'
४) भवरे महेंद्र (२००७) 'मराठी कवितेच्या नव्या दिशा' लोकवाङमय गृह, मुंबई
५) सार्वेकर, कैलास (१९९९) 'मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास', मेहता पब्लीशिंग हाऊस ,पुणे
६) गावशिव — डॉ.विठ्ठल वाघ

❖❖❖

# लठ्ठपणा

प्रा.डॉ. कल्पना पंडीतराव कोरडे
गृहअर्थशास्त्र विभागप्रमुख
शिवशक्ती महाविद्यालय, बाभूळगाव, जि. यवतमाळ

विकसनशील देशात प्रामुख्याने आढळणारी समस्या म्हणजे वाढलेले वजन. सध्या चीन, भारतात ३० टक्के अधिक नागरिक लठ्ठपणाचा सामना करीत आहे. सध्या भरतात २० लक्ष नागरिक असून, ही वाढ राहिल्यास २०३० साली संख्या ५० दशलक्ष पर्यंतजाण्याची शक्यता आहे ज्यावेळी एखाद्या व्यक्तीचे वनज सर्वसाधारण वनज असायला हवे. त्यापेक्षा वजन व उंची याचा योग्य प्रमाणपेक्षा १० टक्के जास्त असते, अशा व्यक्तीमध्ये स्थुलता येते.

लठ्ठपणाहा एक आजार असून, यामुळ उच्चरक्तदाब, कंबरदुखी, हृदयाचे आजार, कर्करोग, गुडघेदुखीचा धोका वाढतो. पुरूषांमध्ये लठ्ठपणा साधारण पस्तीशीनंतर आणि महिलांमध्ये मासीकपाळी बंद झाल्यावर होऊ शकतो. बदलत्या शैलीमुळे बालवयात, किशोरवयात ही समस्या वाढते. भारतीय इंटरनेट आणि मोबाईल असोसिएशनच्या आकडेवारीनुसार २०१७ साली मोबाईलचा वापर केल्यास शहरात ५१ टक्के तर ग्रामीण १६ टक्के वाढ झाली. सेंट्रल व्होकार्ट हॉस्पिटलने नोंदविलेला लठ्ठपणा हा आजार आहे, कळायला वेळ लागतो.

शरीरात जरूरीपेक्षा जास्त कॅलरीज असणाऱ्या व्यक्तीला लठ्ठपणाचा त्रास होतो. शरीरातील कॅलरीज आणि शरीराबाहेर टाकल्या जाणाऱ्या कॅलरीमधील असमतोल, अनुवंशिकता, पर्यावरण मानसिक आणि अन्य कारणांनी लठ्ठपणा येतो. चरबी आणि साखरयुक्त पदार्थाचे सेवन, शरीरश्रमाचा अभाव या कारणांमुळे १९८० पासूनभुतलावरील लठ्ठपणाचे प्रमाणतिपटीने वाढले. अमेरिका, इंग्लंड, मध्यपूर्व, चीन, भारतात हे प्रमाण प्रामुख्याने वाढत आहे.

भारतासारख्या विकसशील देशात लठ्ठपणाचे प्रमाण झपाट्याने वाढत असल्याचे एका अभ्यासकांनी दर्शविले. चेन्नई ते चंदीगड येथील लोकांच्या केलेल्या तपासणीत असे आढळले की, अलिकडच्या काळात लठ्ठपणाचे प्रमाण अधिकच वाढत आहे. आंध्रप्रदेशातील शहरी भागात ४.०३३ स्त्रियांचा अभ्यास करण्यात आला. त्यापैकी ३६ टक्के स्त्रियांचे वनज जास्त किंवा त्या लठ्ठ असल्याचे आढळले. 'न्युट्रिशियनीस्ट फाऊंडेशन ऑफ इंडिया' ने मध्यम वर्गातील स्त्री–पुरूषांच्या केलेल्या पाहणीत असे आढळून आले की, ५९ टक्के स्त्रीया आणि ३३ टक्के पुरूष लठ्ठपणाने जास्त आहेत.

अयोग्य आहार, बैठीजीवनशैली यामुळे लठ्ठपणाचे प्रमाण वाढत आहे. गतिमान जीवन, निकृष्ठ आहाराचे सेवन, शरीराला आवश्यक नसणाऱ्या अन्नाचे सेवन यामुळे लठ्ठपणा वाढतो. तसेच नवीन पिढी पिझ्झा, बर्गर, चॉकलेटस आणि शितपेय यांचे आहारातील सेवन, त्याचबरोबर घरातील आधुनिक मशीन, प्रवास, आरामदायी जीवनशैली, कमी श्रम यामुळे लठ्ठपणाला आमंत्रण मिळते.

लठ्ठपणा आणि मधुमेह यांचा जवळचा संबंध आहे. ८० टक्के पेक्षा अधिक प्रमाणात परस्परसंबंध आहे. या दोन्ही समस्या एकत्र असल्यास त्याला ''रियलकॉम्बिनेशन'' म्हणतात. भारताला मधुमेहाची राजधानी म्हणतात. त्यामुळे विविध आजार भारतीयांमध्ये होत आहे. उच्चरक्तदाब, हृदयरोग, किडणीचेआजार, लिव्हरचे आजार, पॅरालिसीस, गॅंगरीन इ.

लठ्ठपणा दोन प्रकारचा असतो. सिंपल ओबेसीटी आणि कॉम्प्लेक्स अशा दोन भागात वर्गीकरण केले. सिम्पलमध्ये कुठलाही त्रास नसतो. अशा ओबेसीटीचे प्रमाण लाखात एक व्यक्ती त्यापेक्षा कमी हा दुर्मिळ लठ्ठपणा मानला जातो.

## ओबेसीटीची वर्गवारी भारतीय वंशामध्ये पुढीलप्रमाणे :—


२३ ते २८ किलोग्रॅम पॅरामीटर/स्पेअर बी.एम.आय. २ उंची व वजन यांचेगुणोत्तर
हा ओव्हरवेट मानला जातो.
२८ ते ३२ किलोग्रॅम / स्क्वेअरबी.एम.आय. हीग्रेड एक ओबेसीटी
३२ ते ३६ किलोग्रॅम / स्क्वेअरबी.एम.आय. ग्रेडदोन


३७ किलोग्रॅम / स्क्वेअरबी.एम.आय. ग्रेड ३


## लठ्ठपणा ओळखावा कसा :—


आपण लठ्ठपणा मोजमाप करायच ाअसेल तर त्यासाठी 'बॉडीमास इंडेक्स' अर्थात 'बी.एम.आय.' तपासून पहावे. किलोग्रॅममधील वजनाला उंचीच्या वजनाने भागून बी.एम.आय. काढतात..


१८.५ ते २४.९ बी.एम.आय. ३० असणे लठ्ठपणात मोडते..







## शरीरावर होणारे परिणाम :–

- लठ्ठपणा वाढण्यास रक्तदाब, मधुमेह, हृदयरोग, वंधत्व असे आजार होतात. लठ्ठपणावर टिका केल्यास अपमान होऊन हृदयावर दाब येतो. त्यामुळे रक्तदाब वाढतो किंवा कमी होतो.
- शरीराचे सौंदर्य, सुडौलपणा, बेढंग होतो, प्रवास करणे, उठणे, बसणे, धावणे, सायकल चालविणे, गाडी चालविण्यास त्रास होतो.
- वजनामुळे सांध्यावर दाब, सांधेदुखी होते.
- हारमोन्स असंतुलन, वेळेवर पाळी न येणे, हारमोन्स बिघडणे, स्त्रियांमध्ये वंधत्व, शुक्रजंतुंची वाढ व्यवस्थित न होणे, थॅयरॉडचा विकार, धातीची वाढ होते.
- श्वसनसंस्थेवर दाब पडल्यास दम लागणे, पाठीवर झोपता न येणे, उच्चरक्तदाब, घोरणे, सकाळी उठल्यावर थकवा येणे, पोटाचा घेर वाढणे ही समस्या चरबीशी संबंधित आहे. मेदाच्या पेशी अतीकार्यशील असतात यामधून शेकडो द्रव्य स्त्रावतात, पचनाच्या तक्रारी, चयापचय प्रकियेवर परिणाम होतो.




Indian needs to loose weight.

Almost 3 out of 4 Indian are overweight 73 % of undrain Indian are overweight.

Max risk is 28-38 years highest risk weight gain for man & Women need to lose.

## लठ्ठपणा कमी करण्याचे उपाय

१. प्रत्येक पंधरवाड्यात १ किलो वजन घटविणे आवश्यक असते. मनाशी निश्चय करा, असे ६ महिने करावे.
२. बेसलाईनपासून १० टक्के वनज कमी झाले पाहिजे, या दृष्टीने जीवनशैली ठेवावी.
३. शारिरीक श्रम योग्य पध्दतीने करावे.
४. कॅलरीज कमी करण्यासाठी चरबीयुक्त आणि कार्बोहायड्रेटसयुक्त आहार टाळा, योजनाबध्द आयोजनामुळे दिवसाला ५०० ते १००० कॅलरी कमी होतात.
५. व्यायामाचे प्रमाण सुरूवातीला कमी नंतर वाढवावे. दिवसाला ३० ते ४५ मिनीट निदान हवे. शारीरिक श्रम, पोहणे, सायकल चालविणे, धावणे, खेळणे, श्रम करणे, व्हॉलीबॉल, फुटबॉलअ से शारीरिक थकविणारे खेळ खेळणे आवश्यक आहे.
६. छुपारी झोपण`आणि सकाळी उशीरा उठणे टाळा.
७. तळलेलेपदार्थ, चिज, आईसक्रीम, फळाचे मिल्कशेक, केळी इ. आहारात कमी प्रमाणात असावे.
८. टी.व्ही. पाहताना शेंगदाने, काजू, वेफर्स खाणे टाळावे.
९. गोठवलेले, हवाबंद पदार्थ उभ्याने खाणे टाळावे.
१०. लठ्ठपणा कमी करण्यास रोज ८ ते १० ग्लास पाणी पिणे गरजेचे.

११. सकाळी १ चमचा मध, लिंबाचा रसआणि १ ग्लास कोमट पाणी प्यावे. आहारात सॅलॅड, ज्युस, कांदा, मुळा, गाजर, काकडी, पानकोबी घेतल्यास कॅलरी व जीवनसत्वे मिळतात.

१२. आहारात तळलेले पदार्थ, गोड पदार्थ टाळा.

१३. जेवनानंतर लगेच झोपू नका.

आहारात बंधन असावे, दुध, तुप, मेदयुक्त पदार्थ, अतीआहार, जास्त कॅलरीयुक्त पदार्थ टाळावे, फळे, सुकामेवा याचाआस्वाद कमी प्रमाणात घ्यावा.

लठ्ठपणा मानवी जीवनाला घातक असल्यामुळे यावर बंधन असणे महत्वाचे आहे.

## संदर्भसूची :—


१. फॅमिली डॉक्टर ५ डिसेंबर २००३
२. सकाळ २००४ (२२ ऑक्टोबर)
३. www.healthcare
४. https/www.hcbi,hith.gov
५. आहारशास्त्र सौ. विमला ठक्कर


❖❖❖

# Changing Role of Academic Librarian in E-environment

**Dr. G.P. Urkunde**
Librarian
Indira Mahavidyalay, Kalamb
E Mail: urkundeganpat@gmail.com

## Abstract :-

Library is one of the beneficial source of education. Within Higher Education from establishment of UGC (1953) in India, it brought out reform in college education by relating colleges from rigid system or traditional course, which resulted development in Library collection in the UGC six plan development proposal. According to Dr. S R Ranganathan, librarianship as such, does not enjoin on the person in profession more provision of books and other reading materials for its clientele, but is also exports him to provide information ideas to its reader.

## Keywords :-

Role of librarian E environment, Digital libraries, librarian as knowledge manager, the future of libraries.

## Introduction :-

Digital information is changing the role of librarian radically: no longer are they to wait for student to ask for assistance in finding information in a place called a library. The new role makes it imperative for them to provide service and instructions regardless of place time of format.

A librarian or information professional must be able to participate activity in the educational process rather than gathering and disseminating to the public through workshop, orientation, training etc. as the information technologies are changed day to day and growing at a tremendous speed, the knowledge society is becoming more complex, competitive and dependent of technological changes and information explosion. The need of e-information services to the uses are also growing and becoming very essential.

## Changing Role Of Librarian :

The environment in which librarian works changing is terms of greater access to a rage of information, increased speed in acquiring information greater complexity in locating analyzing and linking information constantly changing technology and adaptation lack of standardization of both hardware and software continuous learning for user and staff management of financial investment for technology.

Librarian are indeed becoming increasingly required to take or completely new roles. Other new role includes teaching quality assessment. Support and research assessment. All of these are very time consuming for librarian: extensive planning need to take place, documentation should be prepared, meetings attended, but once again these development are opportunities. The can be used as a activity working as partnership with institution and of putting in place of mechanism of communication and consultation.

Librarian has to change himself and acquire more skill and additional role. The most pressing and pervasive issue and challenges that the library and information science professional face in the present digital era for providing digital information.

1) Collection of digital e- Resources.
2) New generation of learner

3) Technology challenges
4) Organizational structure.
5) Preservation digital e- Resource.

## Digital libraries :

Librarian have to change their role in the E environment by participating in E learning experiment and becoming involved in university e learning centers. They should invest in procuring e learning tools and software and should develop their e learning and ICT skill Hans roes addressed changes in education in general and they focused on strategic opportunities in education for libraries.

## Librarian as knowledge manager :

Knowledge management involves the identification and analysis of available and required knowledge, and the subsequent planning and control of actions to develop knowledge assets so, as to fulfill organizational objectives. Organizational worldwide are realizing the advantage of enlisting librarian in the knowledge management system. Librarian as a part of knowledge management system can effectively participate in the process of knowledge creation which includes mechanism for knowledge capture, exploitation and protection besides in required infrastructure creation by the virtue of capabilities gained as information managers of the organization.

## Proactive information professional role :

The wonder trend is for the role of the librarian to move from that of a positive intermediary role responsible for guiding patrons to appropriate information resources, towards that of a much more protective professional role which includes analyzing and repackaging information, content information management system and institute digital repository management system.

## The future of libraries :-

When every student has the potential to carry a global library on the device in his or her pocket, the role of physical libraries may become even more important, not just a place to house resources, but our in which to create meaning from them. The librarian of the 21$^{st}$ century provide a welcoming common space that encourages exploration, creation and collaboration between student, teacher and broader community. They bring together the best of the physical and digital to create learning hubs. Ultimately, libraries will continue to inspire student to construct new knowledge and meaning from the world around them.

## Staff development Programme :-

Information retrieval in the most obvious skill a librarian demonstrate to the public, adequately skilled staff should be recruited to meet the increased demand of the knowledge society with a rapidly changing environment both within and outside the library, staff development programme are essential to the continued success of the organization.

## Conclusion :-

Librarian on this digital era are the position to change their role as arbitrary information scientist and to meet the challenges of the internet, world wide web, and online access in the knowledge society. Library staff must be capable of working effectively in partnership with faculty members to enhance the strength of teaching and research. Librarian a professional trained in the acquisition, organization, retrieval and dissemination of information need to adapt and acquire new skill of digital age.

## Reference :-

1) Ansari (Mehtabalam) digital librarian : needs technology and benefit. ILA bulletin Vol 38 (3) 2003 page-22.
2) Kumbhar S S and Walldiah T Y (2007)
Changing role of library professional. On the digital age. Indian journals of information library & society 20(3-4).
3) Nageshwara, K Rao and Babu K H (2001) 'Role of librarian in internet and world wide web environment' information science 4 page no-25-30.
4) Pandya, Meera M (2015) 'changing role of librarian in E-environment' paripex Indian journal of applied research 4(12) page no 126-137
5) Rajput P S and Naidu G H (2009). Digital recourses and librarian, Indian journal of information library & society 22(3-4)

❖❖❖

Research Journal of India / Vol. 5 / Issue 1 / Oct. 2018 / ISSN 2349-9370/ 49

# मराठी निवडक कथेतील बदलत्या जाणिवा

डॉ. सुवर्णा गाडगे
श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती

साहित्य आणि समाज यांच्यातील संबंधांचा विचार पुन:पुन्हा होतो. कारण बदलत्या काळानुरुप संदर्भ बदलतात. त्याचप्रमाणे सामाजिकता आणि कलात्मकता यांच्या संबंधाचा विचार साहित्य होत असतो. मराठी साहित्य क्षेत्रात काळानूरुप अनेक परीवर्तने झाली. मराठी भाषा व साहित्याच्या प्राचीन ते अर्वाचीन वाङमयाच्या विविधांगी रुपाने महानुभाव, संतसाहित्य, पंडिती, शाहिरी वाङ्मय, आधूनिक साहित्याने नेहमीच समाजमनाला आकर्षीले आहे. कथा, कादंबरी, नाटक, कविता, चरित्र—आत्मचरित्र इत्यादी विविध साहित्यप्रकारांनी त्यात्या काळाचा समर्पक वेध घेतला आहे. तत्कालिन सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक घडामोडीचा समाजजीवनाशी असलेला संबंध कायमच मराठी साहित्याने टिपला आहे. साहित्य हे मराठी समाजजीवनाचे सर्वंकष प्रतिनिधित्व करीत आले आहे. काही वेळा ते वास्तवाला भिडणारे तर प्रसंगी कल्पना विलासात रमणारे राहिले आहे. सर्वसामान्यपणे एकोणाविसाच्या शतकाच्या उंबरठ्यावर मराठी ग्रामीण प्रादेशिक साहित्याची निर्मिती होऊ लागली असे मानले जाते. साहित्य व मनुष्याच्या भावना यांच्या परस्पर संबंधाचे दर्शन साहित्यकृती घडवित असते. अठराशे सत्तरच्या दशकापासून मराठी साहित्य एका नव्या तेजाने अवतरु लागले. काळानुरुप होणारे बदल, आधूनिक काळाची चाहूल साहित्यातून अनेक वाङ्मयरुप घेवून साकारु लागली. आधुनिकते बरोबरच सामाजिक वास्तवाचे भान मराठी साहित्याला लाभले. यातूनच पुढील दशकात काव्य, नाट्य, कादंबरी, कथा यांची सामाजिक आशयनिष्ठ निर्मिती होऊ लागली. त्याकाळात लिहिता वर्ग हा पांढरपेशी, नागरी, शिक्षित होता. साहजिकच त्यांच्या लेखनीने त्यांचेच सुखदु:ख, प्रश्न, परंपरागत चालीरीती याच रिंगणाला स्पर्श केलेला दिसतो. याकाळातील साहित्याने सर्वंकष मराठी समाजजीवनाचे प्रतिनिधित्व केले असे म्हणता येणार नाही. नगराव्यतिरिक्त ग्रामीण, शोषित वर्गाच्यालोकजीवनाला ते स्पर्श करु शकले नाही. विशिष्ट नागरी सामाजिक जीवनानुभव असे जरी हे साहित्य असले तरी देखिल साहित्य निर्मितीची जाण व अभिसरण मात्र चालू झाले.

१८९७ साली महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला होता. त्याच काळात हरिभाऊ आपटे यांनी १८९० साली ‘करमणूक पत्र’ सुरु केले. आधुनिक मराठी कथेचा जन्म त्याच सुमारास झाला. हरिभाऊंच्या ‘स्फुट गोष्टी’ पासून आधूनिक मराठी कथावाङ्.मयाचा प्रवाह सुरु झाला. त्यापूर्वी मराठी कथालेखन होत नव्हते असे नाही. आख्यानक कविता, कथागीत, पोवाडा, लावणी वगैरे माध्यमातून प्राचीन काळी कथा प्रकट होत होती. लोकांचे मनोरंजन करुन त्यांना अध्यात्माचे व भक्तिमार्गाचे धडे देणे हेच त्या वेळी तिचे प्रयोजन होते. प्राचीन महानुभाव गद्यामध्ये अवतरलेली कथा तेराव्या शतकातील चक्रधर स्वामीची वेळोवेळी दिलेले दृष्टांन्त कथा, महानुभाव पंथाचे तत्त्वज्ञान, दृष्टान्तपाठ या ग्रंथातून दिसते. जात्यन्ध आणि हत्ती, कठियाचा दृष्टांन्त, सशाचा दृष्टांन्त इत्यादी कितीतरी दृष्टांन्तातून कथा सांगण्याचे कौशल्य दिसते. तसेच महानुभाविय लीळाचरित्र, गोविंदप्रभूचरित्र या चरित्र ग्रंथात व स्मृतिस्थळ या ग्रंथात स्वामीची प्रत्येक आठवण कथेचे मोहक रुप धारण करते. याच काळात कथेने आणखी विलोभनीय रुप घेत कहाण्या, लोककथा, व्रतमहात्म, देवदेवता, दैवतांच्या कहाणी कथारुप घेते. छोट्या छोट्या भावपूर्ण वाक्यरचना आशयगर्भ व बोध प्रतीत करतात. तत्कालीन लोकजीवना सोबतच स्त्री जीवनाविषयी ह्या कहाण्या विशेष मोहक होतात.

आटपाट नगरात सुरु झालेली ही साठा उत्तराची कहाणी पाचा उत्तरी सुफळ व संपूर्ण होतांना मनाला विलक्षण चटका लावून जाते. लोकसाहित्यातील ह्या कथा प्रत्येक गावात व प्रदेशात परंपरेने चालत आलेल्या असून जितक्या अद्भुत तितक्याच चटकदार वाटतात. आधूनिक मराठी कथा हरिभाऊ आपटे यांच्या ‘करमणूक’ या नियतकालिकातून सुरु झाली. त्यापूर्वी अव्वल इंग्रजांच्या काळात, ज्या कथा लिहिल्या गेल्या त्यांचे स्वरुप बहुतांशी भाषांतरित, अनुकरणात्मक व अद्भुतरम्य असेच होते. त्या काळात निर्माण झालेल्या मराठी भाषेतील ‘सुरस गोष्टी’ भाग पहिला अशा सारखे गोष्टींचे संग्रह प्रसिध्द होवू लागले. त्याचबरोबर ‘बिरबल बादशहा’, ‘अकबर’, ‘भोजराजा’ आणि ‘कालिदास’ यांच्या गोष्टी इत्यादींना बहर आला होता. मराठी ज्ञानप्रसारक, विविध ज्ञान विस्तार, निबंधचंद्रिका, मनोरंजन इ. नियतकालिकातून प्रसिध्द होत असलेल्या त्या काळच्या गोष्टीचे स्वरुप अनुवादित होते. त्यामधून काही दंतकथांवर आधारलेल्या ऐतिहासिक कथा उपदेशपर रुपकात्म तर काही सामाजिक

कथाही होत्या. मात्र ह्या सर्वांचे स्वरुप अद्‌भुतरम्य व अवास्तव, कल्पनारम्य असे होते. संस्कृत वा इंग्रजीमधून भाषांतरित झालेल्या या कथांना स्वत:ची स्वतंत्र अशी शैली, आकार विश्व नव्हते. यापार्श्वभूमीवर हरिभाऊ आपटे ची 'स्फुट गोष्ट' एकदम उठून दिसते.

मराठी कथावाङ्.मयाला वास्तवाभिमुख करण्याचे कार्य हरिभाऊंच्या स्फुट गोष्टीनी केले व मराठी कथेला स्वतंत्र आकार व शैलीही दिली. मात्र लघुकथेचे जे तंत्रबध्द व विकसित स्वरुप आहे ते त्यांच्या कथेला नव्हते. सुरुवातीच्या त्याच्या काही कथा 'अपकाराची फेड उपकारानेच', 'थोड्या चुकीचा घोर परिणाम', 'काळ तर मोठा कठीण आला' ह्या ऐसपैस झालेल्या आहेत. अगदी कादंबरी प्रमाणे त्या रचना प्रकाराच्या जवळ जाणाऱ्या आहेत. कथेची वेधक पध्दत, वाचकांची उत्कंठा टिकविण्याच सामर्थ त्याच्या नंतरच्या कथेत दिसुन येते. 'पक्की अद्दल घडली', पुरी हौस फिटली', डिप्सेप्सिया, यासारख्या लघुकथेच्या चौकटीत बसणाऱ्या कथा त्यांनी लिहिल्या. त्यांच्यातील विस्मयाचा धक्का देणारे हरिभाऊचे चातुर्य, वाचकांच्या हृदयाचा ठाव घेवू लागले. कथेला मानाचे स्थान देण्याचे कार्य मनोरंजन मासिकाने केले. १९१० च्या दिवाळी अंकापासून कथेचे वेगळे अस्तित्व जाणवू लागले. याकाळात कथेला लोकप्रिय करण्याचे श्रेय प्रामुख्याने वि. सी. गुर्जर यांच्याकडे जाते. मराठी कथेत १९२६ ते १९४० या कालखंडात तंत्रदृष्ट्या, विषयदृष्ट्या व प्रकारदृष्ट्या खूपच विविधता आली. रुपककथा, लघुत्तम कथा या सारखे नवीन कथाप्रकार पुढे आले. प्रादेशिक, ग्रामीण व शहरी वातावरणातून जी अप्रतिहतपणे संचार करु लागली. या काळात रत्नाकर, यशवंत, किर्लोस्कर, ज्योत्स्ना, प्रतिमा त्याप्रमाणे स्त्री, महिला, गृहलक्ष्मी, मनोरमा, सरस्वती, संजीवनी अशी खास स्त्रियांसाठी असलेल्या या नियत कालिकांनी कथेच्या विकासाला चांगलाच हातभार लावला. १९४३—४४ नंतर मात्र कथेचे स्वरुप पालटले. जीवनाचे अधिक वास्तव व सूक्ष्म दर्शन घडविणाऱ्या कथेच्या अनुभूतीच्या कक्षा रुंदावल्या. १९४५ च्या सुमारास 'सत्यकथा', अभिरुची, साहित्य या सारख्या नियतकालिकांनी नवकथेला आवर्जुन समाजापर्यंत पोहचविले.

बदललेल्या यंत्रयुगीन संस्कृतीमध्ये बावरलेल्या मानवी मनाचे सखोल व सुक्ष्म भावनांचे चित्रे कथा रंगवू लागली. १९४५ नंतर कथेत अंतर्बाह्य बदल प्रामुख्याने अरविंद गोखले, गंगाधर गाडगीळ, पु. भा. भावे आणि व्यंकटेश माडगुळकर यांच्या कथातून झालेला स्पष्टपणे जाणवतो. गंगाधर गाडगीळ यांच्या कथेने मराठी कथेच्या दालनात इतके नवे नवे प्रयोग केले आहेत. त्यांच्या बहुविध व संपन्न व्यक्तिमत्वातून अनुभूती व आशयाच्या वेगळेपणातून, आकर्षक शैलीत कथेचे विश्लेषण शब्दबध्द करण्याचे गाडगीळांचे सामर्थ काही निराळेच आहे. गंगाधर गाडगीळ यांच्या 'किडलेली माणसे' त चाळीचाळीत बुजलेल्या भेकड पांढरपेशांचे आंबुस सुख या कथेत आहे. मुंबईतील जातीय दंगलीने धारण केलेले उग्र स्वरुप नि त्यापरिस्थितीत पोलिसांचा करडा अंमल होता. या कथेत पेरुवाड्यातील खुटमुट्याची चाळ म्हणजे मध्यवर्गीय संस्कृतीचा सुपीक मळा. साहेबाची मर्जी व नोकरीत पगारवाढ हे तेथील पुरुषांच्या जीविताचे केंद्रबिंदू होते तर नवऱ्याचा पगार व स्वत:चे सौंदर्य ही प्रत्येक स्त्रीचे जगणे होते. या कथेमध्ये साखर आणि रॉकेल च्या संस्कृतीचे जळते प्रश्न आहे. साहित्यिक मेळावे, गणपती उत्सव हे त्यांचे सामाजिक सोहळे होत, तर प्रेम व विवाह या त्यांच्या अद्‌भुत कथा आहेत. दारिद्र्य आणि संकुचितपणा हा त्यांच्या पिढ्यानपिढ्या चालत आलेला वारसा आहे. सामाजिक, राजकीय व आर्थिक प्रश्नांच्या पर्वताएवढी दु:खे अंगावर चालून आली तरी आपल्या स्वयंकेंद्रित मनोवृत्तीने किंचित न बदलणारी अशी दृढनिश्चयी माणसे दिसून येतात. चाळीच्या खुराड्यात आयुष्याचा चरितार्थ काढणारी ही माणसे कोठल्या तरी कचेरीत किंवा दुय्यम अधिकारी असणारी त्यामुळे घरीदारी भोगावे लागणारे दैन्य व लाचारी यांच्यामुळे मनाला आलेला निबरपणा, सतत कुचंबणेमुळे वा दडपणामुळे भावना व वासनांना आलेली चोरटी विकृती, सामान्य स्वप्ने, धैर्य नसल्याने होणारी ओढाताण, दुबळे संकल्प, विकृत मोह, संकुचित स्वार्थ, अकारण असूया, धुमसणारे रागद्वेष, ओशाळ स्नेह अशा विटक्या कळेचे प्रौढांचे संसार या कथेत दिसून येतात. गाळगोळ्याच्या मनात मानवी जगण्याप्रती गाढ सहानुभूती आहे. त्याच्या कथांमून व्यक्त होणारा अनुभव प्राध्यान्याने शहरवासी व सुशिक्षित पांढरपेशाचा आहे. मानवी जीवनातील अनुभव अत्यंत गुंतागुंतीचा व समिश्र असल्याची प्रगल्भ जाणीव होते. मध्यमवर्गीय समाजात परिस्थिती, रुढ समजुती नितीकल्पना, दारिद्र्य, व्यक्तीगत बंधने, यांत्रिक चाकोरी इ. मुळे येणारे भावनाचे दडपलेपण यामुळे त्यांची मुदडिलेली मते, व्यथावंदनाचे तडे गेलेले अंत:करण अशा दुबळ्या, व्यथित मनाचे चित्रण गाडगीळांच्या कथांतून विशेष झाले आहे. त्यांचा भर व्यक्तीपेक्षा व्यक्तिमत्वावर व वर्णनापेक्षा सूचनावर असतो. व्यथित मनाच्या संवेदना, विसंगती, विकृती, जाणिव, नेणिवांच्या रंगीबेरंगी छटा त्यांनी अत्यंत परिणामकार रितीने कथेत साकारल्या आहे.त्यांच्या कथेचा आणखी एक विशेष म्हणजे त्यांची

प्रयोगशीलता, कथालेखनातील त्यांचे नवे नवे प्रयोग वाचकांना स्तिमित करतात. यामुळे त्यांची कथा सदैव नवी, टवटवीत राहते. विशिष्ट भाववृत्ती संक्रांत करणे हेच त्यांच्या कित्येक कथांचे प्रयोजन राहिले आहे.

व्यंकटेश माडगूळकर यांच्या 'माणदेशी माणस' तील कथा माणदेशाच्या अस्सल कसदार मातीतून निर्माण झाल्या आहे. म्हणूनच त्यांच्या कथेतील जीवंतपणा वाचकास जाणवतो. माणगंगेच्या परिसरातील व्यक्तींचे दारिद्र्य, त्यांचा भोळेपणा, कणखर वृत्ती, अडाणीपणा व विकारसुलभता त्यांच्या समजुती या सर्वांचे दर्शन, एक वेगळेच विश्व ते अस्सल भाषेतून घडवितात. माणदेशी बोलीतील कथा वाचतांना आपण जणू माणदेशाच्या परिसरातच वावरत आहोत की काय, असा भास होतो. ग्रामीण कथेला अद्‌भुताच्या आणि कल्पना रम्यतेच्या कोंडीतून सोडवून वास्तव ग्रामीण कथेचा आदर्श त्यांनी निर्माण केला आहे. नंतरच्या काळातील प्रमुख कथाकारांनी गोखले—गाडगीळ, मांडगुळकर—भावे या नवकथाकारांच्या पावलावर पाऊल ठेवून नव्या प्रवृत्तीच्या कथाची निर्मिती केली. १९५५ नंतरच्या कथेत व्यक्तीच्या अंतर्मनाचा वेध घेत भावनेची सुक्ष्म तरल अविष्कार घडविणारी कथा निर्माण होवू लागली. व्यंकटेश माडगूळकरांनी ग्रामीण कथेला दिलेले निराळे वळण या काळात अनेकांनी गिरविले. या काळात ग्रामीण कथा अतिशय लोकप्रिय झाली. त्या आधी श्री. म. माटे, म. भा. भोसले यांच्या सारख्या जुन्या पिढीतील कथाकारांनी 'उपक्षितांचे अंत:रंग' रंगवावयास सुरवात केलीच होती. त्यात भर घालून ग्रामीण कथेला एक निराळेच परिमाण देण्याचे कार्य शंकर पाटील, द.मा. मिरासदार, उध्दव शेळके, ग. दी. माडगूळकर, शंकरराव खरात, अण्णाभाऊ साठे, गो. नी. दांडेकर, मधू मंगेश कर्णिक, रा. रं. बोराडे, आनंद यादव, मनोहर तल्हार इ.अलीकडच्या राजन गवस पर्यंतच्या कथाकारांनी साक्षेपाने केले. या कथाकारांचे प्रत्येकाचे कथाविश्व, परिसर, अनुभव व्यक्त करण्याची पध्दती यात वेगळेपणा आहे. महाराष्ट्राच्या कोल्हापूर सातारा पासून विदर्भ, मराठवाडा, कोकण इत्यादी भिन्नभिन्न परिसरात रुजलेली कथा त्या परिसरातील ग्रामीण जीवनाचे अंतरंग, व्यथा, वेदना, दु:ख, दैन्य, अज्ञान, अंधश्रध्दा, दारिद्र्य जाणीव, उणीवा, विसंगत—विरोध, मानवी अंतर्मनातील भावभावना रुपरंगासह जिवंतपणे साकार केले. विसंगतीतून विनोद निर्मिती, जीवनाचे वास्तवदर्शी दर्शन, बदलत्या ग्रामीण जीवनाचे भान व बोलीभाषेतील गोडवा व शब्दकला ही कथेने दिली. ग्रामीण कथांतून मानवी स्वभावातील विसंगतीवर आधारलेला विनोद द. मा. मिरासदार यांनी ग्रामीण जीवनातील किस्से आपल्या विनोदी शैलीत कथातून रंगविले आहेत. वामन चोरघडे यांच्या 'संस्कार' या कथेने बालमनाचे निरागसपणे, शालेय जीवनातील जीवनानुभव व दोन लहान मुलांच्या संस्कारक्षम वयातील वर्तनाचे समर्थ चित्र रेखाटले आहे.सलमा ही उर्दू वर्ग दुसरीत शिकणारी आणि तिच्याच वर्गातील मुलाचे भावबंध किती निरामय व मानवी मनाला भिडणारे आहे. पूर्वीचे गाव जातीधर्म भेद पाडणारी असली तरी ही बंधन धूसर होती. माणूसपणाच मूल्य जपलं जात होत. सलोखा एकसंघता, आपलेपणाची गोडी अवीट होती. हिंदूनी मुसलमानाच्या घरी जायचे नाही ते अभक्षभक्षण करतात हा संस्कार बिंबवलेला होता. ''पण, एकमेकांशी व्यवहार करताना—वागताना मात्र धर्मभेद नाही. अशी स्पष्ट मनोधारणा. पण त्यामुळे परस्परांच्या विषयी दुजाभाव किंवा वैर नाही. म्हणजे इथे गांधीजींच्या, 'ईश्वर, अल्ला तेरे नाम। सबको सन्मती दे भगवान।' या भजनातील ओळीचाच साक्षात्कार व्हावा!'' शाळेतील गोट्या खेळतांना तो प्रसंग व त्यातून निर्माण झालेली एक अबोल, अबोध, निरागस, निव्यार्ज—भावनिक गुंतागुंत आणि बालमनातील एकमेकाविषयींचे निर्व्याज प्रेम, सुंदरतेचे संस्कार किती बोलके व अंतर्मनात खोल रुजणारे आहे. सलमाचे सुंदरपण तिच्या विचारात आहे. ती आपल्या बालमित्राला अभद्र वाईट बोलून आपले सुंदरपण तू खराब करु नकोस. हा संस्कारही तितक्याच सुंदरपणे देते. एका संस्कारक्षम वयातल्या मुलीची कथेतील विधाने तेवढ्याच संस्कारक्षम मुलावर संस्कार घडविणारी आहे. या कथेत चोरघडे यांची स्वत:ची अशी खास भाषाशैली आहे. प्रसंगातील जीवंतपणा, मानवी स्वभावाचे विविध पैलू ओघवत्या लेखनशैलीत मानवी मनाचे पापुद्रे व भारतीय संस्कृती आणि गांधीजींच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाचा प्रभाव त्यांच्या कथेवर स्पष्टपणे दिसतो.

व्यंकटेश माडगूळरांचे कथेतील अनुभवविश्व प्रादेशिक आहे. ग्रामीण जीवन ग्रातीण माणूस यांच्याकडे संवेदनशीलतेतून पाहणारे व त्यांच्या जीवनसंस्कृतीचे मर्म जाणून ते प्रकट करणारे समृध्द अनुभव त्यांच्या कथेचे वैशिष्ट्य आहे. ''माडगूळकरांच्या कथा या प्राधान्याने व्यक्तिरेखा प्रधान आहेत. माणदेशाच्या सुखदु:खातून पिंड बनलेल्या माडगूळकरांनी प्रत्यक्ष पाहिलेली गावातली, आपल्या आवारातली, गावाबाहेरची, माळावरची, फिरस्ती, निरनिराळ्या जाती—जमातींची निरनिराळ्या स्वभाववैशिष्ट्यांची, भिन्न रंगरुपाची, निलक्षण सवयीची, जगावेगळं जगण वाट्याला आलेली, सरळ, निष्पापाच्या कारुण्यमूर्ती असलेली, अंतरीच्या उमाळयांनी चिंब होऊन शब्दरुप झालेली माणसे मराठी कथाविश्वाला अमोल लेणे म्हणून बहाल केली आहेत. निसर्ग हा प्रथम पात्र बनून चित्रित झालेला त्यांच्या कथात वावरतो.''[१] व्यक्तीचे स्वभाववैशिष्ट्ये बरोबरच त्याचे सर्वकष सूक्ष्म निरिक्षण आटोपशीर

बोलक्या भाषाशैलीत कथेतून दिसून येते. ' रामा मैलकुली' ही त्यांच्या 'माणदेशी माणसे' या व्यक्तिचित्रणात्मक कथासंग्रहातील कथा. या कथेतील रामा हा मैलाचे दगड रंगवणाऱ्या पेंटरचा मदतनीस (मजूर) म्हणून काम करणारा म्हणून 'मैलकुली' होय. शब्दचित्रामून रामाचे व्यक्तिमत्त्व वाचकाच्या डोळ्यासमोर उभे करणारे माडगुळकर त्यांच्या भाषाशैलीने रामाचे जीवन व्यक्तीत्व सांसारिक जीवन, दु:ख, समजुतदारपणा, गावाविषयीची नात्यागोत्याविषयीची त्याची ओढ, जिव्हाळा दर्शवितातच त्याचबरोबर या कथेतील अगदी सुरवातीला येणाऱ्या म्हातारा व इतर पात्रापासून मागदेशातील गरिबी व अज्ञान जगन्यातील दु:खभोग उणीवा घेवून जीवनव्यथीत करणारा माणदेशी माणूस कथेतून येतो.

माडगुळकरांचे सहप्रवासी असलेल्या शंकर पाटील यांची 'देशी उपाय' ही कथा धिंड या संग्रहातील आहे. त्यांच्या कथेतून ग्रामीण माणसे, त्यांच्या जगण्याबोलण्यावागण्यातून साकारणारे अनुभव कसे जीवन जगण्याचे बळ देते कि दु:ख भोगुनही त्याचा उच्चार न करता अनुभवानी तावून सुलाखून निघालेली ही माणसे आहेत. रामाने त्याच्या बायकोच्या बिमारीवर केलेला हा देशी उपाय होय. स्त्री स्वभावाच्या मर्मावर बोट ठेवून अगदी विनोदी शैलीत रामाने त्याच्या पत्नीच्या आजारपणावर स्वत:च्या पायातील दुखण्याची चांगलीच मात्रा चालविली. रामाच्या आजारपणावरुन गावातील मंडळीचे विविध उपाय त्यातून होणारी शाब्दिक विनोद निर्मिती. खेडूत माणसाच्या स्वभावाचा इरसाल नमुना म्हणजे कथेतील रामा होय. ग्रामीण माणसाच्या भाबडेपणा आपलेपणा व बायकोची खोड देशी उपायाने मोडणारा रामा म्हणजे अस्सल ग्रामीण जीवन दर्शन घडविणारी आहे.

ग्रामीण परिसरातील माणसामधील आगळेपणा द. मा. मिरासदार यांच्या 'माझ्या बापाची पेंड' या कथेतून दिसून येते. माणसाच्या विविध प्रवृत्तीचे, स्वभावाचे चित्रे विनोदशैलीत त्यांनी कथेत रंगविले आहे. त्यांचा विनोदच कथारुप घेवून अवतरतो. शाळेत जातांना भूक अनावर झाल्याने बापाने तेलाच्या घाण्यावरुन आणलेल्या शेंगदाण्याच्या पेंडीचे तुकडे चोरुन खिशात भरुन खात खात शाळेचा रस्ता धरतो. पेंडीचा चूरा घावून त्याला शाळेत गरगरल्या सारखे होते. गुंगी चढू लागल्याने त्याच्या वागण्या बोलण्यातून विनोद निर्माण होतो. त्याच्या खिशातील पेडीचे तुकडे मास्तर खातात व वर्गातील संपूर्ण वातावरणच विनोदात गुंगुन जाते. बापाने गांजा आणून कडब्याच्या खोलीत पेंडीत ठेवल्यामुळे पोलिस त्याला पकडून नेतात. त्याचबरोबर वाचकाला ही या बापाच्या पेंडीचे रहस्य कळते. त्याची कथेतील गुंतागुंत पराकोटीचा विनोद निर्माण करणारी व शेवटी वास्तव सांगणारी आहे.

वऱ्हाडी बोली भाषेत विदर्भातील ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारे उध्दव शेळके यांच्या कथेतून ग्रामीण जीवनातील चालीरीती, वृत्ती–प्रवृत्ती, गावगाडा, गरीबी याचे अनुभव संपन्न वास्तवदर्शी चित्रण येते. ग्रामीण भागातील कष्ट करणारी स्त्री सोशीक आहे. तशी जीवनातील व्यथा वेदना सोसणारी आहे. कुटुंबासाठी गरिबीशी नियतीशी सतत झुंजत जगते आहे. वऱ्हाडी बोलीतील अस्सल शब्द, वाक्प्रचार, वाक्प्रयोग, म्हणी उपमा, प्रतिमा आणि माणसाच्या अंतर्मनावर लक्ष केंद्रित करणारी त्यांची शैली कथेला सर्वस्पर्शी करते. त्यांची 'माय' ही कथा 'शिळाण आणि आठ कथा' या कथासंग्रहातून घेतली आहे. 'माय' कष्ट करणारी सोशीक प्रसंगी तापट व कठोर होणारी, मात्र संसाराचा गाडा अंतरी कळवळ्याने नि प्रेमाणे चालवणारी आहे. गरिबीच्या परिस्थितीत तीन तीन मुलांचा पडेल ते काम करुन सांभाळ करणारी, नवऱ्याचा लहरीपणा वर नाराज होणारी पण स्वत: उपाशी राहून सगळ्या कुटुंबाच्या भूकेसाठी झटणारी ही माय अत्यंत कष्टाळू व घराचं कर्तेपण सांभाळणारी एक कर्तबगार वऱ्हाडी स्त्री आहे. त्याच्या कथेतील मायेचे हे चित्रण प्रातिनिधिक स्वरुप आहे. वऱ्हाडातील अनेक स्त्रियांच्या वाट्याला आलेले हे वास्तविक जीवन आहे. त्याचप्रमाणे करपून गेलेले लहाणपण कष्ट करणारे हात, सतत गरीबी, पोटातील भूकेचा प्रश्न याचा प्रत्यय कथेतून येतो. व्यक्ती आणि परिस्थिती यांचा समन्वय वाचकाला कथेत सामावून घेतो. त्याच्या कथेतील ग्रामीण स्त्री स्त्रीजीवनाचे, विदारक सत्याचे दर्शन घडविते.

कमल देसाई यांची 'माणसाची गोष्ट' ही कथा संगणकाच्या युगात शहरी ग्रामीण माणसाच्या संवेदनहीन अहंकारी वृत्तीतून निसर्ग संस्कृतीचा कसा ऱ्हास होतो आहे. शिवाय निसर्गाचा आक्रोश उलथापालथ घडविणारा आहे. सृष्टीचा विनाश करु पाहणाऱ्या मानवी समूहाला या पासून वाचवणारे कुणीही नसत! या सत्याचे दर्शनही त्यांना कथेत घडविले आहे. बदलत्या ग्रामीण व्यवस्थेचे चित्रण करीत असतांनाच ग्रामीण भागात राहणारा बदलू पाहणारा बुध्द आंबेडकरी विचारांनी सुधारलेल्या दलित वर्गाला गावातील परंपरावादी पाटील मंडळी कशी त्रासदायक ठरते. मात्र पुढील पिढी ही या व्यवस्थेला नाकारुन परिवर्तनाची नांदी स्विकारते. स्वीकारते. परंपरावादी समाज व आत्मभानातून जागृत झालेला विस्थापित समाज यांच्यातील सामाजिक वैचारिक सांस्कृतिक संघर्ष वामन होवाळ यांच्या 'मजल्याचे घर' या कथेतून आलेला आहे. मराठी कथा लेखनातील बदल काळानुरुप होतांना

दिसतात. त्यात माणसाचे यांत्रिकीकरण, यांत्रिक विज्ञान क्षेत्रातील प्रगती 'टॉयचा घोडा' ही जयंत नारळीकर याची विज्ञानकथा आहे. या कथेतील तांत्रीक बाबी, देशाच्या पातळीवर संशोधन व सुरक्षा यंत्रणा इत्यादीमध्ये वाचक कसा गुंतून जातो, याचा प्रत्यय देणारी ही कथा आहे. १९८० नंतरच्या काळात ग्रामीण जीवनातील परिवर्तने, नव्याने निर्माण झालेले प्रश्न त्यामुळे ग्रामीण व्यवस्थेच्या वाट्याला येणारे दु:ख, गरीबी व भाऊबंदकी यामध्ये होरपळणाऱ्या अनेक कुटुंबाची प्राथिनिधीक दर्शन घडविनारी कथा म्हणजे राजन गवस यांची 'हुंदका' होय.

मराठी कथा वाङ्मयाला लाभलेला वारसा व बदलत्या काळातील परिवर्तना सोबत बदलत गेलेले मानवी जीवनाचे संदर्भ कथेने आत्मसात केले आहे. नवकथेपासून तो आजच्या बदलत्या वास्तवापर्यंत कथेचा विचार केला तर कथेचा विषय आशय, अभिव्यक्ती, भाषाशैली, जीवनशैली अशा विविध अंगाने कथेचा विस्तार झालेला दिसतो. ''समाजाचे प्रश्न बदलले, माणसांच्या व्यथा—वेदना, दु:खभोग आणि आशा आकांशा, सुखाच्या कल्पना काळाच्या ओघात बदलत्या संवेदनशील मनाच्या लेखकांनी त्यांच्या कथेतून, साहित्यातून त्याची दखल घेतलेली आहे. म्हणून कथेतून आविष्कारीत होणाऱ्या जाणिवाही बदलल्या. कथा जाणिवांच्या पातळीवर लिहिली जावू लागली''[२] मराठी निवडक कथेच्या बदलत्या जाणीवा आणि आशय विषयाचा संक्षिप्त आढावा प्रस्तुत लेखनात घेतला आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची :—


१. ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास, चंद्रकुमार नलगे, रिया पब्लिकेशन्स कोल्हापूर, २०१३, प्र.क्र. ११३

२. निवडक मराठी कथा, संपादित, राघव पब्लिशर्स अॅन्ड डिस्ट्रीब्युटर्स नागपूर, प्रस्तावना, डॉ. वासुदेव मुलाटे प्र. क्र. ३०

३. ग्रामीण कथा स्वरुप आणि विकास — वासुदेव मुलाटे


❖❖❖

# विधीगीत – डहाका

डॉ.सी.डी. पाखरे
महात्मा फुले महाविद्यालय, वरूड
भ्रमणध्वनी ९८९०२४५२५३

मराठी लोकधर्मात, लोकसंस्कृतीत भगत आणि उपासक म्हणजेच लोकांचे रंजन करणारा वर्ग, यात डहाका गाणारे (कुंभार व दिवर) इत्यांदींचा अंतर्भाव होतो.

डहाका सादरीकरण जे डहाका नावचे वाद्य असते. कुणालाही ते वाद्य वाजविता येत नाही. गायकाची पट्टी सुध्दा अगदी टिपेची असते. दमदार आवाजात त्याचे सादरीकरण होते. डहाका गाताना डहाका हे वाद्य वाजविले जाते. त्याच्या नावावरून या लोकगीत प्रकाराला डहाका हे नाव पडले असावे. आता सोबतीला चोंडके, डफ, टाळ, मंजिरे सुध्दा वाजविल्या जातात.

डहाका हे विधीगीत असल्यामुळे, गणपती उत्सव, नवरात्र, रामनवमी, हनुमान जयंती इ. महत्वाच्या दिवशी सादर केले जाते. त्यात विशिष्ट अशी रंगभूषा व वेशभूषा असत नाही. फक्त सर्वजण डोक्यावर भगवी टोपी घालताना आढळले.

डहाकाचे वेळी मुखवटे वा इतर नेपथ्य आढळत नाही. गीतांची रचना व मांडणी साधी– सोपी पण उपदेशात्मक असल्यामुळे ती सरळ ह्दयाला भिडतात. डहाका गीतांसाठी पुरूषच सादरीकरण करतात. यात महिलांचा सहभाग नगण्यच आढळून आला आहे.

डहाका गीतांमध्ये गण, महादेवाची गाणे, हनुमानाची गाणी, पार्वती देवीची गाणी, महादेवाची आरती असा क्रम असतो तर प्रबोनात्मक गाणीही सादर केल्या जातात. दिवसाच्या विधीला कथागीते गायली जातात. रात्रभराच्या कार्यक्रमाला पंडू, संतगोरोबा, नारद, हरीश्चंद्र, तारामती, चक्रव्युह, अश्वमेघ इत्यादी विषयांवर कथागीते गायली जातात. कुंभार एक गात असतो तर दुसरा त्याची री ओढतो, त्याचा अर्थ सांगतो. मृत व्यक्तीच्या नातेवाईकांचे दु:ख कमी व्हावे, मृत व्यक्तीच्या आत्म्याला शांती व स्वर्गलाभ व्हावा हा हेतू असतो.

मराठी लोकगीतातील बऱ्याच गीतांचा संबंध विधीशी असल्याचे दिसते. विधीतील कृतीशी जसा गीतांचा संबंध असतो तसाच विधी साजरा करण्याशीही गीतांचा संबंध असतो. लग्नविधीतील वधुवरांना हळद लावणे, वीर नाचवणे, रूखवंत ईत्यादी प्रसंगी गाणी गायिली जातात. भुलाबाईची गाणी ही विधीशी संबंधीत आहेत. तसेच वाघ्या मुरळी, पोतराज, धनगर यांच्या गाण्याचा आणि विधीचा अत्यंत जवळचा संबंध असतो. 'महाराष्ट्र' घराण्याचा एक विधी म्हणून डहाक किंवा डाक वाजविण्याची प्रथा काही ठिकाणी आहे. डहाका वाजविणारे प्रामुख्याने कुंभार जातीतच असतात. मुंजाच्या उपासनाविधीत 'डहाका' ला विशेष महत्व आहे. वासुदेव, गोंधळी, वाघ्यामुरळी यांच्या गीतासारखेच डहाक्याच्या गाण्याचे स्वरूप काही प्रमाणात असले तरी गोंधळ आणि जागरणातील नाट्यासारखे नाट्य डहाकात पहावयास मिळत नाही.[१] डहाका हा धार्मिक विधी आहे. त्या विधीत कुटुंबातील मरण पावलेल्या व्यक्तींना आमंत्रित केले जाते. त्यांच्या स्मरणाचे गीत गायन केले जाते. त्यांना डहाकागीतातून आदरांजली वाहिली जाते असा हा डहाका विधी साधारणत: असतो.

'डहाका' किंवा डाक हा विधी कुंभार समाजातील मृत व्यक्तीच्या उत्तरक्रियेच्या वेळी केला जाणारा विधी आहे. कुलाचार म्हणून हा विधी केला जातो. कुंभार समाजातील पुरोहित हा विधी करतात. गणपती, नमन, पानाडी, कामाई, भानक, मंडपी आणि गायत्री या नावाने ओळखल्या जाणाऱ्या रचना यावेळी म्हटल्या जातात. याचे स्वरूप कलगी तुऱ्याच्या आध्यात्मिक लावणी सारखे असते.[२] असे विश्वनाथ शिंदे म्हणतात.. तर या संदर्भात प्रभाकर मांडे लिहितात, 'मराठवाड्यात मात्र वर्णनपर आणि कथागीताच्या स्वरूपाची गाणी उपलब्ध झाली. त्यात आध्यात्मिक गाणी, देवावरील कवणे असतात. परंतु कथानकातच आध्यात्मिक आशय आणलेला असतो. सवाल जवाबाचे कार्यक्रमही डहाकावर होतात.'[३]

डहाकाच्या गीतात अध्यात्माबरोबर देवदेवतांची वर्णनेही केलेली असतात. नरसिंह, मुंजा, म्हसोबा यांच्या रूपगुणाचे आणि महात्म्याचे वर्णन त्यांच्या गीतात आंत्यातिक श्रध्दाभावाने केलेले असते. मुंज्याचे वर्णन करणारे तसेच महादेव पार्वती, गणपतीची कथा गायन करणारे मोठया उल्हासाने कथागीतांचे गायन डहाकाच्या गाण्यातून करतात ते पुढीलप्रमाणे–

नेमू गनराया पहिले नेमू गनराया
बाई बैसली न्हायाले, पारबती बसली न्हायाले
आंगा मये उल्हासली, असा गोळा बन्नवला
असा पुतळा घळला, असा पुतळा घळला
अमृत पाजून सजीव केला, अमृत पाजून सजीव केला
राखन दरवाजी ठेवला
शंकर आले वनातून
कोणाच हाये बाळं हे, नाव बापाचं सांगन?
बाळ मातेजवळ गेला, माझे पित्याच सागनं
तोच तुझा पिता बाबा, शंकर कृधावंत झाले बाबा
दोघा लागलं भांडणं, खरगं झाडलं पुसलं,
खरगंझाडलं पुसलं, यवदं लागलं लागलं दोघीचं,
कोणी तोलेना कोनाले
एक हात मारला, शिरबाई उडविला हाताने
शिर गगनाले गेलं, धड धरतीले पडलं
गिरजा आली घरातूनं, माझं धर्माचं मारलं बाळं
माझं धर्माचं मारलं बाळं
शंकर इरासी बसले
आलं मनात, गेले लयाच्या बनाले
शिरबाई कंजीराचं शेजलं,
धळा केल्या भेटी, शिरा धळा केल्या भेटी शिरा
अथूनझाली गनपतीची उत्पत्ती.'[४]

विधीची प्राचीन परंपरा सांगण्यासाठी ही कथा डहाकाच्या विधीच्या वेळी विधीगीत म्हणून गायल्या जाते. संपूर्ण गणपती उत्पत्तीचे सार या कथागीतातून सांगितले जाते.

डहाका वाजविणे हा विधी प्रामुख्याने लोकदेवतेच्या उपासनेशी संबंधित असल्यामुळे बावन वीरातील अनेक देवतांचे उल्लेख डहाकाच्या गाण्यात येतात. तसेच हा विधी लग्नकार्यादी विधीच्या वेळी कुंभार विधीत **'मुंजा'** या लोकदेवतेला फार महत्व आहे. मुंजाची गाणी डहाकाच्या पूजेच्या वेळी हमखास म्हटली जातात. त्यातून एक वैशिष्ट्यपूर्ण कथा सांगितली जाते.

मृत व्यक्तीच्या नातेवाईकांचे दु:ख सुसहय व्हावे, त्यांना दु:खाचा विसर पडावा असा हेतू हा विधी करण्यामागे आहे. हा विधी केल्यानंतर आत्म्याला स्वर्गलाभ होतो अशी धारणा असलेली दिसते. या विधीगीतांच्या रचना बहुतेक सोप्या आणि सुलभ असतात.

विदर्भात बहुजन समाजात लग्नाच्या आदल्या दिवशी डहाका गाऊन यजमानांच्या पितरांना मंगल सोहळयात आमंत्रित करतात. नवरी – नवरदेवाकडील त्यांचे पालक व नातेवाईक मंडळी या पितस्मरणाला आवर्जून बैठक देतात. मग उत्साहाने डहाकावाले एकसूर एकातालात डहाकाच्या ठेक्यावर कर्णमधूर गाणी गातात. डहाका कथनाचा विधी पहाटेपर्यंत चालतो. कित्येकदा पितस्मरणाच्यावेळी यजमानाकडील रक्तसंबंधाचे लोक गहीवरून येतात.

माझ्या मते डहाका हे असे विधीगीत आहे की, ज्यामुळे मृत व्यक्तीची आठवण काढून रक्तसंबंधाचे लोक आपल्या सुखदु:खाचे विरेचन करतात. लोकदेवतांना असलेले स्थान आणि त्यांच्या विषयीच्या श्रध्दांचे मनोज्ञ दर्शन **'डहाका'** गीतातून घडते.

## डहाका : मांडणी व पद्धत

डहाका हे एक विधीगीत आहे. घराण्याचा कुलाचार म्हणून **'डहाका'** किंवा **'डाक'** हा कुंभार समाजातील मृत व्यक्तीच्या उत्तरक्रियेच्या वेळी केला जाणारा एक विधी आहे.

प्रकाश कुंभार विधीबाबत लिहितात, ‘डाक वाजविण्याचा विधी मृताच्या अकराव्या दिवशी केला जातो. मृत व्यक्तीच्या घरी हे क्रियाकर्म करणारे उपाध्ये / महेतर, कुंभार जातात. डाक, झांज, टाळ ही वाद्ये पाटावर अठरा पानाच्या विडयावर अठरा पैजा म्हणजे तांदळाच्या पिठाची अठरा चित्रे ठेवतात. त्यात गणपती, नारद, कृष्ण, महादेवाची पिंड, शीर, गाय—वासरू, गंजे—सावज, चंद्र, सूर्य, ताग, सुवर्ण पिंपळ, शिडी, मृतपिंड, केंदाळफूल, कावळा, पिशामृत अमृत—कुंभ अशी चित्रे असतात. अशी मांडणी झाल्यावर विधी सुरू होतो.’[५]तिचे स्वरूप साधारणपणे पुढील प्रमाणे असते.

‘प्रथम ज्या ठिकाणी पूजा मांडावयाची आहे ती जागा सारवून किंवा पुसून स्वच्छ करतात. त्यावर रांगोळी काढतात. त्या जागेवर चौरंग ठेवतात. नेहमीच्या पूजेसारखाच या पुजेचा कलश असतो. चौरंगावर घरातल्या मेलेल्या मोठया व्यक्तीचा फोटो ठेवतात. नवीन कापड टाकलेल्या चौरंगावर कलश ठेवला जातो. त्यानंतर ९ बदाम, ९ खारका, ९ छोटी छोटी हळकुंड, १० सुपाऱ्या, विडयाची पाने, टॉवेल आणि खण किंवा कुठे कुठे धोतर किंवा खणही ठेवतात. दोन कणकेचे दिवे लावले जातात व चांदीच्या घडविलेल्या प्रतिमा (या घरातील मृत व्यक्तीच्या नावाने घडविल्या जातात) ठेवून ज्याच्या मुलामुलीचे लग्न आहे तो गृहस्थ किंवा घरातील सर्वात मोठी व्यक्ती पूजेला बसते. पूजा झाल्यावर ‘डहाका’ म्हटल्या जाते. प्रथम गणपती स्तवनाने या कार्यक्रमाला सुरूवात होते नंतर घरातील गेलेल्या व्यक्तींना मोठया सन्मानाने लग्नाचे निमंत्रण दिले जाते.’[६](विदर्भात अनेक ग्रामीण भागात डहाकाचा विधी पार पाडला जातो. त्याची पूजामांडणी नेहमीच्या पूजेसारखी साधी असते. चौरंगावर लाल तुसाचा कापड टाकून त्यावर तांदळाची रास टाकली जाते. त्यावर विडयाची पाने ठेवून नारळाचा कलश मांडलेला असतो. समोर दोन विडयाच्या पानावर खारीक, सुपारी व बदाम ठेवल्या जाते. कळसाच्या समोर नंदादीप लावून डहाकाच्या गाण्याची सुरूवात केली जाते. अशाप्रकारे ही डहाका मांडणी साधी व सोप्या पध्दतीने मांडली जाते.)

नंतर सवाष्ण स्त्रियांना डहाका गीतात आवतन (आमंत्रण) दिल्या जाते.

“आवो गुनवंताची लेक
बाई हे नांदायासी आली ।
लवकर लेकुरवाळी झाली
सासु सासरा म्हणे
सुन भाग्याची मिळाली ।
इंदिरा साध्या सोभावाची
व्हती माय भरल्या कुटूंबाची
व्हती माय गनागोताची
वैराळ घरायासी आला
पुकारा चुडेयाचा केला ।
कृष्णानं दुकान मांडलं
मांडलं चौरस्त्यासमोर
बांगडया घ्या, घ्या ना पुकारे
अरे वस्तीमधी हाका मारे ।
इंदीराबाई होती कामामंधी
कासार आला तो घरासी
पुकारा केला चुडियाचा
नाही माय गुलाबी रंगाचा,
नाही माय कथ्थ्या रंगाचा,
हाये माय हिरव्या रंगाचा ।”[७]

सवाष्ण गेलेल्या स्त्रियांना मोठया मानाने आवतन (आमंत्रण) दिले जाते. अशा प्रकारे घरातील मृतांची आठवण या निमित्ताने केली जाते.

लग्नाच्या आदल्या रात्री देवाची पूजा करून पाटावर किंवा चौरंगावर घरातील मेलेल्या माणसाचे 'टाक' म्हणजेच आकृती असलेल्या चांदीच्या प्रतिमांची पूजा करण्यात येऊन त्यांची नावे व गौरव डहाकाच्या गाण्यातून केला जातो अगदी सोपी व सरळ अशी मांडणी डहाकाच्या पूजेची असते.

लग्नकार्य सुरळीत, निर्विघ्न पार पडावे म्हणून 'डहाका' पाडण्यात येतात. अशा या डहाकाची मांडणी करून डहाका किंवा डायका हे वऱ्हाडचे लोकनाट्य विशेष कलगी तुऱ्याप्रमाणे प्रश्नोत्तर स्वरूपात डमरूसारख्या काहीशामोठया आकाराच्या वाद्यावर ठेक्यात आणि विशिष्ट लयीत पद्यातून प्रश्नोत्तरे दिली जातात. बहुजन समाजात लग्नाच्या आदल्या दिवशी म्हणजे सीमांत पूजनाच्या वेळी म्हणजेच देवीदेवतांना प्रसन्न करण्यासाठी डहाकावाल्यांना आमंत्रण देऊन बोलावण्यात येते.

डहाका गाणारे यजमानाच्या पितरांना मंगल सोहळयात आमंत्रित करतात. डहाका गीताला सुरूवात करण्याअगोदर देवदेवतांना, प्रथम गणपतीला, शंकराला नमन केले जाते व पूजा मांडल्यानंतर पितरस्मरणाला सुरूवात करतात. पालक, नातेवाईक या डहाकाच्या विधीच्या वेळी आवर्जून बैठक देतात.

डहाका हे 'तालवाद्य' प्रकारचे नाव असले तरी विधीच्या वेळी गायल्या जाणाऱ्या गीतालाच 'डहाका' हे नाव पडलेले दिसून येते. 'डहाका' गाण्याची परंपरा आजही सर्वत्र दिसून येते.

'डहाका' हे विधीगीत धार्मिक व आध्यात्मिक स्वरूपाचे असल्याने त्याची मांडणी व पध्दतीचा प्रकार अगदी सोपा असल्याचे दिसून येतो. ग्रामीण भागातही 'डहाका' या विधीगीताची परंपरा जोपासली जात आहे. या मांडणी व पध्दतीमुळे डहाकाची परंपरा सोप्या व सरळ रूपाने नजरेस येते.

डहाका लोकगीते सुध्दा परंपरेने चालत आलेली आहेत. ती जुनीच असून एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मौखिक वा आता लिखित स्वरूपात हस्तांतरित झाली आहेत.

महाराष्ट्रात असणाऱ्या विविध डहाकांपेक्षा वैदर्भीय डहाक्याचे स्वरूप वेगळे आहे. या गायनवाद्य कला प्रकाराचे पश्चिम महाराष्ट्रातील गोंधळ प्रकाराशी साम्य आहे. डहाकामध्ये रूंद डमरूच्या आकाराचे दोन्ही बाजुंनी चामडयाचे मढवलेले व दोरीने ताणलेले वाद्य असते. ते उभे करून बहुतेक पायात धरून वाजविले जाते. विदर्भात बहुजन समाजात लग्नाच्या आदल्या दिवशी (सीमांत पूजन) म्हणजे देवदेवीला, डहाका वाद्यांना आमंत्रण देऊन बोलविण्यात येते. डहाका गाऊन यजमानांच्या पितरांना मंगल सोहळयात आमंत्रित केल्या जाते. त्यांची घराणी नाहीत. परंपरेने आलेल्या व मागे सोडलेल्यांनाच गुरू म्हणून पूजल्या जाते. काळाच्या ओघात या कलाप्रकारात अनेक बदल झालेले आढळून येतात. ते प्रबोधनाच्या दृष्टीने महत्त्वाचे समजल्या जाते. आजच्या घडीला नामांकित कलावंत आढळून येत नाहीत. जे पट्टीचे कलावंत तेच नामांकित असा काहीसा हा प्रकार होय.

ना.रा. शेंडे म्हणतात, कलगीतुऱ्याप्रमाणे प्रश्नोत्तराच्या स्वरूपात 'डहाका' हा एक प्रकार आहे. लोकसंस्कृती वा लोककला, लोकगीतांच्या बहुतांश संदर्भ ग्रंथामध्ये 'डहाका' चा उल्लेख आल्याचे आढळून येते.

## संदर्भ :—

१) डॉ. व्यवहारे शरद : मराठी लोकगीत, पृ. १८
२) डॉ. शिंदे विश्वनाथ : लोकसाहित्य मीमांसा (भाग पहिला), पृ.७९
३) डॉ.प्रभाकर मांडे : लोकसाहित्याचे अंत:प्रवाह, पृ.२३
४) डॉ. इंगोले प्रतिमा : वऱ्हाडी लोकगाथा, पृ.२३
५) डॉ. कुंभार प्रकाश : लोकगीत परंपरेतील डाहाका कुंभाराच्या
६) डॉ.लांजेवार लता : वऱ्हाडी बोलीतील लोकसाहित्य — स्वरूप आणि समीक्षा, पृ. १३८
७) तत्रैव : पृ.क्र. १३८

❖❖❖

# भारतीय आदिवासींची वैशिष्ट्ये व अर्थउत्पादनानुसार वर्गीकरण : एक ऐतिहासिक अध्ययन

प्रा. एन.आर. ठवळे
इतिहास विभाग प्रमुख
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ
भ्रमणध्वनी ९४२०६८३११६

भारतीय समाजव्यवस्थेत आदिवासीचे सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय योगदान अत्यंत महत्वाचे आहे. आदिवासींना वनवासी, वन्यजाती, गिरीजन, आदिम इत्यादी नावाने ओळखले जाते. भारतीय संविधानात त्यांना अनुसूचीत जमाती (Scheduled Tribe) या नावाने संबोधले जाते. भारताच्या सर्वच राज्यात आदिवासींची संख्या कमीअधिक प्रमाणात आहे. क्रमावरीने पाहिले तर मध्यप्रदेशात आदिवासींची संख्या सर्वात जास्त, ओडीशाचा दुसरा क्रमांक तर बिहार तिसऱ्या स्थानावर आहे. देशात आदिवासींच्या विविध जाती असून, त्यात गोंड, खरवार, अगेरिया भुइयॉ, चेरो, घसिया, कोरवा, ओरांव व पनिका, सहारिया, पठारी, परहिया, भिल्ल, कोरकु, कोलाम, उरांव, माडिया, हलबा, डोरला, बिरव्होर, भतरा, मुरिया, कंवर, बैगा, अबुझमाडियॉ, मुंडा, संथाल, खोंड, बिन्झीया, असूर, सवार, गौरत, कोरा, करमाली, किसान, हो, भूमिज, लोहरा इत्यादी.

वरील सर्व आदिवासी भारताच्या विविध प्रांतात राहत असले तरी त्यांच्यात अनेक बाबतीत बरेच साम्य दिसते. यामुळे असे वाटते की या सर्व जमाती प्राचीन काळात जवळ–जवळ वा लगत–लगतच्या प्रदेशात राहात असाव्या. कालांतराने आर्यांनी त्यांचा पराभव केल्यामुळे त्या जमातींनी डोंगरदऱ्यांचा आश्रय घेतला असावा, असे प्रथमदर्शनी वाटते. आदिवासी समाजासंबंधी देश–विदेशात भरपूर संशोधन झाले आहे. त्यावरून या जमातींची ढोबळ मानाने ठळक वैशिष्टे सांगता येतात ती पुढीलप्रमाणे :–

१. एक विशिष्ट जमात एका विशिष्ट प्रदेशात मोठ्या संख्येने राहते. पण तुरळक प्रमाणात त्यांची संख्या देशभर पाहावयास मिळते. मात्र हा समाज प्रगत समाजापासून दूर, डोंगरात, कपारीत किंवा जंगलात अशा दुर्गम भागात राहतो. त्यामुळे प्रगत समाजाशी त्यांच्या संबंध फारच कमी येतो.

२. प्रत्येक आदिवासी जमातीची स्वतंत्र पंचायत असते, पंचायतीव्दारे समाजाचे नियंत्रण केले जाते. पंचायतीत एक मुखिया असतो त्याचे समाजात महत्वाचे स्थान असते.

३. आदिवासी लोक जीववादावर विश्वास ठेवतात. त्यांच्या मते सर्व वस्तुंना जीव असतो व आत्म्याच्या रूपात हे जीव वावरत असतात. दिवंगत पूर्वजसुध्दा समाजात आत्म्याच्या रूपाने वावरत असतात, अशी त्यांची धारणा आहे. काही आत्मे समाजाला हितकारक असतात तर काही आत्मे समाजाला घातक असतात, त्यांना दुरात्मे म्हणतात.

४. आदिवासी लोक निसर्गावर आधारित जीवन जगतात. त्यामुळे निसर्गवादावर त्यांचा विश्वास आहे. निसर्गातील चंद्र, सुर्य, तारे, पृथ्वी हे सारे त्यांचे देव आहे, असे ते समजतात व विशिष्ट काळात त्यांची ते पूजा करतात. बहुतांश आदिवासींचा उदरनिर्वाह जंगलावरच आधारलेला असतो. त्यामुळे ते निसर्गपूजक आहेत.

५. प्रत्येक आदिवासी जमातीची बोली ही स्वतंत्र असते. बोली लेखी स्वरूपात फारशी आढळत नाही.

६. आदिवासी जमातींनी आपले गोत्र म्हणून झाडे, झुडपे, पशू, पक्षी इतर निर्जीव वस्तू यांना मानले आहे. आणि त्यांच्या सोबत आपले संबंध प्रस्थापित करून त्यांना पूज्य मानले आहे. व विशिष्ट सणावाराला ते आपल्या गोत्राची पूजा करतात.

७. आदिवासी लोकांमध्ये अंधविश्वासही भरपूर प्रमाणात आहे. तसेच जादूटोण्यावर त्यांचा फार विश्वास आहे. प्राचीन काळी धार्मिक अवडंबर मोठ्या प्रमाणात वाढले होते. धार्मिक समारंभाला फार मोठा खर्च येत होता. आदिवासी तो खर्च करू शकत नसल्यामुळे त्यांच्या जीवनात एक पोकळी निर्माण झाली होती. ती पोकळी भरून काढण्याचे काम जादूटोणा व इतर कर्मकांडानी केले असावे.

८. आदिवासी जमातीत परंपरा व सामाजिक नियंत्रण यावर भर असतो परिणामत: सर्व लोकांच्या वागण्या, बोलण्यात समानता आलेली दिसते. त्यामुळे त्यांचे जीवन चाकोरीबध्द झालेले दिसते. नवीन योजना किंवा कल्पना ते लवकर स्वीकारत नाही.

९. आदिवासी लोक सर्व प्रकारची कामे करतात. त्यांच्यात श्रमविभाजन दिसत नाही तसेच ते सर्व प्राथमिक व परंपरागत वस्तु व अवजारांचा वापर करतात. याशिवाय त्याचे बहुतांश व्यवहार वस्तु विनिमयानेच चालतात. हळूहळू त्यांच्यात आधुनिकतेचा प्रभाव पडत आहे, मात्र हा प्रभाव पाहिजे त्या प्रमाणात दिसत नाही.

१०. आदिवासी जमातीत पूर्वज पूजा एक महत्वाचे वैशिष्ट आहे. बहुतांश आदिवासी असे मानतात की त्यांचे पूर्वज त्यांच्या सोबत क्रियाशिल असतात.

११. आदिवासी जमात बहुदेववादी आहेत. देवता गाव, शेती, पशू, पक्षी इत्यादीचे संरक्षण करतात म्हणून एका विशिष्ट दिवशी सर्व देवातांची पूजा केली जाते. ही पूजा 'पाहन'मार्फत केली जाते. 'पाहन' म्हणजे आदिवासींचा पूजारी. पाहनला काही जमातीत वेगवेगळी नावे आहेत.

१२. आदिवासी जामती या स्वयंकेंद्रीत असतात. त्याचे सामाजिक, धार्मिक व आर्थिक जीवन शतकानुशतके शहरीकरणापासून अलिप्त राहिल्यामुळे कदाचित ते स्वयंकेंद्रीत झाले असावे. परिणामतः ते आधुनिकीकरणापासून दूर राहिले.

अर्थ उत्पादनाच्या कार्यानुसार आदिवासी जमातीचे एकूण वर्गात विभाजन करण्यात आले आहे, ते पुढीलप्रमाणेः—

१. जंगलावर आधारित जमाती त्यात बिरहोर, पहाडी, परहिया, कोरवा, बिरजिया, गोंड, परधान, माडिया, कोरकु आणि कोलाम इत्यादींच्या समावेश करता येईल. हे लोक जंगलात पशुंची शिकार करून पोट भरतात. त्याशिवाय जंगलात प्राप्त होणारी फळे, डिंक, मध, कंदमुळे गोळा करून त्याचा ते व्यवसाय करतात. तसेच जंगलातील सुकलेली लाकडे गोळा करून जवळपासच्या शहरात नेऊन विकातात व त्यावर गुजराण करतात.

२. काही आदिवासी जमाती स्थलांतरित शेती कारून आपली उपजीविका करतात प्रामुख्याने असूर, पलाम व बिरजीयॉ यांची शेती पहाडी किंवा डोंगरी प्रदेशावरच आढळते. डोंगरावरील भाग साफ करून पालापाचोळा जाळून त्यावर हे शेती करतात. शेतीसाठी ते परंपरागत औजारे वापरतात जसे कुदळ, फावडे, खुरपे, कुऱ्हाड इत्यादी.

३. काही प्रांतात प्रामुख्याने बिहारमध्ये समतल प्रदेशावरसुध्दा आदिवासी जमाती शेती करतात. त्यात संथाल, मुंडा, उंराव इत्यादी जमातींचा उल्लेख करावा लागेल. इतर आदिवासी जमातीच्या तुलनेत येथील आदिवासी सधन आहेत. त्यांच्याजवळ शेतीची अवजारे व बैलसुध्दा आहेत. बिहारमधील जमीन सुपीक व उपजावू असल्यामुळे एक किंवा दोन पीक सुध्दा या जमाती काढतात.

४. काही आदिवासी लहानसहान कारागिरीचे व्यवसाय करून आपली उपजिवीका करतात. त्यात कताई, बुनाई, लाकडी व लोखंडी वस्तु तयार करणे. यात लोहरा, करमाळी, चीक, बडाईक, महली, असूर इत्यादी जनजातीचा समावेश आहे. या जमाती गावोगाव फिरून तयार केलेल्या कारागिरीच्या वस्तू विकतात व आपली उपजिवीका करतात.

५. आदिवासींच्या काही जमाती श्रमाची कामे करून आपली उपजिवीका करतात, त्या प्रामुख्याने शेतमजुरीचा समावेश आहे. आता काही आदिवासी जामती कारखान्यात मजुरीची कामे करतात. तर काही चहाच्या मळ्याळत मजुरीची कामे करतात. तसेच कोळसाखानीतही काही आदिवासी जमातीचे लोक बिहारमध्ये शहरात जावून बांधकाम व्यवसायात श्रमाची कामे करतात.

६. आदिवासींसाठी भारत सरकारने नोकरी व शिक्षणात आरक्षण ठेवले असल्यामुळे त्याचा फायदा काही आदिवासी घेतात. मात्र बहुतांश आदिवासींना आरक्षणाचा फायदा घेता आला नाही. ज्यांनी लाभ घेतला ते दवाखने, शाळा, महाविद्यालये, सरकारी कार्यालय इत्यादी ठिकाणी कुशल कारागीर म्हणून काम करताना दिसतात.

## संदर्भ ग्रंथ :—


| | |
|---|---|
| कोलाम | — डॉ. भाऊ मांडवकर |
| उत्तरप्रदेश की जनजातियां | — प्रो. श्रीवास्तव |
| बिहार की जनजातियां | — एल.पी. विद्यार्थी, के.के. वर्मा, प्रो. श्रीवास्तव |
| मध्यप्रदेश की आदिम जनजातियां | — अनिल सिन्हा |
| आदिम | — डॉ. भाऊ माडंकर |


❖❖❖

# आधार अर्थात यूआयडी

प्रा. विजय मुरलीधरराव गावंडे
सविताबाई देशमुख महाविद्यालय, दिग्रस, जि. यवतमाळ
भ्रमणध्वनी ८४२१८९५०५८

भारतातील प्रत्येक नागरीकाला विशिष्ट ओळख देणाचा महत्वाकांक्षी प्रकल्प भारत सरकारने हाती घेतला असुन त्यासाठी केंद्र सरकारने फेब्रुवारी २००९ मध्ये भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाची (Unique Identification Autority of India) स्थापना केली आहे. इन्फोसिसचे माजी सहअध्यक्ष नंदन नीलेकणी हे या प्राधिकरणाचे अध्यक्ष आहेत. या प्राधिकरणाचे मुख्य कार्यालय दिल्ली येथे असून क्षेत्रीय कार्यालय दिल्ली, बंगलोर, हैद्राबाद, चंदिगढ, गुवाहाटी, लखनौ, मुंबई व रांची येथे आहे. भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण योजना आयोगाचा एक भाग असून पंतप्रधानाच्या कार्यालयाच्या देखरेखीखाली या प्राधिकरणाचे काम चालते.

'आधार' म्हणजे काय ?

विशिष्ट नागरीकांक ओळखत पत्रात १२ अंकी असणारा विशिष्ट राष्ट्रीय नागरिकांक म्हणजे 'आधार होय.' देशातील पत्येक नागरीकाला बारा अंकी क्रमांक असलेली ओळखपत्रे देण्याची सरकारची योजना आहे. या ओळखपत्रात व्यक्तीचे नाव, जन्म, ठिकाण, आई व वडिलांचे नाव, लिंग, पत्ता आदि माहिती असेल. या 'आधार – राष्ट्रीय नागरिकांक प्रक्रीयेला जोड आहे ती बायोमेट्रीक पध्दतीची. म्हणजे प्रत्येक नागरिकांचे छायाचित्र, बोटाचे ठेसे व बुब्बुळाचा स्कंन ' घेऊन नागरिकांना प्राधिकरणाकडून 'आधार' मिळेल. या आधारावर देशभरात कुठेही स्वतंत्र ओळख पटवता येईल.

'आधार' या विशिष्ट नागरिकांक ओळखपत्राचा शुभारंभ २९ सष्टेंबर २०१० रोजी नंदुरबार जिल्हयातील टेंभली येथे पंतप्रधान मनमोहन सिंह व कॉग्रेस पक्षाच्या अध्यक्षा सोनिया गांधी यांच्या हस्ते रंजना सोनवणे यांना ओळखपत्र देऊन झाला. तत्पुर्वी १९९९ साली राष्ट्रीय लोकशाही आघाडी (NDA) सरकारने 'बहुपयोगी' राष्ट्रीय ओळखपत्र (Multipurpose National Identity Card) प्रत्येक नागरिकाला देण्याचा विचार केला होता. कारगिल युध्दानंतर तत्कालीन केंद्र सरकारने 'राष्ट्रीय सुरक्षे' च्या मुद्यावर देशातील प्रत्येक नागरिकांसाठी बहुपयोगी ओळखपत्राची संकल्पना मांडली होती.

विशिष्ट नागरिकांक ओळखपत्र किंवा 'आधार' हा प्रकल्प 'सुशासन' व 'राष्ट्रीय सुरक्षा' या दोन परिणामावर आधारित आहे.

## लोगो (Logo)

आधार कार्डासाठी स्वीकारण्यात आलेला लोगो (Logo) पुण्यातील अतुल सुधाकरराव पांडे यांनी निर्माण केलेला आहे. लाल आणि पिवळया रंगातील सुर्य असून त्यांच्या केंद्रस्थानी बोटाचे ठसे उमटविलेले आहेत. या लागोद्वारे आधारची व्हिजन स्पष्ट होते. हा लागो सुचित करतो की, प्रत्येक व्यक्तीसाठी समान संधीची एक नवी पहाट उदयास येत आहे.

## विशिष्ट नागरिकांक ओळखपत्राचे उद्‌देश

१) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील दोष व अंमलबजावणीतील त्रुटी दूर करणे.
२) देशात जे लोक बेकायदेशीरपणे वास्तव्य करत आहेत त्याचा शोध घेणे व त्यांच्यावर प्रतिबंध करणे.
३) स्थावर मालमत्ता खरेदी – विक्रीमधून होणारे गैरप्रकार, गुन्हेगारी , काळा पैसा यांना आळा घालणे.
४) शासकीय योजनांचा गैरप्रकारे लाभ घेणाऱ्यांवर नियंत्रण ठेवणे.
५) करचुकवेगिरीला आळा घालणे.
६) गरजू व गरिब व्यक्तींना शासनाच्या योजनांचा लाभ घेणे सुलभ करणे.

## नागरीकांना मिळणारे फायदे

१) नागरिकांना बॅकेत खाते उघडण्यासाठी Know your Customer (KYC) प्रक्रीयेतून जावे लागणार नाही.

२) नागरिकांना आपली सुरक्षाविषयक ओळख सिध्द करण्यासाठी या ओळखपत्राचा वापर करता येईल.

३) विशिष्ट ओळखपत्रातील नागरिकांक व्यक्तीच्या बॅक खात्याशी जोडला जाईल. नजीकच्या भविष्यात जेव्हा मोबाईल , बॅकींग, मोबाईल मनी यांचा व्यापक प्रमाणात वापर करण्यास सुरूवात होईल, तेव्हा नागरिकांना या सुविधांचा वापर अधिक सुलभपणे व सुरक्षितपणे करता येईल.

४) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेतील किंवा इतर शासकीय योजनेतील लाभार्थींना मिळणारा मोबदला परस्पर बॅक खात्यात जमा होईल यामुळे शासकीय योजनांतील गैरप्रकारांना आळा बसेल.

५) शासकीय योजना, कामकाजासाठी लागणाऱ्या पुरक कागदपत्रांची आवश्यकता विशिष्ट नागरिकांक ओळखपत्रामुळे भासणार आहे.

आधारकार्ड नोंदणीबाबत काही तथ्ये

१) ‘आधार’ ओळखपत्रांची योजना राबविण्याची जबाबदारी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणावर (UIDAI) आहे.

२) UIDAI`अध्यक्षाचे पद ‘कॅबिनेट दर्जाचे’ आहे.

३) ‘आधार’ योजनेची सुरूवात २९ सप्टेंबर २०१० रोजी पंतप्रधान मनमोहन सिंह यांच्या हस्ते टेंबली गावामध्ये (ता. शहादा जि. नंदुरबार महाराष्ट्र) करण्यात आली. टेंबली या आदिवासी गावातील रंजना सोनावणे यांना पहिले आधार कार्ड देण्यात आले.

४) ‘आधार’ ही जगातील सर्वात मोठी ‘बायोमेट्रीक’ आधारित ओळख माहितीप्रणाली आहे.

५) सर्व घटक राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये ३१ डिसेंबर २०११ पर्यंत ३६ हजार केंद्रे कार्यरत होती.

६) फेब्रुवारी २०१२ मध्ये पहिल्या टप्प्यासाठी निर्धारीत केलेले २० कोर्ट कार्ड नोंदणीचे लक्ष्य मुदतीत पुर्ण झाले.

७) २१ कोटी क्रमांकाचे आधारकार्ड पंतप्रधान मनमोहन सिंह यांच्या हस्ते २० ऑक्टोबर २०१२ रोजी कुरवार येथील रहिवासी श्रीमती वली (जि.उदयपूर, राजस्थान) यांना प्रदान करण्यात आले.

८) UIDAI ने प्रत्येक दिवशी १० लाख लोकांची नोंदणी करण्याचे लक्ष्य साध्य केले.

९) देशभरातील २०९ नोंदणी अभिकरणांद्वारे (Agency) नोंदणीचे कार्य सुरू.

१०) माहितीच्या गुणवत्ता प्रदान नोंदणीवर भर दिला जात असून नोंदणी करणाऱ्या अभिकरणांनी माहिती नोंदणीमध्ये केलेल्या प्रत्येक चुकीकरिता रू. १५० तर माहितीच्या प्रक्रीयेबाबत केलेल्या चुकीकरीता रू. ५०० दंड आकाराला जातो.

११) ४ फेब्रुवारी २०१३ पर्यंत संपूर्ण देशभरातून २७.५ कोटी (२७५ दशलक्ष) लोकांची आधार कार्ड नोंदणी पूर्ण झालेली आहे. ही आकडेवारी एकुण लोकसंख्येच्या २२.६९ टक्के इतकी आहे.

‘आधार ओळखपत्राचा’ अंमलबजावणीतील अडथळे –

१) पुरेशा नोंदणी केंद्राची उपलब्धता नसणे.
२) चुकीची माहिती नोंदविली जाणे.
३) आधारकार्ड प्राप्त होण्यास विलंब लागणे
४) कार्डामध्ये दुरूस्ती करण्यासाठी कोणतीही सक्षम यंत्रणा नसणे.
५) कार्ड नोंदणीमध्ये अत्याधुनिक तंत्र–सामुग्री आणि प्रशिक्षित मनुष्यबळाचा अभाव.

तथापि, उपरोक्त सर्वसाधारण अडथळे दुर करण्यासाठी UIDAI आणि NPR(National Population Registry) आवश्यक उपाय योजीत आहेत.

❖❖❖

# "महाराष्ट्रातील आदिवासी जमातीतील तडवी, भिल्ल जमातीच्या स्थलांतरीत कामगारांची स्थिती" कालखंड २०१६. १७


प्रा. श्रावण बाबुलाल तडवी
एस.एस.एम.एम.महाविद्यालय
पाचोरा ता. पाचोरा जि. जळगांव

प्राचार्या डॉ. मंगला पी. जंगले
मंगलप्रभा,८/१३ नवप्रभातकॉलनी
जळगांव, जि. जळगांव


## •प्रस्तावना :–

आदिवासी म्हणजे एखाद्या विशिष्ट प्रदेशातील मूळ रहिवासी होय, १९६२ मध्ये भरलेल्या शिलॉग अधिवेशनात आदिवासींची व्याख्या अशी करण्यात आलेली आहे. "एका समान भाषेचा वापर करणाऱ्या एकाच पुर्वजांपासून उत्पत्ती सांगणाऱ्या, एका विशिष्ट भू –प्रदेशात वास्तव्य करणाऱ्या तंत्रशास्त्रीयदृष्टया कला मागासलेल्या अक्षरओळख नसलेल्या व रक्तसंबंधावर आधारित रितीरिवाजांचे प्रामाणिकपणे पालन करणाऱ्या गटाला 'आदिवासी समाज' असे म्हणतात."[१] मदन व मुजुमदार यांच्या मतानुसार "समान भाषा व समान संस्कृती असणाऱ्या व आर्थिक दृष्टीने परस्पर संबंधित असणाऱ्या ग्रामिण समुदायाचा उल्लेख 'आदिवासी समाज' म्हणून नेहमी केला जातो."[२] डॉ. रिव्हर्स यांच्या मतानुसार "ज्या समुदायातील सदस्य एकसमान बोली भाषा बोलतात, युदध वगैरेसारख्या उद्दिष्टपूर्ती करिता एक होवून झटतात. अशा साध्या सरळ सामाजिक समुहाला 'आदिवासी समाज' असे म्हणतात." [३]

महाराष्ट्रातील तडवी–भिल्ल ही आदिवासी जमात ४८ आदिवासी जमातीपैकी ८ व्या क्रमांकाची जमात असून भिल्लांच्या मुख्य शाखेपासून 'तड' म्हणजे दूर झालेल्या लोकांना 'तडवी' असे म्हणतात. तडवी– भिल्ल जमातीच्या बाबतीत जे तडीपार झाले ते तडवी अशी आख्यायिका सांगितली. जाते. महाराष्ट्रातील आदिवासी जमातीतील तडवी भिल्ल हि जमात जळगांव जिल्हयातील यावल, रावेर, चोपडा, जामनेर व पाचोरा तालुक्यातील विविध खेडयांवर राहते. औरंगाबाद जिल्हयातील सोयगांव व सिल्लोड तालुक्यातील विविध खेडयांवर राहते. जालना जिल्हयातील भोकरदन तालुक्यातील विविध खेडयांवर राहते या जमातीतील काही लोक आपला चरितार्थ चालविण्यासाठी शेती हंगामावर अवलंबून आहेत. शेती हंगाम अटोपल्यानंतर ऊसतोड कामगार म्हणूनही काही लोक बाहेरगावी जातात. काही लोक वीटभट्टीचे काम करतात तर काही लोक हमाल म्हणूनही कामे करतात काही लोक जिनिंग व प्रेसिंगच्या कामालाही जातात. सदर शोधनिबंधात महाराष्ट्रातील आदिवासी जमातीतील जळगांव, औरंगाबाद, जालना व बुलढाणा जिल्हयातील विविध तालुके खेडयांवरील २७० स्थलांतरीत कुटूंबाविषयी २०१६ ते २०१७ या एक वर्षाच्या कालखंडातील स्थितीविषयी सर्वेक्षण करुन निष्कर्ष काढलेले आहेत.

## •संशोधन विषयाची निवड :–

संशोधक हा आदिवासी भागातील रहिवासी असून आदिवासी जमातीच्या तडवी–भिल्ल जमातीतील स्थलांतरीत कामगारांची आर्थिक स्थिती जवळून पाहिलेली आहे आदिवासी जमातीच्या तडवी–भिल्ल जमातीच्या स्थलांतरीत कामगारांना स्थलांतरास कोणते घटक जबाबदार आहेत याबाबत मनात उत्सुकता निर्माण झाली व यातून प्रस्तुत विषयाची संशोधनासाठी निवड करण्यात आली.

## •संशोधन विषयाची उद्दिष्टे :–

१) महाराष्ट्रातील तडवी–भिल्ल जमातीच्या स्थलांतरीत कामगारांच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन करणे
२) महाराष्ट्रातील तडवी–भिल्ल जमातीच्या स्थलांतरीत कामगारांच्या कौटूंबिक स्थितीचे अध्ययन करणे.
३) महाराष्ट्रातील तडवी–भिल्ल जमातीच्या स्थलांतरीत कामगारांच्या सामाजिक स्थितीचे अध्ययन करणे.
४) महाराष्ट्रातील तडवी–भिल्ल जमातीच्या स्थलांतरीत कामगारांच्या शैक्षणिक स्थितीचे अध्ययन करणे.

## •संशोधन पध्दती :—

सदर संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आलेला असून प्रस्तुत अध्ययन प्राथमिक व दुय्यम माहितीवर व नमुना निवड पध्दतीवर आधारित आहे. प्राथमिक स्वरुपाची माहिती प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सर्वेक्षण करुन गोळा करण्यात आलेली आहे. यासाठी प्रश्नावलीचा वापर करण्यात आलेला आहे. दुय्यम स्वरुपाची माहिती आदिवासी विकास विभागाची वेबसाईट या माध्यमातून मिळविली आहे. नमुना निवड पदधतीचा स्वीकार करून जळगांव औरंगाबाद बुलढाणा व जालना या जिल्हयांतील पाचोरा, जामनेर, यावल, चोपडा, रावेर, सोयगांव, सिल्लोड, बुलढाणा, भोकरदन या ०९ तालुक्यातील विविध खेडयांवरील २७० नमुना निवडून संशोधन करण्यात आलेले आहे.

## •संशोधनाची गृहितके :—

१) महाराष्ट्रातील तडवी—भिल्ल जमातीच्या स्थलांतरीत कामगारांची आर्थिक स्थिती हलाखीची आहे.
२) महाराष्ट्रातील तडवी—भिल्ल जमातीच्या स्थलांतरीत कामगारांची कौटुंबिक स्थिती संयुक्त पदधतीची आहे
३) महाराष्ट्रातील तडवी—भिल्ल जमातीच्या स्थलांतरीत कामगारांमध्ये निरक्षरतेचे प्रमाण जास्त आहे.

## •पूर्व संशोधनाचा आढावा :—

भारतीय आदिवासी जमाती विषयी अनेक लेखक, अभ्यासक व संशोधकांनी सखोल संशोधन व लेखन कार्य केलेले आहे. यात डॉ. गोरे गोविंद यांनी “भारतीय आदिवासी समाज व संस्कृती,” डॉ. गारे गोविंद यांनी “महाराष्ट्रातील आदिवासी जमाती” नाडगोडे गुरूनाथ यांनी “भारतीय आदिवासी” डॉ. कुळकर्णी शौनक यांनी, महाराष्ट्रातील आदिवासी तेगमपुरे मारोती यांनी “किनवट तालुक्यातील उपयोजना” कोकाटे चंद्रकांत व सोळुंखे रामकृष्ण यांनी “हिंगोली जिल्हयातील आदिवासी समाजाचे दारिद्रयाचे विश्लेषण” श्री उगले सुनिल पं. आणि डी आर बच्छाव यांनी “नाशिक जिल्हयातील आदिवासी विभागात बाएफ मित्र या संस्थेचे योगदान” श्री इंगळे जयवंत शंकरराव यांनी “महाराष्ट्र राज्यातील ठाणे जिल्हयातील मोखाडा तालुक्यातील आदिवासी शेती विषयक अभ्यास” बच्छाव डी.आर. यांच्या “पेठ तालुक्यातील आदिवासी विकास योजनांचा अभ्यास” जगताप दिलीप रा. यांनी “स्थलांतरीत आदिवासींचे अध्ययन” गिते तानाजी गेनभाउ यांनी “पुणे जिल्हयातील आदिवासी महिला बाल कुपोषण” जगताप दिलीप रामभाउ यांनी “आदिवासी जागल्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन” असे व या सारखे विविध शोध निबंध आदिवासी जमातीवर सादर केले, परंतु महाराष्ट्रातील आदिवासी जमातीतील तडवी —भिल्ल जमातीच्या स्थलांतरीत कामगारांवर कोणीही संशोधन केलेले नसल्याने सदरचा विषय संशोधनासाठी निवडण्यात आला. व वरील संशोधकांच्या लेखन व संशोधन विषयक सामग्रीचा वापर झाला.

## •संशोधनाची उपयुक्तता :—

प्रस्तुत अभ्यासात महाराष्ट्रातील तडवी भिल्ल जमातीची प्रत्यक्ष पहाणी करून या जमातीतील स्थलांतरीत कामगारांच्या स्थितीचे अध्ययन करून त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी उपाययोजना सुचविण्यात येतील त्यामुळे हा अभ्यास तडवी— भिल्ल जमातीसह इतर जमातीच्या स्थलांतरीत कामगारांच्या विकासासाठी नियोजनकर्ते व सामाजिक कार्यकर्ते यांच्या दृष्टीने तसेच शासन, अभ्यासक यांना उपयुक्त ठरेल.

## •स्थलांतराची कारणे :—

महाराष्ट्रातील आदिवासी जमातीतील तडवी भिल्ल जमातीच्या लोकांना पुढील कारणांमुळे स्थलांतर करावे लागते

१) सभोवतालच्या परिसरात कामाची उपलब्धता न होणे
२) शेतीचा हंगाम पर्याप्त व समाधानकारक न होणे
३) पावसाची अनिश्चीतता व अनियमितपणा
४) शेत जमिनीची नापिकी

५) गावात पुरेशा प्रमाणावर रोजगार संधी उपलब्ध न होणे व रोजंदारी कमी मिळणे
६) कुटुंबातील वाढतीसंख्या व त्यांच्या पालन पोषणासाठी लागणाऱ्या खर्चाची पुर्तता करण्यासाठी
७) विविध प्रकारच्या सामाजिक रुढी—परंपरा व त्यांच्या पुर्ततेसाठी करावा लागणारा खर्च भागविण्यासाठी
८) मुला—मुलींच्या लग्नाचा खर्च भागविण्यासाठी
९) विविध प्रकारचे नवस फेडण्यासाठी लागणारा खर्च भागविण्यासाठी
१०) वाढणाऱ्या दारिद्रयामुळे कुटुंबाचा खर्च पेलण्यासाठी

सभोवतालच्या परिसरात तडवी भिल्ल जमातीतील लोकांना कामाची उपलब्धता होत नसल्याने त्यांना रोजगार मिळविण्यासाठी विविध ठिकाणी व विविध कामांसाठी स्थलांतर करावे लागत होते. हे तक्ता क्र. १ मध्ये दर्शविलेले आहे.

रोजगारासाठी स्थलांतर करणाऱ्यांचे कोणत्या कामांसाठी स्थलांतर करावे लागत होते या बाबत वर्गीकरण (कालखंड २०१६ ते २०१७)

| अ. क्र. | कामाचे स्वरुप | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | उसतोड कामासाठी | ७० | २५.९३ टक्के |
| २ | विटभट्टीचे काम करण्यासाठी | ३६ | १३.३३ टक्के |
| ३ | जिनींग व प्रेसिंगच्या कामासाठी | १० | ३.७० टक्के |
| ४ | शेतीचे काम बेहडे, मध जमा करण्यासाठी | १५४ | ५७.०४ टक्के |
| | एकुण | २७० | १०० टक्के |

२०१६ ते २०१७ या कालखंडात सर्वेक्षण केलेल्या उत्तरदात्यांपैकी रोजगारासाठी स्थलांतर करणाऱ्यांना कोणत्या कामांसाठी स्थलांतर करावे लागत होते या बाबत वर्गीकरण केले असता उसतोडणी कामासाठी ७० (२५.९३ टक्के) लोकांना, विट भट्टीचे काम करण्यासाठी ३६ (१३.३३ टक्के) जिनींग व प्रेसिंगच्या कामासाठी १० (३'७० टक्के), शेतीचे काम बेहडे, मध जमा करणे वन्य पदार्थ जमा करण्यासाठी १५४ (५७.०४ टक्के) सर्वात जास्त लोकांना या कामांसाठी स्थलांतर करावे लागत होते.

२०१६ ते २०१७ या कालावधीत सर्वेक्षीत उत्तरदात्यांचे कुटुंबाच्या प्रकारानुसार वर्गीकरण केले असता संयुक्त कुटुंबाच्या प्रकारानुसार प्रमाण १३० (४८.१५ टक्के) एवढे होते. तर विभक्त कुटुंबाच्या प्रकारानुसार १४०(५१.८५ टक्के) एवढे होते. यात सर्वात जास्त विभक्त कुटुंबात राहणाऱ्यांचे प्रमाण होते तर सर्वात कमी प्रमाण संयुक्त कुटुंबात राहणाऱ्यांचे होते.

सभोवतालच्या परिसरात विशिष्ट हंगामापुरता रोजगार मिळत असल्याने मासिक उत्पन्न कमी असल्याने उत्पन्न वाढविण्यासाठी लोकांना स्थलांतर करावे लागते. हे तक्ता क्र. २ मध्ये दर्शविलेले आहे.

## स्थलांतरीत कुटुंब प्रमुखांचे मासिक उत्पन्नानुसार वर्गीकरण :—

(कालखंड २०१६ ते २०१७)

| अ. क्र. | मसिक उत्पन्न | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | १००० रु. पेक्षा कमी | १० | ३.७० टक्के |
| २ | १००० रु. ते १९९९ रु. पर्यंत | २०२ | ७४.८१टक्के |
| ३ | २००० रु. पेक्षा जास्त | ५८ | २१.४८टक्के |
| | एकुण | २७० | १०० टक्के |

२०१६ ते २०१७ या कालावधीत सर्वेक्षीत कुटुंबप्रमुखांचे मासिक उत्पन्नानुसार वर्गीकरण केले असता १००० रु. पेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्यांचे प्रमाण १० (३.७० टक्के) एवढे होते. १००० रु. ते १९९९ रु. पर्यंत उत्पन्न असणाऱ्यांचे प्रमाण २०२ (७४.८१ टक्के) एवढे होते.तर २००० रु. पेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्यांचे प्रमाण ५८ (२१.४८ टक्के) एवढे होते.

महाराष्ट्रातील आदिवासी जमातीतील तडवी भिल्ल जमातीतील स्थलांतरीत कुटुंबाचे दारिद्ररेषेच्या खालील यादीतील प्रमाण, कनिष्ठ व मध्यम उत्पन्न गटातील प्रमाण जास्त असल्याने या लोकांना आपल्या उत्पनाचा स्तर वाढविण्यासाठी स्थलांतर करावे लागते. हे तक्ता क्र. ४ मध्ये दर्शविलेले आहे.

## २०१६ ते २०१७ पर्यंत सर्वेक्षीत कुटुंबाच्या उत्पन्न गटानुसार वर्गीकरण :—

| अ. क्र. | उत्पन्न गट | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | दारिद्ररेषेच्या खालील यादीत | ८२ | ३०.३७ टक्के |
| २ | कनिष्ठ उत्पन्न गट | १२८ | ४७.४१टक्के |
| ३ | मध्यम उत्पन्न गट | ५९ | २१.८५टक्के |
| ४ | उच्च उत्पन्न गट | १ | ०.३७ टक्के |
| | एकुण | २७० | १०० टक्के |

२०१६ ते २०१७ पर्यंत सर्वेक्षीत कुटुंबाच्या उत्पन्न गटानुसार वर्गीकरण केलेअसता दारिद्ररेषेच्या खालील यादीत असणाऱ्यांचे प्रमाण ८२ (३०.३७ टक्के) एवढे होते. कनिष्ठ उत्पन्न गटात असणाऱ्यांचे प्रमाण १२८ (४७.४१ टक्के) एवढे होते. मध्यम उत्पन्न गटात असणाऱ्यांचे प्रमाण ५९ (२१.८५ टक्के) एवढे होते. तर उच्च उत्पन्न गटात असणाऱ्यांचे प्रमाण १ (०.३७ टक्के) एवढे होते. यावरुन असे म्हणता येइल की महाराष्ट्रातील आदिवासी जमातीतील स्थलांतरीत तडवी भिल्ल जमातीतील कनिष्ठ उत्पन्न गट असणाऱ्यांचे प्रमाणसर्वात जास्त आहे.

महाराष्ट्रातील आदिवासी जमातीतील तडवी भिल्ल जमातीची शैक्षणिक स्थिती कमकुवत असल्याने या लोकांना स्थायी व सरकारी नोकरी उपलब्ध होत नसल्याने त्यांना स्थलांतर करासवे लागते हे तक्ता क्र. ४ मध्ये दर्शविलेले आहे.

२०१६ ते २०१७ या कालावधीत स्थलांतरीत कामगारांचे शैक्षणिक स्थितीनुसार वर्गीकरण

| अ. क्र. | शैक्षणिक दर्जा | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | निरक्षर | १०५ | ३८.८९ टक्के |
| २ | प्राथमिक शिक्षण | ६५ | २४.०७ टक्के |
| ३ | माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण | ८१ | ३०.०० टक्के |
| ४ | पदवी व पदवीस्तर | १९ | ७.०३ टक्के |
| | एकुण | २७० | १०० टक्के |

२०१६ ते २०१७ या कालावधीत महाराष्ट्रातील तडवी भिल्ल जमातीतील स्थलांतरीत कामगारांचे त्यांच्या शैक्षणिक स्थितीनुसार वर्गीकरण केले असता निरक्षरांचे प्रमाण १०५(३८.८९ टक्के) एवढे होते. प्राथमिक शिक्षण घेतलेल्यांचे प्रमाण ६५(२४.०७ टक्के) एवढे होते. माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण घेतलेल्यांचे प्रमाण ८१(३०.०० टक्के) एवढे होते. तर पदवी व पदवीस्तर शिक्षण घेतलेल्यांचे प्रमाण १९(०७.०३ टक्के) एवढे होत'

महाराष्ट्रातील आदिवासी जमातीतील तडवी—भिल्ल जमातीतील स्थलांतरीत कामगार कायम स्वरुपी एकाच ठिकाणी थांबत नसल्याने अशा कामगारांना कनिष्ठ सामाजिक स्तरात वागविले जाते. त्यामुळे ते स्थलांतर करतात. हे पुढील तक्ता क्र.५ मध्ये दर्शविलेले आहे.

२०१६ ते २०१७ पर्यंतच्या कालावधीत स्थलांतरीत कामगारांना कोणत्या सामाजिक स्तरात वागविले जात होते याबाबत वर्गीकरण .

| अ. क्र. | समाजिक स्तर | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | श्रेष्ठ | १ | ००.३७ टक्के |
| २ | कनिष्ठ | १४० | ५१.८२ टक्के |
| ३ | मध्यम | १२० | ४४.४४ टक्के |
| ४ | सांगतायेत नाही | ९ | ०३.३३ टक्के |
| | एकुण | २७० | १०० टक्के |

२०१६ ते २०१७ या कालावधीत महाराष्ट्रातील तडवी भिल्ल जमातीतील स्थलांतरीत कामगारांना कोणत्या सामाजिक स्तरात वागविले जात होते याबाबत वर्गीकरण केले असता श्रेष्ठ सामाजिक स्तरात वागविले जात होते असे सांगणाऱ्यांचे प्रमाण १(०.३७ टक्के) एवढे होते कनिष्ठ सामाजिक स्तरात वागविले जात होते असे सांगणाऱ्यांचे प्रमाण १२० (४४.४४ टक्के) एवढे होते. सांगता येत नाही असे सांगणाऱ्यांचे प्रमाण ९(३.३३ टक्के) एवढे होते.

## •स्थलांतरीत कामगारांचे रहाणीमान :—

२०१६ ते २०१७ या कालावधीत एकुण २७० सर्वेक्षीत लोकांपैकी ३० (११.११ टक्के) लोकांकडे पक्की घरे होती. तर २४० (८८.८९ टक्के) लोकांना निवासाची व्यवस्थीत घरे नव्हती. शौचालयाच्या सुविधा कोणाकडेच आढळून आल्या नाहीत. मनोरंजनाची साधने यात दूरदर्शन संच, रेडीओ या सारखी साधने १८० (६६.६७ टक्के) लोकांकडे आढळून आली. या साधनांवर होणारा खर्च सर्वात जास्त असल्याने राहणीमानात सुधारणा करण्यासाठी त्यांच्याजवळ उत्पन्न राहत नसल्याने त्यांचे राहणीमान नित्कृष्ट आहे.

•स्थलांतरीत कामगारांची आरोग्य विषयक स्थिती

तडवी—भिल्ल जमातीतील स्थलांतरीत कामगारांना उस तोडणी कामासाठी विटभट्टीचे काम करण्यासाठी जिनींग व प्रेसिंगच्या कामासाठी शेतीचे काम बेहडे, मध जमा करणे व वन्य पदार्थ जमा करणे या कामासाठी स्थलांतर करावे लागत असल्याने त्यांना विविध आजारांना सामोरे जावे लागते.

## २०१६ ते २०१७ या कालावधीत स्थलांतरीत कामगारांची आरेग्य विषयक स्थिती

तक्ता क्र.६

| अ. क्र. | आजाराचा प्रकार | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | दमा | ५ | १.८५ टक्के |
| २ | फुफुसाचे आजार | ७ | २.५९ टक्के |
| ३ | हिंस्त्र प्राण्यांपासून होणारी इजा | ३ | १.११ टक्के |
| ४ | त्वचारोग | ७ | २.५९ टक्के |
| ५ | आजार नसणारे | २४८ | ९१.८६ टक्के |
| | एकुण | २७० | १०० टक्के |

वरील तक्त्यानुसार २०१६ ते २०१७ या कालावधीत एकुण सर्वेक्षीत कामगारांमध्ये दमा असणाऱ्यांची संख्या ५ (१.८५ टक्के) एवढी होते. फुफुसाचे आजार असणाऱ्यांची संख्या ७ (२.५९ टक्के) एवढी होते. हिस्त्र प्राण्यांपासून होणारी इजा यांची संख्या ३ (१.११ टक्के) एवढी होती त्वचारोग असणाऱ्यांची संख्या ७ (२.५९ टक्के) एवढी होते. तर आजार नसणाऱ्यांची संख्या २४८ (९१.८५ टक्के) एवढी होते.

## •स्थलांतरीत कामगारांची व्यसनाधिनता :—

महाराष्ट्रातील तडवी भिल्ल जमातीतील स्थलांतरीत कामगारांना अवजड व अंग मेहनतीची कामे करावी लागत असल्याने या लोकांमध्ये थकवा घालविण्यासाठी विविध व्यसनांचे प्रमाण आहे. दारु पिणाऱ्यांची संख्या १३०(४८.१५टक्के) एवढी होती. तर तंबाखू खाणाऱ्यांचे प्रमाण ३५ (१२.९६टक्के) एवढे होते तर निर्व्यसनी लोकांचे प्रमाण १०५ (३८.८९टक्के) एवढे होते यावरुन असे म्हणता येईल की या जमातीत स्थलांतरीत कामगारांमध्ये व्यसनाधिनतेचे प्रमाण जास्त असल्यामुळे मिळणाऱ्या मिळकतीचा बराचसा भाग यावर खर्च होत असल्याने त्यांचे दारिद्रिय दिवसेंदिवस वाढत जाते.

## •स्थलांतरीत कामगारांच्या मुलांचे शिक्षण, स्त्रियांना दिली जाणारी वागणूक व अंधश्रध्दा

महाराष्ट्रातील आदिवासी जमातीतील तडवी भिल्ल जमातीच्या लोकांना कामासाठी स्थलांतर करावे लागत असल्याने त्यांच्या मुलांच्या शिक्षणात खंड पडतो. परिणामी मुलांमध्ये शिक्षणाप्रती आवड रहात नसल्याने या स्थलांतरीत कामगारांच्या मुलांमध्ये निरक्षरतेचे प्रमाण जास्त १०५ (३८.८९टक्के) एवढे आहे. या जमातीत स्त्रीयांना समानतेने वागविले जाते. त्याचप्रमाणे अंधश्रध्दा मानणाऱ्यांचे प्रमाण १३५ (५०.००टक्के) एवढे आहे.

## •निष्कर्ष :—

१) महाराष्ट्रातील आदिवासी जमातीतील तडवी भिल्ल जमातीच्या लोकांना रोजगारानिमीत्त सर्वात जास्त प्रमाणावर स्थलांतर करावे लागते.

२) महाराष्ट्रातील आदिवासी जमातीतील तडवी भिल्ल जमातीतील स्थलांतरीत कामगारांचे मासिक उत्पन्न १००० ते १९९९ रु पर्यंत असणायांचे प्रमाण २०२ (७४.८१टक्के) एवढे सर्वात जास्त आहे.

३) २०१६ ते २०१७ या कालावधीत महाराष्ट्रातील आदिवासी जमातीतील तडवी भिल्ल जमातीतील स्थलांतरीत कामगारांचे कनिष्ठ उत्पन्न गट असणायांचे प्रमाण १२८ (४७.४१टक्के) एवढे सर्वात जास्त आहे.

४) २०१६ ते २०१७ या कालावधीत महाराष्ट्रातील आदिवासी जमातीतील तडवी भिल्ल जमातीतील स्थलांतरीत कामगारांमध्ये निरक्षरतेचे प्रमाण सर्वात जास्त १०५ (३८.५९टक्के) एवढे आहे.

५) २०१६ ते २०१७ या कालावधीत महाराष्ट्रातील आदिवासी जमातीतील तडवी भिल्ल जमातीतील स्थलांतरीत कामगारांना कनिष्ट स्तरात वागविले जात होते

६) २०१६ ते २०१७ या कालावधीत महाराष्ट्रातील आदिवासी जमातीतील तडवी भिल्ल जमातीतील स्थलांतरीत कामगारांपैकी १३५ (५०.००टक्के) लोक अंधश्रध्दा पाळतात.

७) २०१६ ते २०१७ या कालावधीत महाराष्ट्रातील आदिवासी जमातीतील तडवी भिल जमातीतील स्थलांतरीत कामगारांमध्ये विभक्त कुटूंबात रहाणाऱ्यांचे प्रमाण १४० (५१.०० टक्के) सर्वात जास्त होते.

८) २०१६ ते २०१७ या कालावधीत दरम्यान तडवी भिल जमातीतील स्थलांतरीत कामगार मनोरंजनाच्या साधनांवर जास्त खर्च केला जात होता.

९) २०१६ ते २०१७ या कालावधी दरम्यान तडवी भिल जमातीतील भिल स्थलांतरीत कामगारांमध्ये व्यसनाधिनतेचे प्रमाण सर्वात जास्त १६५ ( ६०.८९ टक्के) ऐवढे होते.

## •महाराष्ट्रातील आदिवासी जमातीतील तडवी भिल जमातीतील स्थलांतरीत कामगारांची स्थिती सुधारण्यासाठी केलेल्या उपाययोजना :—

### अ) सरकारने केलेल्या उपाययोजना :—

तडवी भिल जमातीतील स्थलांतरीत कामगारांची स्थिती सुधारण्यासाठी सरकारने पुढील उपाययोजना केलेल्या आहे.

१) शासनाव्दारे राबविण्यात येत असलेल्या खावटी कर्ज योजनेला पर्याय म्हणून धान्यकोष योजना १९९५ पासून सुरू करण्यात आली आहे. धान्यकोष योजनेव्दारे आदिवासी भागातील गावकयांमध्ये अन्नधान्याचा संदर्भात आत्मनिर्मता व्हावी व त्यांचे स्थलांतर होणार नाही हा एक उददेश सदर योजनेचा आहे.

२) आदिवासी भागातील सुशिक्षित तरूणांना आदिवासी विकासाच्या विविध योजनांची तसेच समाजाचे नेतृत्व करण्याकरीता आवश्यक त्याबाबतचे प्रशिक्षण आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे येथे आयोजित करण्यात येते.

३) आदिवासीच्या आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा होण्यास मदत होईल व त्यांचे स्थलांतर होणार नाही या उद्देशाने शेळया—मेंढयांचा गट पुरवणे योजना शासनाने सुरु केलेली आहे.

४) सरकारने विविध शेती विकासाच्या योजना सुचविलेल्या आहेत यात प्रामुख्याने वीजपंप पुरवठा योजना, विहीर योजना, या व यासारख्या योजना प्रभावीपणे राबविल्यास शेतीत रोजगार निर्मिती होवू शकेल व त्यांना रोजगार निर्माण होइल परिणामी त्यांना स्थलांतर करावे लागणार नाही.

### ब) संशोधकाने सुचविलेल्या उपाययोजना :—

महाराष्ट्रातील आदिवासी जमातीतील तडवी—भिल जमातीच्या स्थलांतरीत कामगारांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते या समस्या सोडविण्यासाठी पुढील उपाययोजना संशोधकाने सुचविल्या.

१) उसाच्या काटयांपासून विविध प्रकारच्या आजारांना उसतोड कामगारांना सामोरे जावे लागते म्हणून साखर कारखान्यांनी त्यांना उसाच्या काटयांना प्रतिकार करणाऱ्या पोषाखांचा पुरवठा करावा.

२) वीटभट्टी कामगारांना विविध पोटाच्या आजारांना व श्वसनाच्या आजारांना सामोरे जावे लागते म्हणून त्यांना गमबुट पुरवावेत अशुध्द हवा पोटात जाणार नाही म्हणून मास्क पुरवावे.

३) स्थलांतरीत कामगारांना व्यवस्थित निवासाची स्वच्छ पाण्याची व्यवस्था पोषक आहाराची उपलब्धता करुन दिल्यास त्यांचे आरोग्य चांगले राहून त्यांची काम करण्याची क्षमता वाढु शकेल.

४) महाराष्ट्रातील आदिवासी जमातीतील तडवी–भिल्ल जमातीच्या स्थलांतरीत कामगारांमध्ये अंधश्रध्देचे प्रमाण जास्त आहे हे प्रमाण कमी करण्यासाठी विज्ञानाचा प्रसार करणे आवश्यक आहे.

## संदर्भ :–


१) डॉ. गारे गोविंद – 'महाराष्ट्रातील आदिवासी जमाती' कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे–२०००

२) डॉ. गारे गोविंद – 'महाराष्ट्रातील आदिवासी जमाती' कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे–२०००

३) डॉ. आगलावे प्रदिप – 'सामाजिक संशोधन पदधती शास्त्रे व तंत्रे' श्री साईनाथ प्रकाशन नागपूर – २०००

४) डॉ. पाटील बा. भा. 'संशोधन पदधती' श्री मंगेश प्रकाशन नागपूर १९९९

५) श्री गिरजे नंदकुमार 'सातमाळ व सातपुडा परिसरातील तडवी भिल' वरद प्रकाशन जानेवारी २०१०

६) श्री तडवी अजीज रशिद 'सातपुडयातील आदिवासी सांस्कृतिक परंपरा आणि सामाजिक चालीरिती'हर्षवर्धन प्रकाशन बीड जून २०१६

७) जळगाव, औरंगाबाद, बुलढाना व जालना जिल्हयातील विविध तालुके व खेडयावरील मुलाखत दात्यांच्या मुलाखतीवरुन

८) आदिवासी विकास विभाग संशोधन पत्रिका


❖❖❖

# साठपूर्व विदर्भेतर व वैदर्भीय कादंबरीतील रंजनवाद

डॉ. पवन मांडवकर
प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५४०१
अध्यक्ष, सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद
E mail: pavanmandavkar@hotmail.com भ्रमणध्वनी ९४२२८६७६५८

## सारांश

कादंबरी हा अत्यंत लोकप्रिय वाङ्मयप्रकार म्हणून ओळखला जातो. साठपूर्व काळात विदर्भात आणि विदर्भाव्यतिरिक्त उर्वरित महाराष्ट्रात विपुल प्रमाणात कादंबरीनिर्मिती झाली. स्वातंत्र्यपूर्व काळात वाचकांच्या मनावर अधिराज्य गाजविणाऱ्या प्रा. ना.सी. फडके व वि.स. खांडेकर यांच्या विपुल कादंबऱ्या रंजनवादी प्रभावाने युक्त होत्या. त्यातील अनेक कथांची मनोहर गुंफण, चटकदार संवाद, सहजसुंदर शैली असे असतानाही या कादंबऱ्या वाचकमनाची पकड घेऊ शकल्या नाहीत. वैदर्भीय कांदबरीविश्वातील रंजनवादी कादंबरी काहीशी वेगळी ठरते. त्यात सर्वात महत्त्वाचे म्हणजे विदर्भातील कादंबरीकारांनी जीवनाशी संगत कधीच सोडली नाही. चार घटकांपुरते रंजन करण्याचा संकुचित उद्देश वैदर्भीय कादंबरीचा नव्हता. मनात खदखदत असलेल्या अनुभूतीला वाट करून देण्यासाठी हे लेखक कादंबरीकडे वळले असल्याने त्यांच्या रचनांमधून जीवनातील अनाकलनीय वळणाचे, कारुण्याचे आणि उदात्ततेचेही दर्शन घडते.

**बीजशब्द** : रंजनवादी कादंबरी, वैदर्भीय, विदर्भेतर, अश्रू, नांदतं घर, दुनिया

## प्रस्तावना

मराठी साहित्यात स्वातंत्र्योत्तर साठपूर्व वैदर्भीय कादंबरीने अत्यंत मोलाचे योगदान दिले. मात्र वैदर्भीय कादंबरीचा प्रवास काहीसा दुर्लक्षित राहिला किंवा प्रसिद्धी व समीक्षेपासून वंचित राहिला. प्रसिद्धी तंत्राची जाण आणि आधुनिक सुविधांनी युक्त अशी ग्रंथनिर्मिती केंद्रे विदर्भात त्या काळात असती तर विदर्भेतर कादंबरीच्या तुलनेत वैदर्भीय कादंबरीचीच सर्वगुणसंपन्नतेमुळे सर्वाधिक चर्चा झाली असती.

साठपूर्व आणि साठोत्तर असे दोन टप्पे वैदर्भीयच नव्हे तर समग्र मराठी साहित्यात महत्त्वाचे म्हणून अभ्यासले जातात. त्यातही कादंबरी हा अत्यंत लोकप्रिय वाङ्मयप्रकार म्हणून ओळखला जातो. स्वातंत्र्योत्तर साठपूर्व काळात विदर्भात आणि विदर्भाव्यतिरिक्त उर्वरित महाराष्ट्रात विपुल प्रमाणात कादंबरीनिर्मिती झाली. पश्चिम महाराष्ट्रात इतर प्रकारांच्या तुलनेने रंजनवादी कादंबऱ्या अधिक दिसतात. जीवनवादी कादंबऱ्यांपासून फारकत घेतलेल्या या भागातील लेखक नामवंतही आहेत आणि नवोदितही आहेत. विदर्भातील आणि विदर्भातील रंजनवादी कादंबऱ्यांमध्ये काहीसा फरक जाणवतो, तो या शोध निबंधात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

## रंजनवादी कादंबऱ्या

## विदर्भाबाहेरील रंजनवादी कादंबऱ्या

स्वातंत्र्यपूर्व काळात वाचकांच्या मनावर अधिराज्य गाजविणाऱ्या प्रा. ना.सी. फडके यांच्या 'भरारी', 'जहर', 'जेहलम', 'धोका', 'गीत जुने सूर नवे', 'असाही एक त्रिकोण', 'पुरुष जन्मा ही तुझी कहाणी', 'किती जवळ? किती दूर?', 'चंद्रावरचे डाग' इत्यादी कादंबऱ्या स्वातंत्र्योत्तर प्रकाशित झाल्या. या कादंबऱ्यांमध्ये प्रेम हाच विषय प्राध्यान्याने दिसतो. 'भरारी', 'जहर', 'धोका' या कादंबऱ्यांचा विषय विवाहबाह्य संबंध किंवा विवाहाशिवाय एकमेकांजवळ राहणाऱ्या स्त्री–पुरुष संबंधांवर आधारित आहे. कथेची मनोहर गुंफण, चटकदार संवाद, सहजसुंदर शैली असे असतानाही या कादंबऱ्या वाचकमनाची पकड घेऊ शकल्या नाहीत.

वि.स. खांडेकर यांच्या 'अश्रू' या कादंबरीबाबतही असेच म्हणता येते. यातील शिक्षक असलेला नायक शंकर हा ध्येयवादी आहे. जगातील दारिद्र्य, महागाई, नैतिक अध:पतन यांमुळे तो गांजून गेला आहे. तरीही कल्पनेने तो ध्येयवादीच आहे. हा ध्येयवाद वास्तवात उतरविण्याचा त्याचा आटोकाट प्रयत्न आहे. मात्र यात तो

अपयशी ठरतो. या व्यक्तिरेखेतून लेखकाने चित्रित केलेले मध्यमवर्गीयांच्या दुबळेपणाचे, असहायतेचे जीवन वाचकांच्या मनावर तितकासा ठसा उमटवत नाही.

'गाठभेट' ही अद्‌भुतरम्य पण चटका लावणारी कादंबरी लिहिणाऱ्या वि.वि. बोकील यांच्या 'ठिगळ', 'मायेची शाल', 'सात पावले', 'सखी' अशा प्रेम आणि सांसारिक जीवनावर आधारलेल्या कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. कथेचा आटोपशीरपणा, चित्तवेधकता, खेळकरपणा हे लेखकाच्या लेखणीचे वैशिष्ट्य.

द.र. कवठेकरांची 'रूपेरी कडा' ही आकाराने मोठी असूनही कंटाळवाणी न ठरता शेवटपर्यंत वाचकांच्या मनावर पकड ठेवते. सुधाकर आणि क्षमा या प्रमुख पात्रांची कहाणी निवेदन करणाऱ्या या कथेचा शेवट नाटकी वाटला तरी त्यात उत्कटता आणि परिणामकारकता आहे. त्यांच्या 'वाट पाहता लोचन', 'आशियाना' या अन्य कादंबऱ्या.

फडके आणि खांडेकर यांच्या कादंबरीतंत्राची नवोदितांवरील मोहिनी स्वातंत्र्यानंतरही कमी झाली नाही. फडक्यांच्या कादंबरीतील प्रेमाचा त्रिकोण आदर्शवत मानून त्याच ढाच्यातल्या कादंबऱ्या निर्माण करणाऱ्या लेखकांची संख्या अधिक आहे. जीवनानुभव कमी व सभोवतीच्या सामाजिक आव्हानांची जाण नसल्याने व वास्तवाकडे डोळेझाक करून प्रेमविषयातच गुरफटल्याने संपूर्ण रसिकवाचकांवर त्यांचा प्रभाव पडू शकला नाही. भडक चित्रण किंवा सनसनाटीपणा आणण्यासाठी वाटेल त्या क्लृप्त्या योजण्यात हे लेखक पुढे आहेत. एका पुरुषावर दोन स्त्रियांचे प्रेम, त्यातून निर्माण होणारा संघर्ष, पत्नीची प्रतारणा करणारा पती, वेश्येच्या जीवनातील विदारक घटना, चुंबनवर्षावाच्या प्रणयकथा आणि भडकपणा यांतच कथानके आलटून पालटून गुंफल्याचे दिसते. बेगडी प्रेमकथा किंवा अशा दिखावू कथानकांच्या संख्येत मोठी वाढ स्वातंत्र्यानंतर झाली होती. आ.रा. फुले यांच्या 'चांदण्याच्या उन्हात', 'उद्रेक', 'पिंजऱ्याचं दार उघड', प्रभाकर अत्रेंची 'रंगात रंगलो मी', मा.दा. देवकातेंच्या 'भ्रमर', 'वासना', दत्ता जी. कुळकर्णी यांच्या 'माझी प्रिया', 'एक दिवस', महादेव मोरे यांच्या 'प्रवाह', 'बळी', 'वर आभाळ खाली धरती', र.मा. पाटील यांची 'मातीत मिळालं मोती', निशिकांत काकोडकरांची 'गिधाडे', शशी पटवर्धनांची 'दोन डोळे हजार खिडक्या', वि.ज. बोरकरांची 'जिराफ', ग.वा. बेहरे यांची 'जळणं थोडं बाकी आहे', म.पां. भावे यांची 'असा मी काय गुन्हा केला?', सी.पु. वालावलकरांची 'भातुकली', वसंत गांगलांच्या 'त्रिकोणाची चवथी बाजू', 'शबरीची बोरे', ह.का. हसमनीस यांच्या 'मी अमृतात न्हाले', 'कुंकू माझं भाग्याचं' या सर्व लेखकांनी अत्यंत सोपी सोपी गणिते मांडून वाचकांचे मनोरंजन करण्याचा प्रयत्न केला. वास्तवापासून दूर गेल्याने त्या कादंबऱ्या केवळ रंजनापुरत्या मर्यादित राहिल्या व काही प्रमाणात नीरस, निकस व समाजाविन्मुख ठरल्या. तोच तो पणा आणि केवळ रंजनाच्या उद्दिष्टामुळे जनमानसाची पकड घेण्याचे सामर्थ्य या कादंबऱ्यांच्या हातून निसटले.

## विदर्भातील रंजनवादी कादंबऱ्या

वैदर्भीय कांदबरीविश्वातही रंजनवादी कादंबऱ्या मोठ्या प्रमाणावर निर्माण झाल्या. मात्र विदर्भेतर मराठी कादंबरीपेक्षा वैदर्भीय कादंबरी काहीशी वेगळी ठरते. त्यात सर्वात महत्त्वाचे म्हणजे विदर्भातील कादंबरीकारांनी जीवनाशी संगत कधीच सोडली नाही. चार घटकांपुरते रंजन करण्याचा संकुचित उद्देश वैदर्भीय कादंबरीचा नव्हता. मनात खदखदत असलेल्या अनुभूतीला वाट करून देण्यासाठी हे लेखक कादंबरीकडे वळले असल्याने त्यांच्या रचनांमधून जीवनातील अनाकलनीय वळणाचे, कारुण्याचे आणि उदात्ततेचेही दर्शन घडते.

प्रेम कथा ही या कादंबरीचा एक भाग होती; परंतु थिल्लरपणाच्या आहारी न जाता प्रेमातील सर्व संभवनीय बाजूंवर विचारपूर्वक आणि गांभीर्याने लिखाण झालेले आढळते. महाविद्यालयीन वातावरणात फुलणाऱ्या प्रेमावर वैदर्भीय लेखकांनी कादंबऱ्या निर्माण केल्या असल्या तरी त्यातील तारुण्यसुलभ अवखळपणापेक्षा त्यातील वैचारिक प्रगल्भताच वाचकांना भारावून टाकते. साठ संपता संपता किंवा त्यानंतर लगेच आलेल्या कादंबऱ्यांमध्ये काही उल्लेख करावयाचे झाल्यास 'वंचना', 'काय गुन्हा केला?' या भाऊ मांडवकरांच्या कादंबऱ्या, 'तुषार' ही श्रीकांत राय यांची कादंबरी, 'अस्पर्शी' ही एकनाथ बिजवेंची कादंबरी, 'अबोली' ही कृष्णकांत पराते यांची कादंबरी यांमधून अशा प्रीतीकथा रंगविण्यात आल्या आहेत. या सर्व कादंबऱ्यांमधून त्यांच्या पात्रांच्या वाट्याला आलेले दु:ख वाचकांना अंतर्मुख करते.

स्वांतंत्र्योत्तर साठपूर्व काळातील मा.ना. भोळे यांची एक रंजनवादी सुखान्तिका 'दुनिया'. ह्या कादंबरीत नायक—नायिकेच्या प्रथम भेटीत एकमेकांकडे आकर्षित होणे, प्रत्येक खेळात ते दोघे एकमेकांचे सहयोगी खेळाडू म्हणून निवडले जाणे, मध्येच नायिकेला स्वत:च्या ध्येयाची आठवण होणे, मग 'प्रेम की ध्येय' हा संघर्ष, त्यातून

विकल्प, नायकाचे परागंदा होणे, त्यानंतरच्या काळात दोघांनाही एकमेकांवर असलेल्या प्रेमाची महती पटणे आणि पुन्हा त्यांचे मिलन होणे अशा रुळलेल्या मार्गावरून ही कादंबरी प्रवास करते. या कादंबरीत नायक–नायिकेच्या प्रेमप्रकरणात घरच्यांची किंवा समाजाची आडकाठी नसते. घरातील व सभोवतालची परिचित मंडळी त्या दोघांचे भले व्हावे, याचसाठी प्रयत्नशील दिसतात.

लेखिका सुमती धनवटे यांची कादंबरी 'वादळज्योत'. 'समाजात अन्यायाच्या जात्याखाली ज्या स्त्रिया भरडल्या जात आहेत, त्यांच्याकडे सहानुभूतीच्या नजरेने पाहिलं जावं, असा उद्देश बाळगून ही कादंबरी लिहिली आहे.'[१] असे लेखिका सुमती धनवटे यांनी स्वत: म्हटले आहे. प्रेमाच्या त्रिकोणातून ही कादंबरी फडके तंत्राचाच वापर करते. सुरुवातीची प्रकरणे आकर्षित करणारी, वाचकांना गुंतवणारी, पुढे बहरत गेलेली प्रेमकथा, निरगाठ–सुरगाठ–उकल या पद्धतीने कथानकाला फुलवत ठेवणे हे तंत्र आणि मोहक शैलीमुळे ही कादंबरी वैदर्भीय रंजनवादी कादंबऱ्यांमध्ये उठून दिसते.

या कादंबरीपूर्वी लेखिकेने लिहिलेल्या 'जय–पराजय' या कादंबरीतही नायक–नायिकेचे एकमेकांजवळ येणे, विभक्त होणे आणि पुनर्मिलन हाच मार्ग अनुसरला आहे. नायिका मर्यादाशील तर नायक बेछूट, स्वैराचारी, त्यातून निर्माण होणारे भावनिक, वैचारिक संघर्ष आणि शेवटी नायकाचे मतपरिवर्तन ही कथानकाची मांडणी आकर्षक आहे.

'मी एकटीच जाणार' ही लीला देशमुखांची वैद्यकीय पेशाची पार्श्वभूमी लाभलेली ही एक प्रेमकथा. 'स्त्रीने वाटेल तसे कष्ट उपसावे अन् थोडं स्वास्थ्य मिळतात पुरुषाची फुलपाखरी वृत्ती बाहेर भटकू लागावी, हे खरोखर आजच्या सुशिक्षित स्त्रीच्या संसाराचं स्वरूप आहे. बरोबरीची बुद्धिवान, ध्येयवादी स्त्री आजच्या पुरुषाची ही फुलपाखरी वृत्ती अजमावून घ्यायला असमर्थ ठरली आहे'[२] हे सांगण्याच्या उद्देशाने या कादंबरीची रचना केली गेली आहे. लीला देशमुखांच्या कादंबऱ्यांवर फडक्यांच्या शैलीची छाप असून कलावादाकडे व रंजनवादाकडे त्यांचा झुकता कल आहे. स्वप्नमय आभासात्मक विश्वात त्यांच्या नायक–नायिका वावरत असतात.

'वीस दिवस' ही श्रीकांत राय म्हणजेच श्रीकांत नारायण आगाशे यांची प्रेमविषय साकारणारी कादंबरी. पत्नीप्रेमाची कथा असली तरी वेड्यांचे अनुभव अतिशय दर्जेदारपणे वर्णिले आहेत.

वाचकप्रिय निर्मिती करायची म्हणून उद्धव शेळक्यांनी 'नांदतं घर' ही कादंबरी निर्माण केली.त्यामुळे दमदार कथानकाचे हाल झाले. घरात दारिद्र्य असूनही यशवंताचे अभ्यासाकडे होणारे दुर्लक्ष, त्याचा सिनेमाचा नाद, शालूचे प्रेमप्रकरण आणि त्यातून उद्‌भवणारे संकट, वडील मुलाचे वेगळे होणे हे मध्यमवर्गीयांच्या जीवनातील सुखदु:खाचे चित्रण या कादंबरीत आले आहे.

ग.त्र्यं. माडखोलकरांच्या ज्या चार कादंबऱ्यांचा आपण उल्लेख यापूर्वी केला त्या म्हणजे 'स्वप्नांतरिता', 'अनघा', 'अरुंधती', 'रुक्मिणी'. या चारही कादंबऱ्या नायिकाप्रधान असून समकालीन राजकारणाचे व्यापक चित्रण, क्रांतिकारकांविषयी आत्मीयता आणि उग्र शारीरिक प्रेम हे त्यांच्या कादंबऱ्यांचे विशेष त्यातून जाणवतात.

याच काळात लीला दीक्षितांची 'मधुबोल', गो.सं. गिरटकरांची 'पावना', द.चि. सोमणांची 'वाड्यांच्या वाड्यात', ह.चि. दातारांची 'मशाल', द.ग. प्रधानांची 'जीवनप्रवाह' अशा अनेक कादंबऱ्यांनी वाचकांचे रंजन करणे हेच ध्येय आखल्याचे जाणवते. असे असले तरीदेखील या कालखंडातील वैदर्भीय रंजनवादी किंवा करमणूकप्रधान कादंबरीने वाचकांचे रंजन करताना जीवनाची साथ सोडली नाही, हे वैशिष्ट्य नाकारता येणार नाही. प्रेम चित्रण ही रंजनवादी कादंबरीची प्रवृत्ती असली तरी ही कादंबरी सहसा थिल्लर पातळीवर जात नाही. गांभीर्यपूर्वक प्रेमविषयक सर्व संभवनीय पैलूंचा विचार साहित्यिकांनी केलेला आहे. तारुण्यसुलभ अवखळपणाबरोबरच वैचारिकतेलाही प्राधान्य दिल्याचे लक्षात येते.

## समारोप

स्वातंत्र्योत्तर काळात समकालीन वाचकांच्या आवडीनिवडी आणि सुखासीन कादंबरीकडे तरुणांचा ओढा लक्षात घेऊन फडके, खांडेकर, माडखोलकर अशा कादंबरीकारांनी लेखन केले. जीवनातील दु:खाला कंटाळून कल्पनाविश्वात रमणाऱ्या सुशिक्षित तरुण वाचकांची नस या साहित्यिकांनी अचूक पकडली होती. 'प्रेम' हा विषय मोठ्या प्रमाणावर हाताळून नायक–नायिकेची भेट–ओळख–प्रेम– भेटीगाठी–वाद –ताटातूट–विरह–पुनर्मिलन हा मार्ग तसेच आदि–मध्य–अंत याच पद्धतीने शेवट गोड करणे, हेच तंत्र स्वातंत्र्योत्तर साठपूर्व वैदर्भीय रंजनवादी कादंबरीचे दिसते. वाचकप्रिय आडाखे जवळ करीत काही लेखकांनी आपल्या दमदार कथानकाचे मातेरे करून

घेतले. राजकारण वर्णनाचा मोह न आवरता आल्याने त्याला पुढे करून विरंगुळा किंवा मनाला तजेला आणण्यासाठी तर प्रेमाची पेरणी केली नाही ना, असा प्रश्न काही कादंबऱ्यांच्या बाबतीत पडतो. स्वातंत्र्यलढ्याची पार्श्वभूमी आणि कम्युनिस्टांचा, क्रांतिकारकांचा आदर असल्याने काही कादंबरीकारांनी त्यांचे विचार व नायकही तशा पद्धतीचे दाखविले आहेत. रंजनवादी भूमिकेतून काही कादंबऱ्या शृंगारिक वर्णनाकडे वळल्या असून भावना चाळवणारे लेखन म्हणूनही त्यावर टीका झाली.

साठपूर्व वैदर्भीय आणि विदर्भेतर रंजनवादी कादंबरीचा अभ्यास करताना लक्षात येते की विदर्भाबाहेरील मागणी तसा पुरवठा केल्या गेलेल्या कादंबऱ्यांप्रमाणे वैदर्भीय रंजनवादी किंवा करमणूकप्रधान कादंबरीने वाचकांचे रंजन करताना जीवनाची साथ सोडली नाही. प्रेम चित्रण ही रंजनवादी कादंबरीची प्रवृत्ती असली तरी ही कादंबरी सहसा थिल्लर पातळीवर जात नाही. गांभीर्यपूर्वक प्रेमविषयक सर्व संभवनीय पैलूंचा विचार साहित्यिकांनी केलेला आहे. तारुण्यसुलभ अवखळपणाबरोबरच वैचारिकतेलाही प्राधान्य दिल्याचे लक्षात येते.

## संदर्भ

१. धनवटे, सुमती, वादळज्योत, परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई, पहिली आवृत्ती, १९५७, प्रस्तावना.
२. देशमुख, लीला, मी एकटीच जाणार, वर्धा, पहिली आवृत्ती, १९५३, पृ. ७९.

❖❖❖

# जल व्यवस्थापन ही काळाची गरज

प्रा. एन. व्ही. नरुले
भूगोल विभाग प्रमुख
इंदिरा महाविद्यालय,कळंब
E Mail: narulenilkantha3@gmail.com भ्रमणध्वनी ९९२३९०९२९६

.

## प्रस्तावना :

मानवाचे मूलभूत अंग म्हणून पाण्याचा उल्लेख होतो. पाणी मानवाचे जीवन आहे. परंतू कलीयुगामध्ये नैसर्गिक पर्जन्यवृष्टीचा अनियमितपणा/अनिश्चिती यामुळे अवर्षण—दुष्काळासारखी परिस्थिती निर्माण होत आहे, त्यामुळे जीवनोपयोगी पाण्याचे दुर्भिक्ष जाणवताना दिसून येत आहे. वाढती लोकसंख्या, शेतीमालाचे उत्पादन, विद्युतशक्ती व उद्योगधंदे, औद्योगिकीकरण आणि शहरीकरण इत्यादी गोष्टींना पुरेसे पाणी उपलब्ध करता येत नाही. त्यातून पर्यावरणीय संतूलन निर्माण होत आहे. आजकाल सिंचन म्हणजे केवळ शेती उत्पादनासाठी पाण्याचा वापर करून त्याचे योग्य नियोजन व व्यवस्थापन करणे ही जलसिंचनाची परिभाषा समाजात प्रचलित झालेली आहे. ऊसासारख्या नगदी पिकांना मोठया प्रमाणावर पाण्याचा पुरवठा होतो. भूमिगत पाण्याची पातळी खोलवर गेली आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा कमतरता जाणवत आहे. यावर कृत्रिम पर्जन्यवृष्टीचे प्रयोग अंमलात आणले जात आहेत. परंतु जलसंधारण किंवा संवर्धनाकडे कोणाचेही लक्ष नाही. वैश्विक स्तरावर दरवर्षी स्टॉक होम जलपरिषद भरवली जाते आणि त्यातून पाणी समस्येवर वैश्विक विचार करून स्थानिक स्तरावर पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवा असा संदेश दिला जातो. परंतु अधनाढय शक्तीमुळे उपलब्ध पाण्याचा जास्त वापर होवुन जल समस्येने उग्र रूप धारण केलेले आहे. या संदर्भात लोक प्रबोधन, पाण्यासंबंधीचे योग्य धोरण, प्राधान्यक्रम व मानसिकता बदलण्याची गरज आहे. लोकांचा सहभाग व नियोजनपूर्वक जलसंपत्तीचे व्यवस्थापन याची जाणीवपूर्वक कार्यवाही करून पाणी समस्येवर मात करणे शक्य होईल.

## विषय विवेचन :

सन १७७६ मध्ये प्रसिध्द् 'ऍन एन्क्वायरी इन टू द नेचर अॅन्ड कॉजेस ऑफ द वेल्थ ऑफ नेशन्स' या ग्रंथात अर्थतज्ञ ऍडम स्मिथ यांनी असे म्हटले की '' पाण्यावाचून मनुष्य तडफडतो, परंतु पाण्याला कवडीची किंमत नाही, आणि हिऱ्याचा काहीच उपयोग नसून तो अनमोल आहे.'' हा मानवी संस्कृतीचा एक विरोधाभास आहे. म्हणजेच स्मिथ यांनी अनेक वर्षाअगोदर या गोष्टीकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला होता. त्याचप्रमाणे अनेक तज्ञांनी सुध्दा बऱ्याचदा जलसंपत्तीचा मुद्दा समोर आणून जागरुकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. परंतु जलसंपत्तीचा वापर अत्यंत निष्काळजी पणाने करण्यात आला. पाणी प्रदुषित करण्यात येवून पाण्याचे अनेक स्त्रोत विविध कारणासाठी नष्ट करण्यात आलेत. याचाच परिणाम यावर्षी जलाशयांवर कडक बंदोबस्त ठेवण्याची पाळी आपल्यावर आली. कालव्यातून वाहणाऱ्या पाण्याची चोरी करण्यात येवू नये यासाठी पहारा ठेवावा लागला. महाराष्ट्र राज्यात काही ठिकाणी पाणीपुरवठयासाठी रेल्वेने पाणीपुरवठा करावा लागला, एकंदरीतच सुजलाम सुफलाम म्हणवणाऱ्या भारतातील हे चित्र आहे.

## जलसंकट :

आंतरराष्ट्रीय जलव्यवस्थापन संस्थेने सन २००३ ते २००४ या वर्षात केलेल्या एका अभ्यासावरुन भारतात सन २०२५ पर्यंत जगाच्या गरजेच्या एक पंचमांश पाणी वापरासाठी लागेल असा अंदाज व्यक्त केला आहे, म्हणजेच पाणी वापरात मोठे चढउतार दिसून येतील. भारतातील १०० कोटी हेक्टर जमिन सिंचनाखाली येवून त्यातील ८५ टक्के जमिन भूजल साठयावर अवलंबून राहील. पृथ्वीवरील ९७ टक्के जलसाठा सागरामध्ये आहे, दोन टक्के हिमनदया व बर्फ यात समाविष्ट आहे, आणि फक्त एक टक्के साठा नदया, तळी, सरोवर, जमिनीवरील आर्द्रता, व वातावरणातील बाष्प यामध्ये दिसून येते.

सध्याच्या अंदाजानुसार सन २०५० पर्यंत जगाच्या लोकसंख्येत ३०० कोटी लोकांची भर पडेल इ.स. २०१२ पर्यंत जगातील पाच माणसांमागे एका माणसाला स्वत:ची तहान भागवता येणे शक्य नव्हते

आणि जगातील तहानलेल्यांची संख्या इ.स. २०१५ पर्यंत अर्ध्यावर आणण्याचे उदिष्ट संयुक्त राष्ट्रसंघाचे होते, परंतु ते पूर्ण झाले नाही. सन १९९१ पासून आशिया खंडातील अनेक देशात उदाहरणार्थ चीन व भारतात जलसंकट आवासून उभे आहेत. दरडोई वार्षिक १ हजार ७०० घनमिटर पाणी उपलब्ध होत नसेल तर त्या देशावर जलसंकट आहे असे समजले जाते. अमेरिकेतील नागरिक दररोज कमीतकमी ५८० लिटर पाण्याचा उपयोग करतात, चीन मध्ये ९० लिटर, तर भारतात ८० लिटर पाणी शहरात वापरतात, परंतु ग्रामिण भागात ५० लिटर पाणीही उपलब्ध होताना दिसून येत नाही. यावरुन असे म्हणता येईल की हा पाण्याचा ताण समाजातील स्थैर्य धोक्यात आणण्याची शक्यता आहे असा इशारा संयुक्त राष्ट्रसंघाने दिलेला आहे.

## भारताची राष्ट्रीय जलनीति व प्रकल्प :

जगभरात जागतिक तपमान वाढ, लोकसंख्या वाढ व जलसंकट या गोष्टी समोर येत आहेत याबाबतीत आपले भारत साकार जागृत आहे कारण भारताने उपलब्ध जलस्त्रोतांचा उपयोग संभाव्य टंचाईच्या पार्श्वभूमीवर योग्यप्रकारे करण्याच्या दृष्टिने तयार केलेल्या राष्ट्रीय जलधोरणाचा स्वीकार २०१२ मध्ये झालेल्या राष्ट्रीय जलसंसाधन परिषदेत केला. या धोरणामध्ये जलस्त्रोतांचे संरक्षण, विकास आणि चांगल्याप्रकारे व्यवस्थापन अशा अनेक शिफारसी ठेवण्यात आल्या आहेत. भारतात दरवर्षी पाण्याची उपलब्धता ही १८६९ अरब घनमिटर असून त्यापैकी ११२३ अरब घनमिटर पाण्याचा उपयोग केला जातो. भारत सरकारने ८१५० कोटी रुपयांच्या राष्ट्रीय पातळीवरील प्रकल्पांना मंजुरी दिलेली आहे. यापैकी महा राष्ट्रातील गोसीखुर्द जलसिंचन प्रकल्प, पश्चिम बंगाल मधील तिस्ता बैराज परियोजना, पंजाबमधील शाहपूरकंडी परियोजना आणि उत्तरप्रदेशातील शरयू नहर परियोजना आहेत. नर्मदा सरोवर, सरदार सरोवरही जवळपास पूर्ण झालेले आहेत. एकंदरीतच भारतात भूजल पुनर्भरण प्रमाण आणि पध्दतीमध्ये सुधारणा करण्यास मोठा वाव आहे.

## निष्कर्ष :

थोडक्यात जागतिक पातळीवर तापमान वाढ आणि त्यातून निर्माण होणारे गंभीर प्रश्न यासंदर्भात भारत सरकार महत्वाची भूमिका बजावण्याचा प्रयत्न करीत आहे. राष्ट्रीय स्तरावर समस्या होत जाणाऱ्या जलस्त्रोंताचे संरक्षण, संवर्धन याबाबतही सरकार विविध योजना आखण्याचा व राबविण्याचा प्रयत्न करीत आहे. नदीजोड प्रकल्पासारखे प्रकल्प राबवितांना संर्वागीण अभ्यास करण्याची गरज आहे. यासाठी जलस्त्रोंताचे संरक्षण, संवर्धन आणि तिर्व होणारे जलसंकट रोखण्यासाठी पाणी, जलस्त्रोतांचे होणरे प्रदुषण टाळणे, सुयोग्य जलव्यवस्थापन करणे, सांडपाण्याचा व मैल्याच्या तसेच रासायनिक उद्योगातील टाकाउ पदार्थांची योग्य व्यवस्था लावणे, अशा अनेक गोष्टी जलसंकट टाळण्यासाठी आत्यंतिक महत्वाच्या आहेत.

केवळ जलसंकट टाळण्यासाठी नाही तर एकूणच पर्यावरण संतुलन आणि जीवसृष्टीच्या दृष्टीने अत्याधिक महत्वाच्या आहेत.

## संदर्भ :

१) पर्यावरणीय भूगोल – डॉ. यू. बी. सिंह

२) भारताचा समग्र भूगोल – ए. बी. सवदी व पी. एस. कोळेकर

३) योजना विशेषांक

❖❖❖

# संत बहिणाबाई आणि त्यांचे हिंदी अभंग

प्रा.डॉ.सौ. वीरा मांडवकर
सहा. प्राध्यापक, मराठी विभाग
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५४०१
E mail: pavanmandavkar@yahoo.com भ्रमणध्वनी ९४०३०१४८८५

## प्रस्तावना :

'संतकृपा जाली । ईमारत फळा आली ।।१।।
ज्ञानदेवे घातला पाया । उभारिले देवालया ।।२।।
नामा तयाचा किंकर । तेणे रचिले आवार ।।३।।
जनार्दन येकनाथ । खांब दिल्हा भागवत ।।४।।
तुका जालासे कळस । भजन करा सावकास ।।५।।
बहेणि फडकती ध्वजा । निरोपण केले वोजा ।।६।।'

('संत बहेणाबाईंचा गाथा' अभंग क्र. १४३)

या ओळींतून संतपरंपरेचा लेखाजोखा ज्यांनी मराठी सारस्वतात अजरामर केला, त्या संत बहिणाबाईंचा परिचय कितीजणांना आहे? रंगाच्या काही फटकाऱ्यांनी एखादा कुशल चित्रकार संपूर्ण विश्‍व आपल्या नजरेपुढे उभे करतो, तद्वतच वारकरी संप्रदायाचा इतिहास मोजक्या शब्दांतून आपल्यापुढे मांडणाऱ्या संत बहिणाबाई. शब्द परिचित; पण कर्ता अपरिचित, कर्ता काहीसा परिचित; पण कर्त्याचे कर्तृत्व अपरिचित. अशी शोकांतिका ज्यांच्या वाट्यला आली, असे दुर्लक्षित व्यक्तिमत्त्व म्हणजे संत बहिणाबाई. 'ज्ञानदेवे रचिला पाया । तुका झालासे कळस ।।' या दोन ओळींनी तर गेली तीनशे वर्षे मराठी वाङ्मयाच्या पानापानांवर, वक्त्यांच्या ओठाओठांवर अधिराज्य केलेले आहे. संत बहिणाबाई एक स्त्रीसंत; पण तरीही वाङ्मयीन संशोधनाच्या क्षेत्रात त्यांच्या पदरी उपेक्षाच आल्याचे जाणवते.

बीजशब्द : संतपरंपरा, परमार्थ, प्रपंच, अभंग, भक्ती, रचना, श्रीकृष्ण

## संत वाङ्मय :

संत तुकारामांच्या एकमेव स्त्रीशिष्या संत बहिणाबाई यांच्यावर तुकोबांची साक्षात कृपा झाली. प्रपंचात राहूनही परमार्थ साधण्याची त्यांची कला. ओज, माधुर्य, विचारसौंदर्य, वाक्चातुर्य अशा अनेक गुणांनी परिपूर्ण असे त्यांचे वाङ्मय. तरीही हे वाङ्मय संत ज्ञानेश्‍वर, संत नामदेव, संत तुकारामांच्या साहित्याप्रमाणे जगाच्या कानाकोपऱ्यात पोचू शकले नाही.

बहिणाबाईंचे अभंग म्हणजे तत्कालीन स्त्रीजीवनाचा आरसा. वयाच्या तिसऱ्या वर्षी बिजवराशी झालेला विवाह, त्याच्यासोबतच परागंदा होऊन करावी लागलेली भटकंती, तामसी नवऱ्याने केलेला छळ अशा संकटांमुळे गाईवासरांत रमून जात, जीवनाची दिशा शोधत निघालेल्या बहिणाबाईंना आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग दाखविला, तो जयरामस्वामींनी. स्वप्नामध्ये संत तुकारामांचा अनुग्रह प्राप्त झाला आणि त्यांचे जीवन पूर्णत: बदलून गेले. त्यांचे संघर्षमय जीवन त्यांच्या अभंगांतून आर्ततेने उतरले. जीवनातील स्थित्यंतराचा भावनोत्कट शब्दबद्ध आविष्कार म्हणजे त्यांचे अभंग.

वास्तविक पाहता समग्र संतवाङ्मय हे मराठी साहित्याचे केवळ आभुषणच नाही, तर भारतीय संस्कृतीला लाभलेले मोठे वरदान आहे. भक्ती हाच या संतसाहित्याचा स्थायी भाव आहे. 'संत म्हणजे लोककल्याणाची जबाबदारी मनी बाळगून कर्तव्यदक्षतेने वर्तणारे थोर महात्मे. जनतेला आत्म्याची ओळख करून देऊन त्यांच्यात आदर्श जीवनमूल्ये ठेवून तदनुसार जगण्याची स्वतंत्र अशी जीवननिष्ठा त्यांना प्राप्त करून देणे, ही संतांनी आपली सामाजिक जबाबदारी मानली होती. नानाविध मतमतांच्या वादळात सापडलेल्या, स्वहिताचे भान हरवून बसलेल्या व हतबुद्ध झालेल्या समाजाला त्यांनी डोळस भक्तीचा मार्ग दाखविला.'[१] 'चक्रधरांनी

पुरस्कारलेली अहिंसा आणि निवृत्तिनाथांनी शिकवलेला आदर्शवाद या वारसाबळावर तेराव्या शतकातील मराठी वाङ्मय पोसले गेले व त्यातून विवेकनिष्ठ भक्तिमार्गाच्या खळखळत्या प्रवाहाने साहित्यगंगा वाहती झाली.'[२]

महाराष्ट्राच्या जडणघडणीत या संतांचा मोठा सहभाग आहे. तेराव्या शतकापासून आजपर्यंत महाराष्ट्राला संतांची वाण पडली नाही. त्यात स्त्रीसंतांचाही मोठा वाटा आहे. आद्य कवयित्री महदंबेपासून संत बहिणाबाईंपर्यंत अनेक स्त्रीसंत होऊन गेल्या.

## बहिणाबाईंचे हिंदी अभंग :

बहिणाबाईंच्या कालखंडात दक्षिणेत अशांतीचे साम्राज्य होते. बहामनी आणि मोगल यांच्यात सतत संघर्ष सुरू होता. बहिणाबाईंच्या प्रांतावर तेव्हा दिल्लीच्या मुघल बादशहाच्या सुभेदाराचे राज्य होते. दिल्लीस इ.स. १६२८ ते १६५८ पर्यंत शहाजहान व त्यानंतर इ.स. १६५८ ते १७०७ पर्यंत औरंगजेबाचे राज्य होते. औरंगजेब दख्खनचा सुभेदार म्हणून प्रथम इ.स. १६३६ ते १६४४ व दुसऱ्यांदा इ.स. १६५३ ते १६५८ मध्ये राज्य करीत होता. दुसऱ्या वेळी त्याची नेमणूक झाली तेव्हापासून तो खडकी येथे राहू लागला व खडकीचे नाव बदलवून त्याने औरंगाबाद असे ठेवले. तेव्हापासून मुघलांचे मुख्य लष्करी ठाणे म्हणून औरंगाबादला महत्त्व आले. शिवाजी महाराजांच्या निधनानंतर इ.स. १६८० ते १७०७ पर्यंत पुन्हा औरंगजेब दक्षिणेस येऊन राहिला. औरंगजेब व मराठे तसेच आदिलशहा व कुतुबशहा यांची आपापसात सारखी युद्धे होत होती. अशा परिस्थितीत बहिणाबाईंचा हिंदी भाषेशी संबंध येणे अपरिहार्यच होते. म्हणून त्यांनी हिंदी रचना केल्या, यात आश्चर्य वाटण्याजोगे काही नाही. आश्चर्य वाटते ते याचे की, एक ग्रामीण भागातील स्त्री असूनही त्यांच्या हिंदी रचना शुद्ध स्वरूपात आणि दोषविरहित आहेत.

संत बहिणाबाईंनी रचलेल्या हिंदी पदांची संख्या एकूण २२ आहे, ती पदे खालीलप्रमाणे :—

१. देवकी कहे सुन बात ................ खोलत जावत है अविनाश रे ।। (अ. ३९०)
२. ये गोकुल चल हो कहत मुऱ्हारी ...... मुरारि काहेकु संकट वाके ।। (अ. ३९१)
३. बसुदेवा तब बारन आवे ............. दीन्ही दरबाजे रखे फेरा ।। (अ. ३९२)
४. बसुदेवा जब देखे हरिकू ............. वोही कारण जान ।। (अ. ३९३)
५. जय जय कृष्ण कृपाल भयोजी ........ येही कहो घननीला ।। (अ. ३९४)
६. सुनो कहत है श्याम सुजानो ......... सोवे सबही संपति दास ।। (अ. ३९५)
७. ये गोविंद प्राप्त भयो कहा ............ वो साधूकी संगती ।। (अ. ३९६)
८. ये अजब बात सुनाई भाई ........... वाको साच न मान ।। (अ. ३९७)
९. सब ब्रजनारी सुनो हरि जनमो ....... नारी देहभाव नहीं जाने ।। (अ. ३९८)
१०. कंटक को मल्लमर्द । ............... सत्य सुजानि है ।। (अ. ३९९)
११. जिस आस जोगी जग । ............ बहेणि ये कहत है ।। (अ. ४००)
१२. जमुनाके तट धेनु चरावत । ........ मेरा हरिसुं लगा है मन ।। (अ. ४०१)
१३. मरनसो हक है रे बाबा ............. मरन करे आप दूर ।। (अ. ४०२)
१४. सच्चा साहेब तू येक मेरा ........... तेरे पर बलि जाय ।। (अ. ४०३)
१५. देव करे सो कहाँ न होवे ........... हो जो करे सो सब होई ।। (अ. ४०४)
१६. जटा न कंथा सिंगी न .............. तेरे पर बलि जाऊँ ।। (अ. ६०८ — पद)
१७. दो दिनकी है दुनिया ................ कृष्ण नाम तमे हुसीयार ।। (अ. ६११)
१८. बडा भेख शिर मुंडाया ............. पेटमें वासना भूखी ।। (अ. ६३० — मुंढा)
१९. मुंडा मुंडा सब कहते । ............. तो काहेकू नाडते जग ।। (अ. ६३१ — मुंढा)
२०. नंदजी आसिस भाट ............... बहिनी मूसे गात है । (अ. ६३९ — भाट)
२१. जसोदाका पुण्य फलो ............... पाप जावे बहिनीका जी । (अ. ६४० — भाट)
२२. गुरुने मुझे ग्यानप्याला .............. दील राजी उसीसू ।। (अ. ६६५ — श्लोक)

## बहिणाबाईंच्या हिंदी अभंगांचे विषय :

बहिणाबाईंनी रचलेल्या २२ हिंदी रचनांमध्ये पदे अभंग, भाट, मुंढा इत्यादी प्रकार आढळतात. तेरा पदांमधून बहिणाबाईंनी कृष्णकथा रंगवली आहे. श्रीकृष्णाचा जन्म होताच त्यांनी वसुदेव आणि देवकीला आपले दर्शन चतुर्भुज आणि घनश्याम स्वरूपात दिले. त्यावेळी वसुदेव–देवकीला देवानेच आपल्या पोटी अवतार घेतला याचे आश्चर्य वाटले, असे वर्णन ३९३, ३९४ व ३९६ क्रमांकावर आलेल्या त्यांच्या पदांमधून येते. अनेक समर्पक दृष्टांतांद्वारे बहिणाबाई पटवून देतात की, जे पुण्यवान असतात त्यांच्याच पोटी भगवान श्रीकृष्ण जन्म घेतात. अभंग क्र. ३९७ मध्ये अशक्य गोष्टी निंदकांच्या तोंडून कशा पसरविल्या जातात, ते सोदाहरण बहिणाबाईंनी वर्णिले आहे. जसे, गरुडाचे पंख कावींयाने चोरले, अमृतपानाने मृत्यू झाला, कुबेर धनासाठी रडतो आहे, हनुमानाला पत्नीची आस लागली. अशाप्रकारच्या गोष्टी निंदक पसरवू शकतात, तेव्हा त्यांच्यावर विश्वास ठेवू नये, असे आवाहन त्या करतात.

अभंग क्र. ३९८, ३९९ मध्ये नंदाचे भाग्य किती थोर म्हणून त्याच्या घरी कृष्णजन्म झाला. अनेकांना पुण्याकरिता कितीतरी प्रयत्न करावे लागतात. नंदाला काहीही न करता त्याचे पुण्य इतके अगाध की त्याच्या घरी गोविंद प्रकट झाला.

अभंग क्र. ४०१ मध्ये गोपालकृष्णाचे वर्णन केले आहे. यमुनेच्या तीरावर गाई चारणारा हा गोविंद त्याचे पिवळे वस्त्र, कानात कुंडले, डोक्यावर मोरपीस, सुवासिक हार आणि सुमधुर संगीत अशा सर्गीया गुणांनी युक्त असलेल्याचे मला वेड लागले आहे.

'बहेणि कहे सब भूल गये । मेरा हरिसुं लगा है मन ।।'

बहिणाबाईंची कृष्णाप्रती असलेली ही तन्मयावस्था त्यांचे कृष्णाविषयी असलेले प्रेम व्यक्त करते.

अभंग क्र. ४०२ मध्ये बहिणाबाई एखाद्या तत्त्वज्ञाप्रमाणे मृत्यूवर भाष्य करतात. प्रत्येकाला एक दिवस मृत्यू येणारच आहे, त्यामुळे त्याच्यापासून दूर जाण्याचा प्रयत्न करण्यात अर्थ नाही. ज्ञानी लोक ही गोष्ट समजून घेतात आणि मृत्यूच्या भयाला दूर करतात, असे त्या शेवटी म्हणतात.

अभंग क्र. ४०४ मध्ये बहिणाबाई राममहिमा रंगवून सांगतात. रामाची विविघ कर्तृत्वे त्या आपल्यासमोर सुंदर शब्दांत उभी करतात. कृष्णासोबतच रामाबद्दलही असणारा त्यांचा आदर येथे व्यक्त होतो.

६०८ व्या क्रमांकावर आलेल्या पदात बहिणाबाई संतांचे रूपवर्णन व गुणवर्णन करतात. संतांचे राहणीमान, त्यांचे विचार, आचार या सर्गीयांचे विवेचन आहे. अशा या संतांना आपण शरण गेल्याचे त्या सांगतात.

अभंग क्र. ६११ मध्ये जगाचे व जीवनाचे क्षणभंगुरत्व सांगून त्या देवाला शरण जाण्याचा सल्ला देतात. कृष्णाचे नाम तुम्हाला तारून नेईल, असे त्या सांगतात.

अभंग क्र. ६३० व ६३१ यांना 'मुंढा' शीर्षक देऊन त्यांत त्या खोट्या मुंढ्यची म्हणजे संन्याशाची खरडपट्टी काढताना दिसतात. हे खोटे संन्यासी जगाला दाखविण्यासाठी वेगवेगळी सोंगे घेतात व जगाला फसवितात. अशांचा त्या खरपूस शब्दांत समाचार घेताना दिसतात.

अभंग क्र. ६३९ व ६४० यांना बहिणाबाईंनी 'भाट' असे शीर्षक दिले आहे. त्यांत नंदाला आशीर्वाद देऊन कृष्णाचे कौतुक केले आहे. कृष्णाचे पूर्ण वैकुंठज्ञानी असे रूप त्या येथे दर्शवितात.

अभंग क्र. ६६५ म्हणजे श्लोक असून त्यात बहिणाबाई गुरूने ज्ञान दिल्यामुळे माझे अज्ञान दूर पळाले, असे सांगतात.

अशाप्रकारे बहिणाबाई आपल्या हिंदी अभंगांतून विविध विषय समर्थपणे हाताळतात. तसेच मराठी भाषेसोबत हिंदी भाषेवरही असलेले प्रभुत्व येथे दिसून येते. तत्कालीन चालीरीती, भाषा, रूढ संकेत, व्यक्तिचित्रे हे सगळे आपल्या हिंदी अभंगांतून प्रत्यक्ष उभे करण्यात निश्चितच यशस्वी ठरलेल्या आहेत. गोपाळकृष्णाचे वर्णन करताना त्यांच्या वाणीतील प्रासादिकता मोहून घेते. खोट्या गोष्टींचा तिरस्कार, सत्य, सौंदर्य यांचा आदर हे बहिणाबाईंच्या या काव्याचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. भाषेतील विविध अलंकारांचा वापर, प्रसंगी कठोर शब्द, वस्तुस्थितीचे ज्ञान करून देणारी शैली अशा सर्व गुणांनी बहिणाबाईंचे हिंदी अभंग त्यांच्या मराठी अभंगांप्रमाणेच रसिकांना आपलेसे करतात.

तत्कालीन राजकीय व सामाजिक परिस्थितीचा आढावा घेतल्यास आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी तपासल्यास संतांची हिंदी रचनानिर्मिती साहजिक वाटते. उल्लेखनीय म्हणजे बहिणाबाईंनी केलेली हिंदी रचना अत्यंत शुद्ध स्वरूपात आणि समर्थपणे केलेली दिसून येते.

## निष्कर्ष :

१. 'ज्ञानदेवे रचिला पाया । तुका झालासे कळस ।।' या दोन ओळींनी गेली तीनशे वर्षे मराठी वाङ्मयाच्या पानापानांवर, वक्त्यांच्या ओठाओठांवर अधिराज्य केलेले आहे.

२. बहिणाबाईंचे अभंग म्हणजे तत्कालीन स्त्रीजीवनाचा आरसा आहे.

३.'संत म्हणजे लोककल्याणाची जबाबदारी मनी बाळगून कर्तव्यदक्षतेने वर्तणारे थोर महात्मे आहेत.

४. आद्य कवयित्री महदंबेपासून संत बहिणाबाईंपर्यंत अनेक स्त्रीसंत होऊन गेल्या.

५. अनेक समर्पक दृष्टांतांद्वारे बहिणाबाई पटवून देतात की, जे पुण्यवान असतात त्यांच्याच पोटी भगवान श्रीकृष्ण जन्म घेतात.

६. बहिणाबाईंनी केलेली हिंदी रचना अत्यंत शुद्ध स्वरूपात आणि समर्थपणे केलेली दिसून येते.

## संदर्भ :


१. उषा माधव देशमुख, 'रुजुवात', मराठी साहित्याचे आदिबंध, प्रथमावृत्ती, लोकवाङ्मय गृह प्रा.लि., मुंबई, १९८२, प्रारंभिक पृ. ८.

२. शं.कि. चतुरकर, 'उपोद्घात', मराठी संतांचा आध्यात्मिक विचार, प्रथमावृत्ती, पुं.कि. चतुरकर, अमरावती, १९७९, प्रारंभिक पृ. १६.


## संदर्भ ग्रंथ :


१. शं.गो तुळपुळे, महाराष्ट्र सारस्वत (पुरवणी), खंड दुसरा, सहावी आवृत्ती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८३.

२. इंदुमती शेवडे, संत कवयित्री, प्रथमावृत्ती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८९.

३. हे.वि. इनामदार, विलास खोले (संपा.), 'अनंत लावण्याची शोभा', भक्तिगंगेच्या वाटेवर, प्रथमावृत्ती, संजय प्रकाशन, पुणे, १९८८.

४. दिलीप पुरुषोत्तम चित्रे, बहेणी म्हणे हात घाला मस्तकी, प्रथमावृत्ती, भागवत प्रबोधन संस्था, देहू, १९९८.


❖❖❖

# English :- how to learn ?

**Dr. Bhushan P. Patil**
Samata Nagar, Murtizapur
E Mail: bushforuat007@gmail.com Mob. No. 9970389302

## Introduction:

Today we find rapid increase in the number of English medium nursery, primary and secondary schools. As a result the number of Marathi medium schools in our state is decreasing. Many Marathi medium primary schools have been closed on account of not getting adequate number of students in a class. And many secondary schools find it very difficult to maintain the required minimum number of student strength in a class. They have to turn every stone to persuade parents to enroll their children in their schools. This is because parents feel that their children should be able to speak and write English only in English medium schools. So they prefer those schools to that of Marathi medium schools. Therefore we must know how to learn spoken as well as written English.

## Speaking before reading:

Which should come first : reading or speaking? Children and most adults should begin to learn to speak new language before they try to read it. This is because the spoken language is the real language. So speaking must come after a short period of a week or two of listening to the new sounds. Reading should be delayed if possible for a year. To delay it for two years would be better. But this is not possible where pupils do not begin a second language until their fourth or fifth school years.

## Beginning to speak English:

The beginning period is all important, for “well begun is half done” So good pronunciation, correct grammar and sentence structures should be carefully learnt. If they are learnt from the very beginning, there will be no need later on of remedial exercises. It is far easier to learn new material than to eradicate old faults. It is more difficult to learn correct usages when incorrect forms and structures have been acquired than to learn the correct usage at the start. So it is necessary for language learners to work at correct pronunciation, grammar and structure at the very beginning of the learning a new language. It would be excellent if beginners were taught only by the best teachers in schools. The young pupils beginning to learn a new language are always keen to work and are willing to carry at the numerous repetitions that are necessary for them. Those teachers must have good knowledge of phonetics and the techniques of handling the Direct method.

## Importance of correct pronunciation for the beginners:

“*I*t is a sad thing to think that all over the world teachers are busily teaching ‘incorrect’ pronunciations to thousands of children daily” (P.Gurrey). They do this because they do not understand the importance of correct pronunciation from the beginning. No doubt, few of them are taking a lot of trouble and teaching the correct pronunciations. This is because they know this well that the pronunciations once learned is more difficult to change than any other element of language. Phoneticians have discovered that the ear has to be trained to hear new sounds accurately. But the learners hear only the sounds of their mother tongue that are near to the sounds of new foreign language. So most of the pupils hear only those sounds that their ears are accustomed to hear and that their minds are accustomed to receive and respond to. And they not hear the sounds that are different from those of their mother tongue. And so their pronunciations is wrong from the start. Still the ears of the

learners will have to be taught to listen. Only then they will know what sounds to imitate. So students should regularly listen to the cassettes on English pronunciation and conversation.

## Self confidence :

All of us strongly desire that we should be able to speak English. This desire of ours will be fulfilled if we are ready to work hard. Perhaps some of us have already mastered the basics of the English language, but we do not have self – confidence in speaking or writing English. We might feel that people will find fault with our English and so we might avoid speaking English. But we should not do this. Here I would like to quote Jespersen, a well known grammarian of English. He said, “If one wants to master a foreign language one should first learn to murder it.” This means that we should not be afraid of making mistakes while speaking. Therefore have self confidence and start speaking English without any fear or tension.

## How to improve our English:

Even if we are self confident in the use of English we should always remember that we are using a foreign language and that we are likely to make mistakes. So develop friendship with those whose English it better than ours and discuss our problems with them. Do not be afraid to talk about our difficulties to our teachers. Do not feel bad, if our mistakes are corrected in the class room in the presence of our fellow students especially girls. But we should not feel insulting. On the contrary, thank them for their kind help and try to avoid those mistakes. Such continuous efforts will certainly lead us to improve our English.

## Importance of Dictionary and grammar:

To overcome our difficulties in the use of English, spoken or written, we should refer to the grammar and the dictionary as many times as we can. We will find that we are rewarded every time we refer do a dictionary. It is said that the grammar and the dictionary are the two eyes of a language. Learn to make the best use of both these eyes. From dictionary we can learn the meaning of the words and how the words are used in sentences. Many of us know the rules of grammar, but we do not always follow them in speech or writing. It is easy to know them, but it is very difficult to practise them while speaking or writing. We should learn to speak or write short but correct sentences. After all language learning is nothing but a habit formation. If we practise a lot of speaking or writing, correct language will become our habit.

## No shortcuts to learning English:

Do not be misled by advertisements of coaching classes and books claiming that we will be a master of English within a month or within a short period, if we join that particular class or read that book. If it were possible to learn English so easily, English would not have been a problem for anyone of us. So we must work hard, if we really wish to learn to speak and write correct English. Remember that there are no shortcuts to learning English. No doubt, there are many modern aids available to learn English. Indeed they help us a lot to learn spoken English.

## Importance of English:

Terms from English are used throughout the world in science, commerce, diplomacy, scholarship, aviation and jazz. Over 70 percent of the world’s radio programmes are in English. In India where other languages are also used for communication, out of the total time spent on it 64.14 per cent is on communicating in English as against 27.22 per cent in Hindi and 8.64 per cent in regional languages. Thus English has become the world’s leading international language.

In addition to these ways, there might be others to learn English language. But I am sure if these ways are followed a learner can learn correct spoken and written English language. In spite of our affection for national as well as regional languages, we cannot deny the significance of English as an international language. Today, roughly one out of every eight persons in the world speaks English. It is the official language of the United States, Canada, Australia and New Zeland as well as of England and Ireland. In India English is a link language and is used as a functional language. Persons knowing English have great scope for employment in administrative, judiciary and teaching fields. So a large number of people and students feel that they should learn correct English.

## References:

Gurrey P. :- Teaching English As A Foreign Language (1964)
Y.C.M.O.U. Nashik :- Communication Skills In English
Frisby A.W : - Teaching English Notes and Comments On Teaching English Overseas (1964)

❖❖❖

# Guidelines for Authors

Research Journal of India is a Peer Reviewed Annual National Research Journal for Multi-disciplinary studies of various faculties.

Vision and Mission of Research Journal is to provide momentum to research in the all areas like analytical, competitive, survey, contemporary issues and quality control.

**Call for Research Paper**

1. Paper on all subjects and areas will be accepted in English, Hindi or Marathi.
2. Paper should be **A 4** size with 1.25 inch margin on each side.
3. No header & footer should be given.
4. Text should be in **Times New Roman** type with font size **11** in English and **Krutidev 50** type with **14** font size for Hindi/Marathi and should be computed in MS word only. PDF files will not be accepted.
5. Font size for Title of Paper 22 bold for English and 26 bold for Hindi/Marathi, Name of Author in 12 bold for English, 16 bold for Hindi/Marathi, address in 11 for English, 14 bold for Hindi/Marathi & Subtitles in 14 bold for English and 18 bold for Hindi/Marathi. For Marathi and Hindi articles Krutidev 50 font should be tatally bold for all matter.
6. Spacing should be **single**. Alignment for paper & headings should be justified & centered for title of paper & name of writer with address.
7. The first page should consist of title, name(s) of author(s) with designation, department or college with full address, contact numbers and mail id at the centre below title.
8. Introduction, review of literature, background of study, methodology, objectives, purpose, hypothesis, significance, findings and discussion, analysis, conclusion, recommendations may be given wherever required.
9. References list should be alphabetized at the end of research paper.
10. Tables & figures should be cited in the text in consecutive numerical order. Each figure should have concise and informative caption.
11. Maximum limit is 2500 words or 5 pages. Abstract should be up to 150 words followed by 4-5 key words. Paper exceeding 5 pages will be charged Rs. 100 per additional page. Only abstract or paper less than 3 pages or without references will not be accepted.
12. Authors have to send research paper by e mail at: **marathipradhyapak@gmail.com**

11. Editorial Board's Decision will be final.

13. The copyright of all accepted papers will vest with **Research Journal of India.**
14. International Guidelines for writing of research paper are to be strictly followed.
15. Date of Publishing is 1$^{rst}$ October each year and papers will be accepted up to 15$^{th}$ August.

Subscription for one year and single issue price for individual, institutional Rs. 500/- to be deposited in A/c No. – 60175373000 of Bank of Maharashtra, Azad Maidan Road, Yavatmal, IFSC code - MAHB0000047 in favour of Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre.

❖❖❖

## Form IV
(See Rule 8)

Statement about ownership and other particular about the Journal

## Research Journal of India

| | | |
|---|---|---|
| 1. Place of Publication | - | Dr. Bhau Mandavkar Research Centre, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445401 |
| 2. Periodicity | - | Annual |
| 3. Printer's Name | - | Seva Prakashan, Vijay Colony, Amravati 444606 (M.S.) |
| 4. Publisher's Name | - | Dr. Mrs. Veera Mandavkar |
| Nationality | - | Indian |
| Address | - | Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445401 |
| 5. Editor's Name | - | Dr. Pavan Mandavkar |
| Nationality | - | Indian |
| Address | - | Principal, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal |

We, Dr. Pavan Mandavkar & Dr. Mrs. Veera Mandavkar hereby declare that the particulars given above are true to the best of our knowledge and belief.



Dr. Y.M. Donde Sarwajanik Shaikshanik Trust's (1974)

**INDIRA MAHAVIDYALAYA**

KALAMB, DIST. YAVATMAL, MAHARASHTRA 445401

☎ 07201-226170, 226147, 226129 (Fax)

Web.: www.indiramahavidylaya.com

e mail for Govt. & General : imvkalamb@yahoo.co.in

For University : indiram414@sgbau.ac.in

For Research centre : marathipradhyapak@gmail.com

Permanently Affiliated to SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI

RECOGNIZED BY UGC UNDER 2 F & 12 B

NAAC ACCREDITED WITH 'B' GRADE

Multi-Faculty College Estd. in 1983



| | | | |
|---|---|---|---|
| Annual Subscription | - | Individual / Institutional / Single Issue | ₹ 500/- |
| Account Details : Bank | - | Bank of Maharashtra | |
| Branch | - | Azad Maidan Road, Yavatmal | |
| IFSC code | - | MAHB0000047 | |
| MICR coe | - | 445014001 | |
| A/c No. | - | 60175373000 | |
| Mode of Payment | - | By NEFT transfer or crossed Multi city cash at par Cheque or by Demand Draft of Nationalized Bank favorably Bank of Maharashtra payable at Yavatmal or by cash deposit in A/c in favour of Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre | |



(All rights are reserved with the Publisher & Editorial Board. The opinion expressed are of the authors & the association advisory board, editorial board as well as the peer committee does not hold any responsibility for any of the views expressed. Judiciary matter in Kalamb Court only.)



ISSN 2349-9370

9 772349 937002